रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शुक्रवार । दि. १४ ऑगस्ट २०२६ । अंक ६९ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## अधिवेशन एका मिनिटांत संपलं

**नवी दिल्ली :** पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, लोकसभेचे कामकाज केवळ एक मिनिट चालले. सभापती ओम बिरला यांनी वंदे मातरम गाण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले. त्याआधी सभागृहात एमएमडीआर दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यावेळी कामकाजाची सुरुवात गदारोळात झाली; मात्र, वंदे मातरमच्या घोषणेने काही काळासाठी शांतता प्रस्थापित झाली. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांचेही गुरूवारी लोकसभेत आगमन झाले होते.

## बंडखोरांना मुख्यमंत्री बनवणे बेकायदेशीर

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणात सुनावणी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयात गुरूवारी (दि.१३) दूखील सुनावणी पार पडली. यावेळी कपिल सिब्बल यांच्याकडून ठाकरेंच्या शिवसेनेकडून युक्तिवाद केला जात आहे. यावेळी ते म्हणाले की, समजा एखाद्या सदस्याला बाहेर काढले आणि घटनेत तशी प्रक्रिया असेल, तर तो निवडणूक आयोगाकडे जात नाही, तर दिवाणी न्यायालयात जातो. निवडणूक आयोगाकडे अधिकारक्षेत्र असेल, तर ते केवळ घटना सुसंगत करण्याचे निर्देश देऊ शकते, निवडणूक आयोग पान २ वर

## वेधक

### पांडवकडा धबधब्यावर तरुणाचा बचाव

**खांदा कॉलनी :** खारघर येथील पांडवकडा धबधब्यात व्यक्ती बुडाल्याची वर्दी मिळताच सिडको अग्निशमन केंद्राच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत थरारक बचावकार्य केले. जोरदार पाऊस आणि धबधब्यातून मोठ्या प्रमाणात पाणी कोसळत असतानाही जवानांनी सुमारे १० ते १२ फुट खोल दगडाच्या कपारीत अडकलेल्या तरुणाचा शोध घेत त्याला सुरक्षितपणे बाहेर काढले. आदित्य विश्वकर्मा (२३) असे या तरूणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पान २ वर

### महाडमध्ये अवैध दारूसाठा जप्त

**महाड :** शहरातील अवैध धंद्यांविरोधात शहर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरूच ठेवला आहे. दरम्यान, मंगळवारी (दि.११) केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात अवैध दारूसाठा आणि एक दुचाकी असा एकूण ६९ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वरंध येथील अमित चंद्रकांत साळुंके (३८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पान २ वर

### टोरंटविरोधात आदिवाशांचा मोर्चा

**नेरळ :** कर्जत तालुक्यात होऊ घातलेल्या टोरंट वीज प्रकल्पाच्या कॉलनीसाठी महाराष्ट्र शासनाने भालिवडीतील लाखाची वाडी येथील ९६ एकर जमीन ३० वर्षांच्या भाडे करारावर दिली आहे. त्या जमिनीवर राहती घरे आणि शेती असतानाही टोरंट कंपनीसाठी जागा दिल्याने येथील आदिवासी लोक आक्रमक झाले आहेत. त्यांनी जागृत कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली कर्जत प्रांत अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. तसेच, ''राहती घरे सोडून आम्ही कुठेही जाणार नाही आणि टोरंट कंपनीला तर अजिबात जमीन देणार पान २ वर

### डॉमिनोज पिझ्झाला मोठा दणका

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून राज्यभरात धडक कारवाया सुरु आहेत. या कारवायांमुळे अन्न माफियांवर आळा बसला आहे. नुकतेच एफडीएने ब्लिंकइटच्या मुंबई येथील गोदामावर धाड टाकली. ही कारवाई चर्चेत असताना आता डॉमिनोज पिझ्झाला मोठा दणका दिला आहे. तपासणीत स्वच्छता आणि अन्न साठवणुकीबाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे डोमिनोज पिझ्झाच्या चार शाखांचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित केला आला आहे.

# पाकगृह की भंगारखाना?

## जिल्हा रुग्णालय प्रशासनाचा कारनामा



प्रमोद जाधव

। रायगड ।

**अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील पाकगृहाचा वापर चक्क गोदाम म्हणून होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णांच्या पोषण आहारासाठी असलेल्या जागेचा वापर साहित्य साठवण्यासाठी होत असल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील हा प्रकार प्रशासनाच्या नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे चित्र दाखवत आहे. पाकगृहाला गोदामाचे स्वरूप देत प्रशासनाने रुग्णांच्या आहार व्यवस्थेलाच वाऱ्यावर सोडले असून गाद्या, खाटा आणि टेबलांच्या पसाऱ्यामुळे रुग्णालयातील व्यवस्थेचा ढिसाळ कारभार उघडकीस आला आहे. पोषण आहार तयार होणाऱ्या ठिकाणी साहित्याचा ढीग लावल्याने प्रशासनाच्या नियोजनावर संताप व्यक्त होत आहे.**



### स्वच्छतेचा दिखावा

रूग्णालयाचे पाकगृह असलेल्या मागील भागात गवतांनी विळखा घातला आहे. त्या परिसराची स्वच्छता करण्यास रुग्ण प्रशासन उदासीन ठरले आहे. पाकगृहामध्ये रुग्णालयातील साहित्य ठेवून प्रशासनाकडून स्वच्छतेचा दिखावा केल्याचे दिसून येत आहे. खाट, टेबल, गादी इत्यादी साहित्य या पाकगृहामध्ये पडून असल्याचे बोलले जात आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांना पोषण आहार देण्यासाठी याठिकाणी स्वतंत्र पाकगृह उभारण्यात आले आहे. या पाककलेतील स्वच्छतेबाबत दखल घेण्याचे काम केले जाते. तसेच, कोणालाही या पाकगृहात विनाकारण फिरकूनही दिले जात नाही. मात्र, हेच पाक गृह गोदाम बनल्याचा प्रकार समोर आला आहे. या ठिकाणी रुग्णालयातील गादी, टेबल व खाटांचा पसारा दिसून आला आहे. रुग्णालयात या वस्तू ठेवण्यासाठी पुरेसी जागा नसल्याने पाकगृहात हे साहित्य ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रुग्ण प्रशासनाच्या या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत ४० वर्षे जूनी असून, २५० खाटांचे असलेल्या रुग्णालयात हजारो रुग्ण उपचार घेतात. अलिबागसह पोलादपूरपासून पनवेल, कर्जत, खालापूर, मुरूड, तळा, श्रीवर्धन, म्हसळा अशा अनेक भागातील रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी येत असतात. या जिल्हा रुग्णालयातील सर्जिकल मेडिकल दक्षता विभाग अशा वेगवेगळ्या विभागात रुग्णांवर उपचार केले जातात. उपचारासाठी दाखल केलेल्या रुग्णांना पोषण आहार देण्यासाठी रुग्णालयाच्या तळमजल्यावर पाकगृह आहे. या पाकगृहामार्फत भोजन व इतर पोषण आहार तयार केले जाते. मागील वर्षी याच पाकगृहातील स्लॅब कोसळण्याची घटना घडली होती. या समस्या असताना रुग्णालयातील पाकगृह आता गोदाम बनल्याचे चित्र समोर आले आहे. अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात नव्याने खरेदी केलेले टेबल, गादी व खाटा इत्यादी साहित्य या पाकगृह कक्षामध्ये ठेवण्यात आले आहेत. रुग्णालयात हे साहित्य ठेवण्यासाठी जागा पुरेसी नसल्याने पाकगृहाला गोदाम बनविण्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे सामान्य रुग्णालयातील प्रशासनाच्या या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# बोडणवाडी फाट्यावर खैर लाकडाची जप्ती



५ आरोपींना ३ दिवसांची वनकोठडी

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील पेझारी-नागोठणे मार्गावरील बोडणवाडी फाट्यावर प्रतिबंधित खैर प्रजातीच्या लाकडाची अवैध तोड आणि वाहतूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. पोयनाड पोलीस आणि अलिबाग वनविभागाने संयुक्त कारवाई करत ३३ नग सॉलिव खैर लाकडाचे ओंडके आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे मारुती सुझुकी एर्टिगा वाहन जप्त केले आहे. याप्रकरणी ५ संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची वनकोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेझारी-नागोठण मार्गावरील मेढेखार-बोडणवाडी फाट्याजवळ मंगळवारी (दि.११) पहाटे पान२ वर

# आज अलिबागमध्ये तिरंगा बाईक रॅली

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

स्वातंत्र्य दिनानिमित्ताने अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने शुक्रवारी (दि.१४) शहरामध्ये तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.०० वाजता या रॅलीला सुरुवात होणार असून, देशभक्तीची भावना जागृत करून भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता वाढविण्याच्या दृष्टीने हा नगरपरिषदेने उपक्रम राबविला आहे. दरम्यान, या रॅलीमध्ये हजारोच्या संख्येने सहभागी व्हा, असे आवाहन नगराध्यक्ष अक्षया नाईक यांनी केले आहे.

भारतीय स्वातंत्र्य दिन शनिवारी (दि.१५) संपूर्ण रायगड जिल्ह्यात साजरा केला जाणार आहे. ''हर घर तिरंगा'' मोहिमेअंतर्गत अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने शुक्रवारी (दि.१४) तिरंगा बाईक रॅलीचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ही बाईक रॅली नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग शहरात निघणार आहे. यावेळी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, वेगवेगळ्या समितीचे पदाधिकारी, सदस्य, नगरसेवक तसेच मुख्याधिकारी सागर साळुंखे, नगरपरिषदेतील अधिकारी, कर्मचारी, शहरातील नागरिक, महिला, तरुण, तरुणी या रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. पान २ वर

# एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

■ **घाटकोपरमध्ये दरड कोसळली**

■ **चिरानगरमधील एकूण सात जणांवर काळाचा घाला**

। मुंबई । प्रतिनिधी ।

पावसाच्या जोरधारा सुरू असतानाच घाटकोपरच्या चिरागनगरमधील गौसिया चाळीवर बुधवारी (दि.१२) पहाटेच्या सुमारास भूस्खलन होऊन दरड कोसळण्याची घटना घडली. यावेळी झोपेत असलेल्या रहिवाशांना काही कळण्यापूर्वीच माती-दगडांचा मोठा ढिगारा त्यांच्या घरांवर आला. या दुर्घटनेत सात रहिवाशांवर काळाने घाला घातला असून, एकाच कुटुंबातील तिघांचा करूण अंत झाला आहे.

दरम्यान, गौसिया चाळीत भूस्खलन झाल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. त्यांनी मदतकार्य हाती घेतले. सुरुवातीला तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. तोपर्यंत अग्निशमन दलाचे जवानही येथे पोहोचले. ढिगारा उपसण्याचे काम सुरू झाले तेव्हा दुर्घटनेची तीव्रता लक्षात येऊ लागली. कुणी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नातेवाइकांचा शोध घेत होते. तर, कुणी बचाव पथकांच्या हालचालींकडे आशेने पाहत होते. त्यानंतर हळूहळू जखमींची आणि मृतांची संख्या वाढू लागली. त्यामुळे पहाटे चाडेचार वाजता अग्निशमन दलाने दुर्घटनेची तीव्रता पान २ वर

# समुद्रात गाडी अडकली

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील आरावी समुद्रकिनाऱ्यावर फिरण्यासाठी आलेल्या पुण्याच्या पर्यटकांनी आगाऊपणा करून गाडी समुद्रकिनारी उतरवली. यावेळी गाडीच्या टपावर चढून कोण सेल्फी काढत होता, तर काहीजण रील बनवत होते. दरम्यान, दुपारी १२.०० वाजताच्या सुमारास समुद्राला पूर्ण भरती येणार होती. मात्र, या पर्यटकांना सेल्फी काढण्यात आणि रील बनवण्यात समुद्राचे पाणी गाडीजवळ येऊन पोहोचल्याचे भान राहिले नाही. त्यानंतर १५ ते २० मिनिटांमध्ये



पुण्याच्या पर्यटकांना अगाऊपणा नडला

गाडीच्या खाली समुद्राचे पाणी आल्यामुळे पर्यटकांनी गाडी काढण्याचा प्रयत्न केला असता, गाडी चाके गोल फिरू लागली आणि गाडी आंत रूतत गेली. भरतीची वेळ असल्यामुळे समुद्राचे पाणी वाढतच गेले. समुद्राला पूर्ण भरती आल्यानंतर पान २ वर

# ३ लाख ७१ हजार रुपयांचा अपहार

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कर्जाच्या सेटलमेंटसाठी एका ग्राहकाकडून घेतलेली ३ लाख ७१ हजार रुपयांची रक्कम बँकेत जमा न करता तिचा स्वतःच्या फायद्यासाठी अपहार केल्याप्रकरणी मोतीलाल ओसवाल होम फायनान्सच्या रिकव्हरी एजंटविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकेश पवार असे रिकव्हरी एजंटचे नाव आहे. या प्रकरणातील ग्राहक नारायण बाबा श्रीराम हे पान २ वर




गणरायाच्या आगमनाला अवघा एक महिना | स्थानिक कामगारांच्या मदतीने युद्धपातळीवर काम सुरू

# गणेशमूर्तींच्या रंग कामाची लगबग

। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।

गणरायाच्या आगमनाला अवघा एक महिना राहिला आहे. त्यामुळे अलिबासह पेण व इतर कला केंद्रांत मूर्तींचे रंगकाम वेगाने सुरु झाले आहे. स्थानिक कामगारांच्या मदतीने हे काम युद्ध पातळीवर केले जात आहे. त्यामुळे ग्राहकांना गणेशमूर्ती वेळेवर देण्यासाठी रंग कामाची लगबग वाढली आहे.

कोकणासह रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव जल्लोषात साजरा केला जातो. यावेळी दीड दिवसांपासून ते दहा दिवसांसाठी एक लाखाहून अधिक गणेशमूर्ती विराजमान होणार आहेत. पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

"गणेशमूर्तींना रंग देण्याचे काम वेगात सुरू आहे. स्थानिक कामगार हे काम करीत आहेत. अतिवृष्टीचा गणेश कला केंद्राला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे यावर्षी गणेशमूर्तींच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. यंदा टिटवाळा गणेशमुर्तीला अधिक मागणी आहे. तसेच, सर्वात जास्त पीओपीच्या मूर्तींना ग्राहकांनी अधिक पसंती दर्शविली आहे."

**– रणजीत तुणतूणे,** आयुष कला केंद्र, सहाणगोठी

# आश्रम शाळांमध्ये सुविधांचा अभाव




■ अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकाऱ्यांना निलंबित करा
■ शेतकरी कामगार पक्षाची मागणी

| गडचिरोली | प्रतिनिधी |

२२ हजार कोटींचा वार्षिक बजेट असलेल्या आदिवासी विभाग गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड प्रकल्पा अंतर्गत एकाही आश्रम शाळेला आजपर्यंत बेड पुरवठा आलेले नाहीत. गडचिरोली प्रकल्पांतर्गत आश्रमशाळांमध्येही अनेक असुविधा आहेत. जिल्ह्यातील ८० टक्के आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थी जमिनीवर गाद्या टाकून झोपतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सुविधा देण्यासाठी नाकाम ठरलेल्या आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा व अंमलबजावणीत दुर्लक्ष केल्याप्रकरणी अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना तातडीने निलंबित करावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या आदिवासी, भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते यांनी केली आहे.

रामदास जराते यांनी म्हटले आहे की, जपतलाई येथील प्रकरणानंतर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने जिल्ह्यातील आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. यावेळी जिल्ह्यातील अनेक आश्रमशाळांमध्ये शासनाने बेड पुरविलेच नसल्याचे, फाटक्या अस्वच्छ गाद्या आणि बेडशिट-चादर, आंघोळीसाठी गरम पाण्याची निकामी सुविधा, भोजनासाठी टेबल नसल्याने खाली बसून जेवण करावे लागणे, अपूरा कर्मचारी वर्ग, अनेक शाळांमध्ये महिला अधिक्षक व्यतिरिक्त इतर एकही महिला कर्मचारी अक्षरशः महिला शिक्षिकही नसल्याचे दिसून आले. इमारतींचा डोलारा उभा राहिला आहे; मात्र, अनेक आवश्यक सोयी आदिवासी विभागाने शाळांना पुरविलेल्याच नसल्याची धक्कादायक परिस्थिती उघडकीस आली. आश्रमशाळा सुरू होऊन दोन महिन्यांचा कालावधी लोटूनही स्वयंपाकासाठीचा गॅस सुद्धा शासनाने उपलब्ध करून दिला नाही. मच्छरदाण्यांची वाणवा आहे. महत्त्वाचे म्हणजे बेडच नसल्याने मच्छरदाणी वापरताच येत नाहीत. त्यामुळे आता आदिवासी मुले सापांपासून बचावले तर डेंग्यू-मलेरियाने मरतील, अशी भयावह परिस्थिती असल्याचे जराते यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी, जपतलाई येथील शाळेने बेडची व्यवस्था केली नाही तर प्रकल्प अधिकारी आणि अप्पर आयुक्त यांनी त्या शाळेला वर्षानुवर्षे अनुदान का दिले? संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या शाळाआश्रम शाळांमध्ये बेड उपलब्ध करून देऊ न शकल्याच्या लज्जेपोटी संस्थेला जाब विचारला नाही का? संस्थेकडून कमिशन लाटल्यामुळे हे अधिकारी संबंधित संस्थेकडून सुविधा उपलब्ध करून घेऊ शकले नाहीत का? याची चौकशी होणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांना तातडीने निलंबित करण्याची कारवाई शासनाने करावी. तसेच, त्या विभागाला राज्यात सर्वात मोठा बजेट आहे. असे असतानाही आदिवासी विद्यार्थ्यांना सुविधा पुरवू न शकलेल्या आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. जर मंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने मंत्र्यांच्या मुंबईतल्या शासकीय बंगल्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही रामदास जराते यांनी दिला आहे. तसेच, आदिवासी मुलांच्या शिक्षणात राजकारण आणण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी न करता शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंतीही रामदास जराते यांच्यासह भाई शामसुंदर उराडे, डॉ. गुरुदास सेमस्कर, महिला नेत्या जयश्री वेळदा, युवक नेते अक्षय कोसनकर, रमेश चौखुंडे, प्रभाकर गव्हारे, डंबाजी भोयर, दामोदर रोहणकर, अशोक किरंगे, पांडुरंग गव्हारे, तुळशिदास भैसारे, राजू केळझरकर, चिरंजीव पेंदाम, चंद्रकांत भोयर, योगेश चापले, कविता ठाकरे, सोनाली कवडो, रोहिणी उईके, कविता मेश्राम, संगिता चांदेकर यांनी केली आहे.

## विद्यार्थी नेतृत्व परिषदेचा शपथविधी सोहळा उत्साहात




| खोपोली | प्रतिनिधी |

प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, खोपोली येथे विद्यार्थी नेतृत्व परिषद २०२६-२७ चा पदग्रहण व शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारी, सेवाभाव आणि लोकशाही मूल्ये रुजविणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमास खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन शांताराम हिरे, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, के.टी.एस.पी. मंडळाचे उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, संस्थेचे अध्यक्ष दिनेश गुरव, विश्वस्त राजेश अभाणी आणि प्राचार्य डॉ. गौरव एन. तिवारी उपस्थित होते.

यावेळी हेड बॉय म्हणून सार्थक बाबासाहेब खोजे, हेड गर्ल म्हणून एलेना राजू इलंजीकल, तर उपविद्यार्थी प्रमुख म्हणून प्रेम अनिल भालेराव आणि अनन्या महेश पाटील यांनी पदभार स्वीकारला. विविध हाऊसचे कॅप्टन, उपकॅप्टन, प्रीफेक्ट्स तसेच सांस्कृतिक, आरोग्य, वित्त व शिस्त मंत्र्यांनाही पदचिन्हे प्रदान करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्ये, शिस्त आणि जबाबदारी जपण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. गौरव तिवारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत बॅच हा अधिकाराचा नव्हे, तर जबाबदारीचा प्रतीक असल्याचे सांगितले. सर्व पदाधिकाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभावाची शपथ घेतली.

## स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

### अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

| पनवेल | प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनी नवी मुंबईतील नामांकित बिल्डर अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने हजारो विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, छत्री आणि वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता कर्जत फाटा जवळील एन. डी. स्टुडिओ येथे या भव्य सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नामदार ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहेत.

आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, तसेच त्यांना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजक अशोक छाजेड यांनी सांगितले.

या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होणार असून, त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन ट्रस्टचे उपाध्यक्ष ॲड. संतोष खांडेकर यांनी केले आहे.

## पान १ वरून

### बंडखोरांना मुख्यमंत्री बनवणे बेकायदेशीर

शिंदे गटाला चिन्ह देऊ शकत नाही, अशा शब्दात ज्येष्ठ विधिज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडताना निवडणूक आयोगाचे पुन्हा वाभाडे काढले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाने जनता दलाच्या वादातील निकालाचा आधार घेतला होता. सिब्बल यांनी स्पष्ट केले की, तो निर्णय संघटनात्मक बहुमतावरआधारित होता, कारण त्या प्रकरणात बोम्मई यांचे पक्षाध्यक्षपद संपुष्टात आले नव्हते. बदलत्या परिस्थितीनुसार किंवा घडामोडींनुसार बहुमत ठरवण्याची चाचणी प्रत्यक्षात फेटाळली गेली आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच, पक्षातील फुटीला मान्यता मिळवण्यासाठी आवश्यक असलेले १/३ संख्याबळ गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने आमदारांचे संख्याबळ वाढवत जाता येत नाही. पहिल्या कारवाईनंतर घडलेल्या कोणत्याही गोष्टीचा विचार फूट किंवा विलीनीकरणाच्या वैधतेसाठी केला जाऊ शकत नाही. जर अशा प्रकारे हळूहळू आमदार गोळा करून अपात्रतेपासून संरक्षण मिळवण्यास परवानगी दिली, तर तो १०व्या अनुसूचीच्या मूळ हेतूच्या अगदी उलट अर्थ लावणे ठरेल. १० व्या अनुसूचीचा मूळ हेतू हा पक्षांतर रोखणे हा आहे, पक्षांतराला कायदेशीर मान्यता देणे किंवा त्याला संरक्षण देणे हा नाही. जेव्हा पक्ष किंवा गट सभापती किंवा निवडणूक आयोगाकडे दाद मागण्यासाठी जातो, तीच तारीख अंतिम मानली पाहिजे आणि त्याच्या आदल्या दिवशीची वस्तुस्थिती काय होती हेच महत्त्वाचे ठरते. सभापतींनी निर्णय प्रलंबित ठेवून परिस्थिती बदलू देणे आणि बंडखोरांना मुख्यमंत्री बनू देणे बेकायदेशीर असल्याचे सिब्बल म्हणाले.

### बोडणवाडी फाट्यावर खैर लाकडाची जप्ती

सुमारे २:०० वाजण्याच्या सुमारास एक संशयास्पद एर्टिगा कार उभी असल्याचे पोयनाड पोलिसांच्या गस्ती पथकाला आढळले. यावेळी पोलिसांनी वाहनाची कसून तपासणी केली असता, त्यात खैर प्रजातीचे ३३ ओंडके बेकायदेशीररीत्या भरलेले आढळून आले. पोलिसांनी तात्काळ सर्व मुद्देमाल आणि ५ आरोपींना अलिबाग वनक्षेत्राकडे सुपूर्द केले. या कारवाईत कुमार शंकर पवार (कोलाड), राकेश त्रिंबक नाईक (कामोठे), आनंद बाबु शेट्टी, वासु सुनील चव्हाण आणि वैभव गणेश चौधरी (तिघेही सी.बी.डी. बेलापूर) या पाच जणांना अटकरण्यात आली असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईदरमान पथकात उप वनसंरक्षक अलिबाग उमेश वावरे (भा.व.से.), सहाय्यक वनसंरक्षक भाऊसाहेब जवरे आणि परिक्षेत्र वन अधिकारी मिलिंद राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल निलेश चांदोरकर, नितीन हाडे तसेच वनरक्षक उदय हटवार, संपदा कदम, राजेंद्र पवार, अभिषेक चौधरी, सरला वाडकर आणि किरण कळमकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या कारवाईनंतर रायगड जिल्ह्यातील लाकूड तस्करीच्या गंभीर स्वरूपावर जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. कमी वेळात जास्त पैसा कमवण्याच्या हव्यासापोटी हे तस्कर थेट परदेशात लाकूड पाठवत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. अशा आंतरराष्ट्रीय सिंडिकेट आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तस्करांमुळे स्थानिक शांततेला आणि सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला आहे. रायगड जिल्ह्यात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन ही तस्करी सर्रास आणि सर्वत्र सुरूच असते, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. ''शासनाने आणि वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी जर संपूर्ण जंगल क्षेत्राचे ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे अत्याधुनिक सर्वेक्षण केले, तर या संपूर्ण काळ्या धंद्याचे बिंग फुटेल. केवळ तस्करच नाही, तर या धंद्याला मूक संमती देणारे काही भ्रष्ट सरकारी अधिकारी आणि कर्मचारी देखील यात गुंतलेले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होऊन संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्याची गरज निर्माण झाली आहे,'' असे जनतेतून उघडपणे बोलले जात आहे.

### आज अलिबागमध्ये तिरंगा बाईक रॅली

अलिबाग शहरातील नगरपरिषदेच्या कार्यालय परिसरातून रॅलीला सुरुवात होणार असून, ही रॅली लिलॅक हॉटेल मार्गे बस स्थानक, महावीर चौक, ब्राह्मणआळी (राममंदिर), युनियन बँक ऑफ इंडिया कार्यालय, जूनी नगर परिषद कार्यालय, बालाजी नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जूनी बाजारपेठ, जामा मशिद, मारुती नाका, पोस्ट कार्यालयामार्गे अलिबाग समुद्रकिनारा अशी ही रॅली काढली जाणार आहे. यादरम्यान, प्रत्येक दुचाकीवर भारताचा राष्ट्रध्वज फडकणार आहे. या रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीची भावन जागरूक करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### ३ लाख ७१ हजार रुपयांचा अपहार

रोडपाली येथील रहिवाशी आहेत. आरोपी लोकेश पवार हा मोतीलाल ओसवाल होम फायनान्समध्ये रिकव्हरी अधिकारी म्हणून कार्यरत होता. त्याने नारायण बाबा यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या कर्जाची उर्वरित ५ लाख १२ हजार रुपयांची रक्कम २ लाख १ हजार रुपयांत सेटलमेंट करून देण्याचे आश्वासन दिले. या सेटलमेंटसाठी नारायण बाबा यांच्याकडून लोकेशने ३ लाख ७१ हजार रुपये घेतले. मात्र, ही रक्कम बँकेत जमा करणे आवश्यक असतानाही त्याने ती जमा केली नाही. उलट, रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करून अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

### एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

'लेव्हल-२' घोषित केली. या दुर्घटनेत दोन वर्षांचा चिमुकला अबान शेख, त्याचा चार वर्षांचा भाऊ मनत शेख व त्यांची आई मरजिना शेख (२७) या एकाच कुटुंबातील तिघांचा करुण अंत झाला. त्याचबरोबर मोहम्मद अन्सारी (१४), साहिल काझी (१९), विकेत रमेश यादव (२७) यांचा देखील या दुर्घटनेत मृत्यू झाला असून, तर, एका मृताची ओळख पटलेली नाही.

### समुद्रात गाडी अडकली

गाडीमध्ये पाणी शिरले. त्यानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत जेसीबी वाल्याला पाचारण केले. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने गाडी बाहेर काढण्यात आली. दरम्यान, सर्व समुद्रकिनाऱ्यांवर जागोजागी 'गाडी किनाऱ्याजवळ नेऊ नये किंवा समुद्र खवळलेला असल्यामुळे पर्यटकांनी देखील समुद्रस्नानासाठी जाऊ नये', अशा आशयाचे फलक लावलेले आहेत. असे असतानाही अतिउत्साही पर्यटकांकडून अशा प्रकारच्या घटना नेहमीच घडत असतात. या घटनेची तातडीने दखल घेऊन अति उत्साही पर्यटकांवर प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

### गणेशमूर्तींच्या रंग कामाची लगबग

गणेश कला केंद्रांमध्ये शाडू मातीसह पीओपीच्या गणेशमुर्ती तयार करण्यात आल्या आहेत.हाताळण्यास सोप्या व वजनाने हलक्या असलेल्या पीओपी मूर्तीला अधिक मागणी असल्याचे ग्राहकांनी सांगितले. ग्राहकांच्या मागणी व पसंतीनुसार मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. यंदा टीटवाळा येथील गणेशमूर्तीला अधिक पसंती दर्शविली आहे. आता या मूर्तींना रंग देण्याचे काम सुरु झाले आहे. बाप्पाचे आगमन होण्यासाठी अवघे ३१ दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे रंगकाम करण्याचा वेगही वाढला आहे. यावेळी सकाळ व रात्र पाळी या दोन टप्प्यात हे काम केले जात आहे. रंगकाम करण्यासाठी तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात कला केंद्रात कामगार म्हणून लाभले आहेत. त्यामुळे पुढील पंधरा दिवस तरी त्यांना पाचशे ते सहाशे रुपयांच्या रोजंदारीवर हाताला काम मिळाले आहे. यंदा जून ते जूलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गणेशमूर्त्यांचे नुकसान झाल्यामुळे मूर्तींच्या किंमतीमध्ये २० ते २५ टक्के वाढ झाली आहे. २ फुटापासून १० फुटापर्यंतच्या मूर्तींच्या किंमतीमध्ये ५०० रुपयांपासून १३ हजार रुपयांपर्यंत किंमत वाढली असल्याचे मूर्तीकारांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना मूर्तीमागे अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

**मूर्तींच्या किंमती व दृष्टीक्षेप**

| मूर्तींची उंची | पूर्वीचे दर | आताचे दर |
|---|---|---|
| २ फुट | २,५०० रु. | ३,००० रु. |
| ३ फुट | ३,००० रु. | ५,००० रु. |
| ६ फुट | १५,००० रु. | २५,००० रु. |
| १० फुट | ३२,००० रु. | ४५,००० रु. |

### पांडवकडा धबधब्यावर तरुणाचा बचाव

खारघर येथील पांडवकडा धबधब्यावर गुरूवारी (दि.१३) दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास अग्निशमन केंद्राला एक व्यक्ती बुडाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर फायर जीपसह जवान घटनास्थळी दाखल झाले. धबधब्यात पाण्याचा वेग मोठा असल्याने सुरुवातीला दोरीच्या साहाय्याने शोध घेण्यात आला. मात्र, बुडालेली व्यक्ती आढळून आली नाही. त्यानंतर अग्निशमन जवानांनी पाण्यात उतरून परिसरात शोधमोहीम राबवली. यावेळी एका दगडाच्या कपारीत अंदाजे १० ते १२ फूट खोलवर एक तरुण आढळून आला. जवानांनी त्याला शिताफीने पाण्याबाहेर काढून स्ट्रेचरवर ठेवले. त्यानंतर डोंगराच्या खाली आणून घटनास्थळी उपस्थित असलेल्या रुग्णवाहिकेतून त्याला पुढील उपचारांसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. या बचावकार्यात अग्निशमन प्रणेता प्रशांत देरेकर, फायरमन सूरज पाटील, प्रीतम पाटील, चेतन पवार आणि कौस्तुभ वायदंडे यांनी सहभाग घेतला. तसेच, यावेळी खारघर पोलीस ठाण्याचे कर्मचारीही उपस्थित होते.

### महाडमध्ये अवैध दारूसाठा जप्त

प्रभारी पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक व त्यांच्या पथकाला महाड एस.टी. बसस्थानक परिसरातील स्वच्छतागृहाजवळ एक व्यक्ती संशयास्पदरीत्या प्लास्टिक गोणी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर महाड शहर पोलिसांनी मंगळवारी रात्रीच्या सुमारास त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी संशयित व्यक्ती अमित साळुंके याला ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्याच्याकडून विविध ब्रँडच्या व्हिस्कीच्या बाटल्या तसेच देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १८० मिलीच्या १० बाटल्या, मॅकडोवेल नं. १ व्हिस्कीच्या १८० मिलीच्या ४ बाटल्या, मास्टर्स डिलाईट व्हिस्कीच्या १८० मिलीच्या १६ बाटल्या, मास्टर्स डिलाईट व्हिस्कीच्या ९० मिलीच्या २० बाटल्या तसेच देशी दारूच्या ९० मिलीच्या ५० बाटल्या यांचा समावेश आहे. याशिवाय एमएच-१२/पीडी-५५८९ क्रमांकाची कोकंबी रंगाची टीव्हीएस स्कूटी देखील पोलिसांनी जप्त केली आहे. या कारवाईत एकूण ६९ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### टोरंटविरोधात आदिवाशांचा मोर्चा

नाही,' असा निर्धार देखील केला. यावेळी प्रांत अधिकारी अनुपस्थित असल्याने प्रांत अधिकारी कार्यालयाचे नायब तहसीलदार पवार यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी बोलताना, कार्यकर्ते शंकर हिलम यांनी, 'आमच्या पाच आदिवासी वाड्या ९६ एकराच्या जमिनीवर वसल्या आहेत. पूर्वी या जमिनीमध्ये आमचे आदिवासी लोक नाचणी, वरी व इतर कडधान्य लावत होती. मात्र, आता या ठिकाणी भात शेती आणि भाजीपाला लावला जातो. त्यामुळे आम्ही आमची जमीन देणार नाही,' असे सांगितले. तर, संघटनेचे अध्यक्ष केशव पवार यांनी, 'जरी आम्ही अडाणी असलो तरी आमची पोरं बाळं आता शिकलेली आहेत. ती देखील या शेतीमध्ये राबत आहेत. हे लोक तिथे येऊन आम्हाला आमच्या जागेवरून हकलवत आहेत. त्यामुळे पोलीस यंत्राणेचे आम्हाला सहकार्य हवे आहे,' असे ते म्हणाले. सुशीला भोई यांनी, 'या ठिकाणी आम्ही चार पिढ्यांपासून राहत असून, पूर्वजांपासून येथील जंगल राखलेले आहे. जो आम्हाला जंगलात जाण्यासाठी रस्ता आहे तो रस्ता देखील पूर्णपणे बंद केला आहे. त्यामुळे हे सरकार नक्की कोणाच्या बाजूने काम करीत आहे,' असा सवाल देखील त्यांनी केला. दरम्यान, 'ही जागा आम्ही देणार नाही. आम्हाला आणखी आंदोलने करावी लागली तरी चालतील. आम्ही त्यासाठी अलिबागला जाऊन मोर्चा काढू, पण ही जागा आम्ही तुम्हाला देणार नाही,' असा निर्धार व्यक्त केला.

## विहान गायकरचे शिष्यवृत्तीत यश

| धाटाव | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या इयत्ता चौथी आणि सातवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या २०२५ च्या अंतरिम निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याने विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



रोहा तालुक्यातील कोलाड येथील इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थी विहान गायकर यांनी या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करत रोहा तालुक्यातील ग्रामीण भागामधील इंग्रजी माध्यमातून तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. या परीक्षेत असंख्य विद्यार्थ्यांनी आपल्या बौद्धिक क्षमतेच्या जोरावर यश संपादन केले असता रोहा तालुक्यातील कोलाड येथील इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थी विहान सागर गायकर याने या परीक्षेत यश प्राप्त करत रोहा तालुक्यातील ग्रामीण भागामधील इंग्रजी माध्यमातून तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. त्याचबरोबर MPSS इंग्लिश मीडियम स्कूलमधील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांमधूनही स्कूलमधून प्रथम येण्याचा बहुमान पटकावल्याने विहान सागर गायकर याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) मंगेश तुकाराम म्हात्रे, २) सचिन सुरेश म्हात्रे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे वढाव खुर्द, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव खुर्द ता.अलिबाग | १ | ०-२०-०० | ५.०५ |

दिनांक : १४/०८/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड मोबा. ९७६७०१०९०२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिन, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र | | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हे.. | आर. | पॉ | रुपये | पैसे |
| २२ | १०/अ | ० | ७ | २० | ९० | ०८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :-१४/०८/२०२६
मो.नं.८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे दिव, ता.पेण, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनांची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती.वत्सला गजानन पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे - दिव, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीमती.वत्सला गजानन पाटील | १७३ | - | ०.१३.४० | १.२५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती.वत्सला गजानन पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १४/०८/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता:फ्लॅट नं.ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि.रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण.**
e-mail-dest_raigad@rediffmail.com
दूरध्वनी क्र.८२७५०६६४००

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/८०१ दिनांक :- १०/०८/२०२६

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र.०२/२०२६**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण- रामवाडी हे या विभागामार्फत मुंबई - गोवा या राष्ट्रीय/राज्य महामार्गांवरील खारपाडा ते कशेडी व कशेडी ते खारपाडा या हद्दीतील हॉटेल-मोटेलच्या ठिकाणी रा.प. बसेसना अधिकृत थांबा देण्याबाबत विचाराधीन आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | किमान अपेक्षित थांबा देकार रक्कम प्रतिबस प्रतिदिन प्रमाणे | | | थांबा आकार रक्कमेवर वस्तु व सेवाकर | प्रस्ताव सादर करताना भरणा करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साधी बस | निमआराम (हिरकणी) बस | वातानुकूलित व इतर सर्व प्रकारच्या बस | | |
| १. | मुंबई-गोवा | रू.२५०/- | रू.२६०/- | रू. ३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |

अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमान अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणाऱ्या हॉटेल चालक-मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना निविदा प्रपत्रात नमुद करून सदरचे निविदा प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.

निविदा प्रपत्राचे फॉर्म, अटी व शर्ती फॉर्म तसेच प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण रामवाडी येथे दि. ११.०८.२०२६ ते दि.२५.०८.२०२६ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू. २०००/- + १८% वस्तु व सेवाकर असे एकूण रू.२,३६० /- परतावा केला जाणार नाही. व बयाणा रक्कम रू.१,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस प्रस्ताव प्रपत्र फॉर्म मिळतील. दि.२५.०८.२०२६ रोजी १३.०० वाजेपर्यंत बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि. २५.०८.२०२६ रोजी १३.०० वाजल्या नंतर प्रस्ताव फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

हॉटेल प्रस्ताव स्विकारण्याची शेवटची दिनांक २५.०८.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील व तद्नंतर उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेले, स्वाक्षरी नसलेले व आवश्यक मुळ कागदपत्रे प्रस्तवाच्या सोबत न जोडल्यास प्रस्ताव अपात्र समजण्यात येईल. प्रस्ताव शक्यतो दि.२५.०८.२०२६ रोजी १५.३० वाजे पर्यंत उघडण्यात येईल.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प. रायगड विभाग, पेण**

# जिल्ह्यात तिरंगा रॅली उत्साहात



## चिमुकल्यांची रंगली अनोखी पाककला स्पर्धा

### अलिबाग नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

हर घर तिरंगा अभियानाला यंदा अलिबागमध्ये चवदार आणि सर्जनशील रूप मिळाले. अलिबाग नगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे नगरपालिका शाळा क्रमांक १ ते ६ मधील विद्यार्थ्यांसाठी तिरंगा थीमवर आधारित पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध प्रकारचे आकर्षक, पौष्टिक आणि कल्पक पदार्थ सादर करत तिरंग्याविषयीचा अभिमान आपल्या कलाकृतीतून व्यक्त केला.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी केशरी, पांढरा आणि हिरवा या तिरंग्याच्या रंगसंगतीचा वापर करून सँडविच, इडली, सलाड, मिठाई, लाडू, केक, फ्रूट डिश, उपमा आदी अनेक पदार्थ तयार केले. प्रत्येक पदार्थामागे देशप्रेम, स्वच्छता, आरोग्य आणि भारतीय संस्कृतीचा संदेश दिसून आला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे विशेष कौतुक केले.



या उपक्रमाला अलिबाग नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी वाघ, शिक्षण विभाग प्रमुख बोरे, उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, नगरसेविका अश्विनी ठोसर, योजना पाटील तसेच नगरसेवक जमाल सय्यद यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

यावेळी परीक्षकांनी पदार्थांची मांडणी, तिरंगा संकल्पनेचा प्रभावी वापर, स्वच्छता, पौष्टिकता आणि सर्जनशीलता या निकषांवर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले. चिमुकल्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने आपल्या पदार्थामागील कल्पना उपस्थितांसमोर मांडल्याने स्पर्धेला शैक्षणिक मूल्यही लाभले.

> तिरंगा हा केवळ आपल्या राष्ट्रध्वजाचा सन्मान नाही, तर तो प्रत्येक भारतीयाच्या संस्कारांचा आणि अभिमानाचा प्रतीक आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासाची जपणूक होते, हीच या स्पर्धेची खरी जमेची बाजू आहे.
> – ॲड. मानसी म्हात्रे
> उपनगराध्यक्षा,
> अलिबाग नगर परिषद

समारोपावेळी मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये राष्ट्रप्रेमाबरोबरच कला, कौशल्य आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे मत व्यक्त केले. हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाचा उत्साह प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आली.

**जिल्ह्यात स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलींमध्ये नागरिकांचा मोठा उत्साह आणि राष्ट्रभक्तीचा प्रचंड जोश पाहायला मिळाला. या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थी, शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती दिसून आली होती. देशभक्तीची भावना नागरिकांच्या मनात अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. हातात तिरंगा झेंडा, देशभक्तीपर गीते आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी संपूर्ण जिल्हा दुमदुमून गेला होता.**

## महाड शहरात देशभक्तीचा जागर

| महाड | प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर महाड, पोलादपूर, गोरेगाव, निजामपूर येथील भारतीय नागरिकांच्या वतीने महाड शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजत करप्यात आले हातात तिरंगा घेऊन मोव्या संख्येने नागरिक. विघार्थी. शिक्षक, कर्मचारी व विविध क्षेत्रातील मान्यवर या रॅलीत सहभागी झाले होते या रॅलीमध्ये महाडचे तहसीलदार महेश शितोळे, विपीन महामुनकर, महेश शिंदे, अमित मोरे, प्रमोद महाडीक, संकेत वारंगे आशीष फळसकर, महाड शहर पोलीस निरीक्षक नरायण इकशिंगे, व कर्मचारी, तसेच महाड नगरपरिषद शाळांमधील शिक्षक व विद्यर्थी सहभागी झाले. याशिवाय एम. एम. जगताप कॉलेज आणि कोएसोच्या वि. ह. परांजपे विद्यालयातील शिक्षक व विघाध्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. हातात तिरंगा आणि ओठांवर देशभक्तीच्या घोषणा देत रॅली शहरातील प्रमुख मागांवरून मार्गस्थ झाली. 'वंदे मातर, भारत माता की जय, जय हिंद' अशा घोषणांनी संपर्ण महाड शहर दुमदुमुन गेले. रॅलीदरम्यान नागरिकांमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळाला. तर रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थी द श भ क्त ी प र घोषणा देत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह दिमाखात केला. तिरंगा रंगांनी सजलेले शहर आणि मोठ्या संख्येने सहभागी झालेला जनसमुदाय यामुळे महाडमध्ये देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## देशभक्तीच्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली

| तळा | प्रतिनिधी |

भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला असल्याने तिरंगी झेंडे, सदरे, रिबीन, बिल्ले तिरंगा रांगोळी, तिरंगी पताका अशा विविध देशभक्तीच्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. पूर्वी ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय आशा विविध शासकीय कार्यालयांमध्येच राष्ट्रध्वज फडकविण्याची परवानगी होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र राष्ट्रध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आल्याने शर्टवर लावण्यासाठी, गाडीवर लावण्यासाठी लहान मुलांना रॅलीमध्ये हातात धरण्यासाठी हे साहित्य लागत असल्याने या देशभक्तीच्या साहित्यांना बाजारपेठेत मागणी वाढली आहे. बाजारपेठेत चार दिवस आधीपासूनच हे साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाल्याने नागरिकांकडून ते खरेदी करण्यासाठी गर्दी होत असल्याचे चित्र पहायला मिळाले.



## मॉर्निंग स्टार स्कूलमध्ये तिरंगा रॅली



| आगरदांडा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने जंजिरा विद्या मंडळ संचलित मॉर्निंग स्टार प्री प्रायमरी प्रायमरी स्कूल, मुरुड-जंजिरा येथे 'हर घर तिरंगा' अभियान तसेच 'वंदे मातरम' या राष्ट्रगीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीमध्ये १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर घोषणा देत परिसरात राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण केले.

या कार्यक्रमास शाळेच्या अदीश्री जोशी तसेच शिक्षक-शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## सुधागड पालीचा परिसर राष्ट्रभक्तीने दुमदुमला

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत तिरंगा रॅली अभियान राबविण्यात येत आहे. या देशव्यापी अभियानाचा एक भाग म्हणून गुरुवारी दि. (१३) रोजी सुधागड पाली येथे भव्य पायी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. बल्लाळेश्वर मंदिरापासून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत कार्यकर्ते, पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिकांनी हातात तिरंगा घेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भारतीय स्वातंत्र्यदिनाचा उत्सव प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्तीची भावना अधिक दृढ करणारा ठरावा, तसेच राष्ट्रध्वजाबद्दल आदर आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश जनमानसात पोहोचावा, या उद्देशाने या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .



'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान, देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या महापुरुषांचे योगदान आणि राष्ट्राच्या एकात्मतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या तिरंगा रॅलीत सुरेश खैरे, तहसीलदार उत्तम कुंभार, गटविकास अधिकारी लता मोहिते, तालुका आरोग्य अधिकारी डॉ शशिकांत मढवी, प्राचार्य डॉ. लहुपचांग, दादा घोसाळकर, सुधीर भालेराव, कल्याणी दपके, आलाप मेहता, अरिफ मनियार, आशिफ मनियार, श्रीकांत ठोंबरे, प्रणाली शेठ, नरेश खाडे, सुशील शिंदे, सुजित बारस्कर, सुनिल राऊत, ललित ठोंबरे, रोहन दगडे, महंम्मद भाई धनसे, रोशन चाफेकर, वैभव कुलकर्णी, शर्मिला बोडके, चंद्रकांत वारगुडा, जागृती मानकर, संदेश शेवाळे, प्रणिता परदेशी, पराग मेहता, सुलतान बेणं सेकर, आदिसह, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी शिक्षक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नांदगावमध्ये जागवली राष्ट्रप्रेमाची भावना

| कोर्लई | प्रतिनिधी |

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रध्वजाबद्दल आदराची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने मुरुड तालुका भव्य तिरंगा रॅली आयोजक समितीचे आयोजक शैलेश काते यांच्यातर्फे सिद्धिविनायक मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज नूतन विद्यालय अशी भव्य रॅली काढण्यात आली. याप्रसंगी निलेश घाटवळ, रमेश नागावकर, सेजल घुमकर, प्रतिक पेडणेकर, शैलेश काते, अस्लम हलडे, अरविंद शेडगे, इम्तियाज मलबारी, जयवंत अंबाजी, केतन मांदाडकर, मुब्बशिर लालसे, कल्पना आयरे, मेघा कुलकर्णी, विक्रांत कुबल, योगेंद्र गोयजी, संतोष जमनू, विकास दिवेकर, नथूराम शेडगे, फैरोज घलटे, यशवंत पाटील, संदीप गोणबरे आदी सहभागी झाले होते.

## पेणमध्ये तिरंग्याचा महासागर

| पेण | प्रतिनिधी |

पेण शहरात गुरुवार (दि.१३) ऑगस्ट रोजी महाभव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. पेण नगरपालिकेच्या पुढाकाराने झालेल्या या रॅलीत हजारो विद्यार्थी, शिक्षक, नगरपालिका कर्मचारी, लोकप्रतिनिधी, माजी सैनिक आणि नागरिक सहभागी झाले. तिरंग्यांच्या लाटेसह देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण पेण शहर दुमदुमून गेले.

रॅलीच्या प्रारंभी पेण नगरपालिका कार्यालयाच्या परिसरात राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. त्यानंतर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धपुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली आणि त्यानंतर महाभव्य तिरंगा रॅलीला सुरुवात झाली.

पेण नगरपालिका कार्यालयापासून सुरू झालेली ही रॅली आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्ग, पंखा पाटील चौक आणि राजू पोटे मार्गे पुन्हा पेण नगरपालिका कार्यालयापर्यंत आली. रॅलीचा एक टोक पेण नगरपालिका कार्यालयाजवळ, तर दुसरे टोक मोरेश्वर थिएटरपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे संपूर्ण शहर तिरंग्यांनी अक्षरशः व्यापून गेले होते. या रॅलीमध्ये पेण नगरपालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी तसेच पेण शहरातील विविध शिक्षण संकुलांतील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी शहरातील वातावरण भारावून गेले होते.

या भव्य रॅलीमध्ये लोकप्रतिनिधी तसेच पेणमधील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी पेण नगरपालिकेच्या वतीने पिण्याचे पाणी तसेच खाऊची व्यवस्था करण्यात आली होती. पेणच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर तिरंगा रॅली निघाल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात होते. राष्ट्रगीताने झालेली सुरुवात, महाराष्ट्र गीताचा स्वर, बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन आणि त्यानंतर तिरंग्यांच्या महासागरात निघालेली रॅलीमुळे आजचा दिवस पेणकरांच्या स्मरणात राहणारा ठरला.




## यशवंतनगर पंचक्रोशीत देशभक्तीपर गीत

| आगरदांडा | प्रतिनिधी |

देशाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर मुरुड तालुक्यातील नांदगाव, माजगाव, उसरोली या पंचक्रोशीत नागरिकांनी मोठ्या उत्साहात भव्य तिरंगा रॅली काढली. नांदगावच्या सिद्धिविनायक मंदिरापासून निघालेल्या या रॅलीत येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हातात तिरंगा घेऊन भारतमाता की जय, वंदे मातरम्, जय जवान जय किसान आदी घोषणा देत तसेच ऐ मेरे वतनके लोगो, दिल दिया है जान भी देंगे ऐ वतन तेरे लिये, जय हो अशा अनेक देशभक्तीपर गीतांनी यावेळी वातावरण भारावून गेले होते.



नांदगावच्या सेजल घुमकर, मेघा मापगावकर, प्रतीक पेडणेकर, शिक्षक-शिक्षिका, अस्लम हलडे, विद्याधर चोरघे, गणेश गाणार, सचिन पाटील, योगेंद्र गोयजी, योगेश जैस्वाल, शादाब सरडे, सिराज दखनी, ग्रामपंचायतीचे आजी माजी सदस्य, नांदगाव मजगाव, खारिकवाडा, उसरोली, वाळवटी आदी गावातील नागरिकांसह या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

## तिरंगा रॅलीतून देशभक्तीचे दर्शन

### नागाव ग्रामपंचायत, हायस्कूलच्या पुढाकाराने उपक्रम

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त नागाव ग्रामपंचायत व हायस्कूलच्यावतीने नागावमध्ये गुरूवारी (दि.१३) तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत विद्यार्थ्यांसह ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी तिरंगा हाती घेऊन सहभाग घेतला. त्यामुळे या रॅलीतून देशभक्तीचे दर्शन दिसून आले.

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य दिनाच्या ८० वा वर्धापन दिन शनिवारी (दि.१५) रायगड जिल्ह्यात साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने 'हर घर तिरंगा'या अभियानंतर्गत अलिबाग तालुक्यातील नागाव ग्रामपंचायत व हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.१३) तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सरपंच हर्षदा मयेकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या तिरंगा रॅलीची सुरुवात नागाव हायस्कूलमधून करण्यात आली.





या रॅलीची सांगता नागाव ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या आवारात झाली. यावेळी सरपंच हर्षदा मयेकर, सदस्य प्रियंका काठे, निकिता पाडेकर, मंगला नागे, मुख्याध्यापक अजित पाटील, शिक्षक मोहन पाटील, जान्हवी बनकर, सुप्रिया पाटील, वर्षा पाटील, तनिष्का नाईक, मनोज कासार, चंद्रकांत गिरी, मंजुषा पाटील, विश्वा भगत यांच्यासह शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी हातामध्ये झेंडा घेत 'भारत माता की जय', अशा घोषणा दिल्या. तसेच, या रॅलीतून देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करीत देशभक्तीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला.

# टाटा टिकतील?

टाटा समुहातील भांडणे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहेत. टाटांच्या सगळ्या कंपन्याची पालक आणि मालक कंपनी आहे टाटा सन्स. तिच्या अध्यक्षपदावर राहण्यात आपल्याला रस नाही असे एन चंद्रशेखरन यांनी बुधवारी जाहीर केले. चंद्रा हे गेली नऊ वर्षे अध्यक्ष होते व त्यांची मुदत फेब्रुवारी २०२७ ला म्हणजे येत्या सात महिन्यांमध्ये संपणार आहे. चंद्रा हे पारशी नसलेले पहिलेच अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांचे बरेच कौतुक झाले. पण आता नोएल टाटा यांच्याशी मतभेद झाल्याने अंतिमतः ते बाहेर जाणार असे चित्र आहे. भारतीय उद्योगांमध्ये टाटांचा पूर्वापार दबदबा असला तरी अलिकडे त्यांची घडी बिनसली आहे. टाटांच्या अनेक कंपन्या आज तोट्यात आहेत. किंबहुना, १९९१ नंतरच्या उदारीकरणाच्या टप्प्यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस किंवा टीसीएस ही वगळता इतर कंपन्या सतत तोट्याच्या आतबाहेर राहिलेल्या आहेत. टीसीएसने सॉफ्टवेअरमधल्या संधींचा तुफान फायदा घेतला व त्याच्या बळावर आजतागायत ती टाटा समुहाच्या बाकी कंपन्यांचा तोटा भरून काढत आलेली आहे. आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआयच्या काळात टीसीएसपुढेही मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा परिणाम म्हणून कंपनीने नवी भरती थांबवलेली आहे. तिच्या शेअरच्या किमती तब्बल शंभर अब्ज रुपयांनी खाली आल्या आहेत. नेमक्या याच वेळी चंद्रा यांचा नाराजीनामा पुढे आला आहे. चंद्रा हे मूळचे टीसीएसचे प्रमुख होते. नंतर त्यांना सर्व कंपन्यांची पालक असलेल्या टाटा सन्सवर आणले गेले. चंद्रा हे टाटांना सर्वदूर फायदा मिळवून देत असते तर त्यांना बाजूला करणे सोपे गेले नसते. तेही बाजूला झाले नसते. पण आता हा समूह अवघड स्थितीत असतानाच त्यातले विसंवाद जोरात पुढे येऊ लागले आहेत. टाटा समुहातील कंपन्यांची एकूण उलाढाल सुमारे १७ लाख कोटी रुपये आहे. महाराष्ट्र राज्याचे सकल उत्पादन सुमारे ५१ लाख कोटी आहे. म्हणजे महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याच्या एकतृतियांश किंवा ३३ टक्के इतका आकार टाटा समुहाचा आहे. टाटांच्या शेअर्सचे बाजारातले एकूण मूल्य सध्या सुमारे २६ लाख कोटी रुपये आहे. टाटा समुहात एकूण सुमारे साडेअकरा लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळे या समुहाचे बरेवाईट हे समाजावर व देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करणारे आहे. त्यातच टाटांचे मुख्यालय व टाटा मोटर्स, टीसीएससारख्या अनेक कंपन्या महाराष्ट्रातच आहेत. त्यामुळे हा मराठी लोकांच्या काळजीचा विषय ठरतो.

### एअर इंडियाचे विकतचे दुखणे

इतर उद्योगांपेक्षा टाटा वेगळे अशासाठी आहेत की इथे टाटा घराण्याची मक्तेदारी नाही. टाटा कुटुंबीयांकडे बहुतांश कंपन्यांचे फारच कमी शेअर्स आहेत. दुसरे म्हणजे टाटा सन्स ही सर्व कंपन्यांची मालक कंपनी असली तरी तिची मालकी पुन्हा काही दोराबजी ट्रस्ट आणि रतन टाटा ट्रस्ट अशांकडे आहे. या ट्रस्ट्सना होणारा नफा ते विविध समाजोपयोगी कामांसाठी वाटून टाकतात. अनेक विद्यार्थ्यांना त्यातून शिष्यवृत्त्या दिल्या जातात. मात्र हे सर्व चित्र गोंडस गुलाबी असले तरी आता त्याला सत्तास्पर्धेचे ग्रहण लागले आहे. शिवाय कंपन्यांचा मालक खंबीर नसल्याने खालचे कामही ढिल्या पध्दतीने होऊ लागले आहे. टाटा स्टील, टीसीएस, मोटारी व ट्रक बनवणारी टाटा मोटर्स, टायटन आणि टाटा टी अशा काही मोजक्या कंपन्या वगळता अनेक कंपन्या तोट्यात आहेत. ताजमहाल हॉटेल वगैरेंची मालक असलेली इंडियन हॉटेल्स ही कंपनी कधी तोट्यात तर कधी फायद्यात असते. टाटा मोटर्सने इलेक्ट्रिक कार बनवण्यात आघाडी घेतली असली तरी एकूण मोटार उद्योगात त्या कंपनीची पीछेहाटच झाली आहे. आजही मारुती सुझुकी, ह्युंदाई, महिंद्र या कंपन्या टाटांहून पुढे आहेत. रतन टाटांनी निवृत्तीनंतर पहिल्यांदा सायरस मिस्त्रींना समुहाचे मुख्यपद दिले. पण त्यांच्याशी त्यांचे जमले नाही. म्हणून २०१७ मध्ये चंद्रा यांना आणले गेले. चंद्रा यांनी टीसीएस उत्तम चालवली असली तरी त्यांना मिठापासून ते मोटारीपर्यंतच्या कंपनीचा कारभार चालवायला जमेल का ही शंका अनेकांना होती. पण रतन टाटा यांचे पाठबळ त्यांच्यामागे होते. या पाठिंब्याचा मोठा दबाव बहुदा चंद्रा यांच्यावर होता. या दबावाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे एअर इंडिया विकत घेण्याचा निर्णय. रतन टाटा यांना हवाई कंपनी आपल्या समुहात असावी असे वाटत होते. एअर इंडिया ही तर एकेकाळी त्यांचीच कंपनी होती. तिचेच नंतर सरकारीकरण झाले. म्हणून त्यांच्या आग्रहाखातर चंद्रा यांनी २०२२ मध्ये ती सरकारकडून खरेदी केली. तिचा महाप्रचंड तोटा आणि जुन्या सरकारी सवयी लागलेले कर्मचारी असे लचांडही चंद्रा यांनी विकत घेतले.

### सर्व आलबेल नाही

मुळात जगभरातच कुठेही विमान कंपन्या क्वचितच फायद्यात चालतात. अशा स्थितीत चंद्रा यांनी विकतचे दुखणे घेतले व आज एअर इंडियाचा तोटा २२ हजार कोटी रुपये आहे. गेल्या एका वर्षात हा तोटा दुप्पट झाला आहे. विशेष म्हणजे त्याचा महसूल जेमतेम ७१ हजार कोटी आहे. म्हणजे महसुलाच्या तीस टक्के तोटा आहे. केवळ टाटा सन्स भांडवल ओतते आहे म्हणूनच ती कंपनी जिवंत आहे. चंद्रा यांनी रतन टाटांच्या प्रेमाखातर ही कंपनी विकत घेतली पण तिला सावरणे त्यांना जमले नाही. बिग बास्केट नावाची घरोघरी किराणा पोचवणारी कंपनी चंद्रा यांच्या काळातच विकत घेण्यात आली. आज तिलाही प्रचंड तोटा होत असून एकूण ऑनलाईन बाजारात या कंपनीचा हिस्सा जेमतेम चार टक्के आहे. ब्लिंकइट, स्विगीमार्ट वगैरे छोट्या कंपन्यादेखील याच्या कितीतरी पुढे आहेत. प्रचंड जोखमीचे व आर्थिक तोटा होऊ शकतील असे प्रकल्प हाती घेणे हे चंद्रा यांचे वैशिष्ट्य मानले जाते. हे प्रकल्प चालले व त्यांनी नफा मिळवून दिला तर त्याला धडाडी म्हटले जाते. पण ते फसले तर तो मूर्खपणा ठरतो. चंद्रा यांच्या पदरी व त्यांच्यामुळे टाटांच्या पदरी हा मूर्खपणा पडला आहे. वास्तविक याला केवळ चंद्रशेखरन हेच जबाबदार आहेत असे नव्हे. टाटा समुहाची खरी मालकी असणाऱ्या टाटा ट्रस्टचे मुख्य नोएल टाटा यांचीही तसेच इतर संचालकांचीही तितकीच जबाबदारी आहे. दरम्यान, १७ लाख कोटी उलाढालवाल्या समुहाची मालकी टाटा सन्स या खासगी कंपनीकडे असावी याला रिझर्व्ह बँकेने आक्षेप घेतला आहे. त्यावर एकतर शेअर बाजारात नोंदणी करणे किंवा रिझर्व्ह बँकेची नियमित देखरेख मान्य करणे असे दोन पर्याय टाटांसमोर आहेत. तसे झाले तर बाहेरच्या व्यक्ती व संस्थांचा टाटांच्या व्यवहारात शिरकाव होणार आहे. भविष्यामध्ये या व्यक्ती किंवा कंपन्या टाटा समूह ताब्यात देखील घेऊ शकतात. चंद्रशेखरन यांचा राजीनामा होत असतानाच टाटांना आपल्या मालकीबाबतचा हा तिढा सोडवावा लागणार आहे व तो सोडवणे हे सोपे नाही. टाटा एकविसाव्या शतकात टिकून राहतात की कोसळतात याचा फैसला यातून होणार आहे.

---

विचार

# पांढरे होत चाललेले हिमालय

**_हिमाचल प्रदेशातील डोंगररांगांकडे पाहताना हिमालयावर जून महिन्यातच बर्फवृष्टी झाल्याचे आढळते. मात्र, हा बर्फ नसतो तर सफरचंद बागांवर पसरवण्यात आलेल्या हजारो एकरांवरील पांढऱ्या 'अँटी-हेल नेट्स' असतात. ओलावृष्टीतून पिकांचे संरक्षण करण्यासाठी उभारलेल्या या जाळ्यांनी घडवलेला हा बदल केवळ रंगाचा नसून हवामानबदल, शेती, अर्थकारण आणि पर्यावरण यांच्या गुंतागुंतीच्या नात्याची कहाणी सांगतो._**



मिलिंद बेंडाळे

एके काळी हिमाचलच्या डोंगरांची ओळख हिरव्यागार सफरचंद बागा, देवदाराची दाट जंगले आणि नैसर्गिक सौंदर्य अशी होती. आज त्या जागी प्लास्टिकच्या पांढऱ्या जाळ्यांनी व्यापलेले डोंगर दिसतात. हे दृश्य विकासाचे प्रतीक मानायचे की पर्यावरणीय संकटाचे, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. कारण ही जाळी शेतकऱ्यांची हौस नाही, तर त्यांच्या अस्तित्वाची गरज बनली आहे. हवामानबदलाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. हिमाचलमधील सफरचंद उत्पादक गेल्या दीड दशकापासून बदलत्या हवामानाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. पूर्वी विशिष्ट भागांपुरती मर्यादित असलेली गारपीट आता जवळपास सर्वच उंचीच्या भागांमध्ये होत आहे. कधीही, कोणत्याही वेळी पडणारे गारांचे तडाखे काही मिनिटांमध्ये वर्षभराची मेहनत उद्ध्वस्त करतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांकडे पर्याय काय? पिके नष्ट होताना पहायची की ती वाचवण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा आधार घ्यायचा? त्यांनी दुसरा पर्याय निवडला, म्हणूनच 'अँटी-हेल नेट्स'चा वापर झपाट्याने वाढला. आज हिमाचलची पाच हजार कोटी रुपयांची सफरचंद अर्थव्यवस्था आणि त्यावर अवलंबून असलेले दहा लाखांहून अधिक लोक या जाळ्यांवर अवलंबून आहेत. अनेक शेतकरी लाखो रुपये खर्च करून ही जाळी विकत घेत आहेत. कारण गारपिटीमुळे ६० ते ७० टक्के उत्पादन एका क्षणात नष्ट होऊ शकते. या तुलनेत जाळ्यांचा खर्च त्यांना परवडणारा वाटतो. त्यामुळे 'अँटी-हेल नेट्स' हे हवामान बदलाविरुद्धचे संरक्षण कवच बनले आहे; परंतु प्रत्येक संरक्षण कवचाची एक किंमत असते. ही किंमत केवळ आर्थिक नाही, तर पर्यावरणीयही असते.

'अँटी-हेल नेट्स'मुळे फळांचे संरक्षण होते. उत्पादन वाढते, तापमान किंचित कमी राहते आणि जमिनीतील ओलावा टिकून राहतो, असे संशोधन सांगते. नौणी येथील डॉ. वाय. एस. परमार बागायती विद्यापीठाच्या अभ्यासानुसार नेटखालील तापमान कमी होते. प्रकाशाचे प्रमाण घटते. मातीतील आर्द्रता वाढते आणि उत्पादनातही वाढ दिसून येते. म्हणजेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे तंत्रज्ञान उपयुक्त आहे; मात्र याच अभ्यासाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. हजारो हेक्टर क्षेत्र जाळ्यांनी झाकले गेले, तर त्या संपूर्ण परिसराचे सूक्ष्म हवामान बदलते. वाऱ्याचा वेग कमी होतो, आर्द्रता वाढते, सूर्यप्रकाश कमी पोहोचतो. याचा परिणाम केवळ सफरचंदाच्या झाडांवरच होत नाही, तर त्या परिसरातील संपूर्ण जैवविविधतेवर होऊ शकतो. परागीभवन करणारे कीटक, फुलपाखरे, जंगली मधमाशा, पक्षी आणि इतर सूक्ष्म जीव यांच्या हालचालींवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सफरचंद उत्पादनासाठी केवळ पाळीव मधमाशाच महत्त्वाच्या नसतात. नैसर्गिक परागीभवन करणारे असंख्य कीटक या प्रक्रियेत सहभागी असतात. हजारो हेक्टरवर पसरलेल्या जाळ्या त्यांच्या नैसर्गिक उड्डाणमार्गात अडथळा ठरत असतील, तर त्याचे दीर्घकालीन परिणाम काय असतील, याचे उत्तर अद्याप कोणाकडे नाही. विज्ञानाने हा प्रश्न अजून पूर्णपणे अभ्यासलेलाच नाही. हवामानबदलाचा आणखी एक परिणाम म्हणजे सफरचंद लागवडीची बदलती भौगोलिक सीमा.

काही दशकांपूर्वी १२०० ते १५०० मीटर उंचीवर मोठ्या प्रमाणात सफरचंदाची लागवड होत होती. आज ती तीन हजार मीटरपेक्षा अधिक उंच भागांकडे सरकत आहे. कारण कमी उंचीच्या भागात आवश्यक तेवढा थंडावा उरत नाही. सफरचंदाला आवश्यक असलेले 'चिलिंग अवर्स' कमी होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना केवळ तंत्रज्ञान बदलावे लागत नाही, तर संपूर्ण शेतीचे भूगोल बदलावे लागत आहे. याच काळात उच्च घनतेच्या (हाय डेन्सिटी) सफरचंद बागायतीचा प्रसारही वाढला आहे. या पद्धतीसाठी डोंगरांचे उतार समतल केले जात आहेत. मोठ्या प्रमाणात खोदकाम, समतलीकरण आणि कृत्रिम संरचना उभारल्या जात आहेत. परिणामी, डोंगरांची नैसर्गिक जलनिस्सारण व्यवस्था बदलत आहे. मातीची धूप, भूस्खलन आणि जलसाठ्यांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. हवामानबदलामुळे निर्माण झालेल्या संकटाला तोंड देताना आपण नकळत नवीन संकटांना आमंत्रण देत नाही ना, हा प्रश्न यामुळे अधिक गंभीर बनतो. या संपूर्ण चर्चेतील सर्वात दुर्लक्षित मुद्दा म्हणजे प्लास्टिक. 'अँटी-हेल नेट्स' या शेवटी प्लास्टिकच्याच जाळ्या आहेत. त्यांचे आयुष्य साधारण सात ते दहा वर्षे असते. त्यानंतर त्या बदलाव्या लागतात. हिमाचलमधील हजारो हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या या जाळ्यांमधून पुढील दशकात किती हजार टन प्लास्टिक कचरा निर्माण होईल, याचा कोणताही अधिकृत अंदाज उपलब्ध नाही. त्याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या जुन्या जाळ्यांचे काय होणार? त्यांचा पुनर्वापर होणार का? त्यांचे पुनर्चक्रण होणार की त्या जाळ्या डोंगरउतारांवर, नद्यांमध्ये किंवा लँडफिलमध्ये जाऊन आणखी एक पर्यावरणीय संकट निर्माण करणार? जागतिक स्तरावर कृषी क्षेत्रातील प्लास्टिक वापराबाबत चिंता वाढत आहे. प्लास्टिक सूर्यप्रकाश, पाऊस आणि तापमानाच्या परिणामामुळे सूक्ष्म कणांमध्ये विघटित होते. हे मायक्रोप्लास्टिक माती, पाणी आणि अखेरीस अन्नसाखळीत प्रवेश करते. हिमालयासारख्या संवेदनशील परिसंस्थेत हा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. आज त्याबाबत पुरेसे संशोधन नसले, तरी भविष्यात ही समस्या मोठे स्वरूप धारण करू शकते. याचा अर्थ 'अँटी-हेल नेट्स'चा वापर चुकीचा आहे का? अजिबात नाही. उलट, सध्याच्या परिस्थितीत ते शेतकऱ्यांसाठी अपरिहार्य झाले आहे. प्रश्न जाळ्यांच्या वापराचा नाही, तर त्याला पर्याय शोधण्याचा आहे. गारपीट प्रतिबंधक तोफा, क्लाउड सीडिंग, अधिक सक्षम हवामान अंदाज प्रणाली, हवामान अनुकूल वाण, जैवविघटनशील संरक्षक साहित्य आणि वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन यांसारख्या पर्यायांवर आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. हवामानबदलाशी लढताना केवळ एका तात्पुरत्या उपायावर अवलंबून राहणे शाश्वत ठरू शकत नाही. सरकारची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. आतापर्यंत 'अँटी-हेल नेट्स'च्या खरेदीवर अनुदान, बागायतीला प्रोत्साहन आणि उत्पादनवाढ यावर भर देण्यात आला; परंतु या जाळ्यांच्या पर्यावरणीय परिणामांचे दीर्घकालीन संशोधन, त्यांच्या विल्हेवाटीची व्यवस्था आणि जैवविविधतेवरील परिणामांचा अभ्यास यासाठीही तितकीच गंभीर धोरणात्मक तयारी आवश्यक आहे. हवामानबदलाशी लढताना पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. हिमालय हा केवळ डोंगरांचा प्रदेश नाही, तर भारताच्या जलसुरक्षेचा, जैवविविधतेचा आणि पर्यावरणीय समतोलाचा आधार आहे. त्या हिमालयाचा रंग आज बदलत आहे. एके काळी बर्फामुळे पांढरे दिसणारे डोंगर आता प्लास्टिकच्या जाळ्यांमुळे पांढरे दिसत आहेत. हा बदल केवळ दृश्य नाही, तर आपल्या विकासाच्या मॉडेलबद्दल प्रश्न विचारणारा आहे. हवामानबदल आता भविष्यकाळातील इशारा राहिलेला नाही. तो आज शेतकऱ्यांच्या निर्णयांमध्ये, पिकांच्या पद्धतीत, डोंगरांच्या रंगात आणि पर्यावरणाच्या बदलत्या स्वरूपात स्पष्टपणे दिसत आहे. 'अँटी-हेल नेट्स' ही त्या बदलाची सर्वाधिक दृश्यमान खूण आहे. त्यांनी शेतकऱ्यांची पिके वाचवली आहेत; पण त्याच वेळी त्यांनी आपल्यासमोर एक मोठा प्रश्न उभा केला आहे, हवामानबदलाशी लढताना आपण निसर्गाला आणखी कृत्रिम बनवत आहोत का? या प्रश्नाचे उत्तर आज कोणाकडे नाही; मात्र एक गोष्ट निश्चित आहे. हिमालयाचा रंग बदलत आहे आणि त्या बदलामागे केवळ निसर्ग नाही, तर माणसाने हवामानबदलाशी सामना करण्यासाठी निवडलेले उपायही तितकेच जबाबदार आहेत. म्हणूनच आता केवळ उत्पादन वाढवण्यापेक्षा पर्यावरण, शेती आणि शाश्वत विकास यांच्यातील समतोल साधणारी नवी दृष्टी विकसित करणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. हिमालय वाचवायचा असेल, तर त्याच्या रंगाबरोबरच त्याचा स्वभावही जपावा लागेल.

---

चर्चा आजची

# सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे अवघड

सुयोग आंग्रे

नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, केंद्र सरकारने 'डिजिटल अटक' हा स्वतंत्र गुन्हा म्हणून अधिसूचित करण्याचा विचार करावा. यावर केंद्र सरकारने 'डिजिटल अटक' आणि 'डीप-फेक' हे स्वतंत्र गुन्हे म्हणून अधिसूचित करण्याचा विचार करत असल्याचे सांगितले. डिजिटल अटक करण्याचे सर्व घटक आधीच गुन्ह्याच्या श्रेणीत असले तरी. असे असले तरी डिजिटल अटक हा नवा गुन्हा मानून त्यासाठी शिक्षेत वाढ करण्याची तरतूद करता येईल. डीप-फेकची व्याख्या सरकारने फेब्रुवारी २०२६ मध्ये आयटी नियमांनुसार 'कृत्रिमरित्या उत्पन्न केलेली माहिती' अशी केली आहे. आयटी कायद्यात याचा समावेश केला जाऊ शकतो. यापूर्वी २०२१ आणि २०२३ मध्ये आयटी नियमांमध्ये काही सुधारणा करून इंटरनेट मीडिया प्लॅटफॉर्मची जबाबदारी वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. कोणत्याही ठिकाणाहून सायबर गुन्ह्याचा अहवाल देण्यासाठी केंद्र सरकारद्वारे एक पोर्टल देखील चालवले जात आहे, जे गुन्हे आणि गुन्हेगारी ट्रॅकिंग नेटवर्क आणि पोलीस स्टेशनच्या सीसीटीएनएस प्रणालीशी जोडलेले आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी, भारतीय न्यायिक संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा आयपीसी, सीआरपीसी आणि पुरावा कायद्याच्या जागी अधिसूचित करण्यात आला. नवीन कायदा जुन्या कायद्यापेक्षा फारसा वेगळा नसला तरी नवीन कायद्यात इलेक्ट्रॉनिक पुराव्याला अधिक महत्त्व देण्यात आले असून प्राथमिक दस्तऐवज पुराव्याचा अधिक चांगला अर्थ लावला गेला आहे. जोपर्यंत न्यायालयात दुय्यम दस्तऐवज पुरावा प्रमाणित करण्याचा प्रश्न आहे, त्याचे स्वरूप निश्चित केले गेले आहे आणि पुरावे सुरक्षित ठेवण्याचे अल्गोरिदम स्पष्ट केले आहेत. असे असतानाही इलेक्ट्रॉनिक पुरावे गोळा करणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षित वाहतूक आणि सुरक्षित ठेवणे या बाबींवर विशेष लक्ष दिले गेले नाही. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे कोणतेही महत्त्वाचे निर्देश नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने निश्चितपणे ठरवले आहे की, इलेक्ट्रॉनिक पुरावे न्यायालयात ग्राह्य धरण्यासाठी कोणत्या अटी असतील? २०२० मध्ये एका प्रकरणात, त्यांनी सांगितले होते की, जोपर्यंत दुय्यम इलेक्ट्रॉनिक पुराव्याचा संबंध आहे, तो पुरावा कायद्याच्या कलम ६५-बी (४) अंतर्गत जारी केलेल्या प्रमाणपत्राशिवाय न्यायालयात स्वीकारला जाणार नाही. म्हणजेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मूळ स्टोरेजमध्ये किंवा संगणक-लॅपटॉपच्या मेमरीमध्ये जर माहिती सादर केली गेली नसेल किंवा ती सादर करता येत नसेल, तर त्याची खरी प्रत कलम ६५-बी (४) चे प्रमाणपत्र सोबत जोडल्यास वैध ठरेल. याला काही अपवाद आहेत, परंतु प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. भारतीय पुरावा कायद्यात कलम ६३(४) अंतर्गत जवळपास समान तरतूद करण्यात आली आहे. नवीन कायद्यात गुन्ह्याच्या ठिकाणी आणि झडतीच्या वेळी फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी अनिवार्य करण्यात आली आहे. या अशा काही तरतुदी आहेत, ज्या घटनास्थळी केलेल्या कारवाईची पुष्टी करतात आणि पुराव्याला अधिक बळ देतात. यासाठी सरकारने ई-साक्ष हे ॲप्लिकेशनही तयार केले असून ते उपयुक्त आहे. २०१६ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने पाच न्यायाधीशांची एक समिती स्थापन केली होती ज्याद्वारे इलेक्ट्रॉनिक पुरावे मिळवण्यासाठी मार्गदर्शक तयार केले होते. या समितीने मसुदा नियमावली तयार करून नोव्हेंबर २०१८ मध्ये सरकारला अहवाल सादर केला होता, मात्र त्यावर काय निर्णय झाला याची माहिती नाही. २०१८ मध्ये, भारतीय मानक ब्युरोने जारी केले होते, जे इलेक्ट्रॉनिक पुरावे ओळखणे, संग्रहित करणे, पुनर्प्राप्त करणे आणि जतन करणे यासाठी शिफारसी प्रदान करते. हे मानक आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू होणारे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे, परंतु त्याच्या अनिवार्य अनुपालनासाठी त्याला कायदेशीर स्वरूप देणे आवश्यक आहे. वेळोवेळी, डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया म्हणजेच डीएससीआयने सायबर गुन्ह्यांच्या तपासाशी संबंधित पुस्तक प्रकाशित केले आहे, जे खूप उपयुक्त आहे. तथापिडीएससीआय ही सरकारी संस्था नाही. आयटी कायद्याच्या कलम ७०-बी अंतर्गत, 'इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम' ही भारत सरकारची एक संस्था आहे, जी राज्यांना सायबर सुरक्षेबाबत वेळोवेळी अलर्ट जारी करते. हे काम डीएससीआयच्या मदतीने अन्य कोणत्याही तज्ज्ञ समितीकडे सोपवले किंवा भारताच्या कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमला तपासाचे मानके ठरविण्याची जबाबदारी दिल्यास सायबर गुन्ह्याच्या तपासात एकसमानता आणि गुणवत्ता आणण्याच्या दिशेने ते महत्त्वाचे पाऊल ठरेल. याशिवाय सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी जी काही पोलीस ठाणी स्थापन केली जात आहेत, त्यामध्ये संगणकशास्त्राचे ज्ञान असणारेच पोलीस उपनिरीक्षक आणि डीएसपी म्हणून तैनात असतील याची काळजी घ्यावी लागेल. अपवाद वगळता सामान्य पदवीधराला कितीही प्रशिक्षण दिले जात असले तरी त्याला सायबर गुन्ह्यांच्या तपासातील गुंतागुंत समजू शकत नाही. माओवादी कारवायांशी संबंधित जीएन साई बाबा प्रकरणात, मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले होते की आरोपींकडून जप्त केलेले साहित्य योग्यरित्या जप्त केले गेले नाही. आरोपींना निर्दोष सोडण्याचे हेही एक कारण होते. सर्व राज्यांच्या सायबर फॉरेन्सिक लॅबमध्ये तज्ज्ञांची संख्या देखील खूप मर्यादित आहे, तर दुय्यम पुराव्याची सर्व प्रमाणपत्रे त्यांच्याकडून पुष्टी करणे आवश्यक आहे. त्यामुळे संसाधने वाढविल्याशिवाय, केवळ नवीन कायदे ठरवून गुन्हेगारांना शिक्षा करणे कठीण आहे. त्यासाठी तपासाचे मानके निश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रक्रियेत एकसमानता यावी, दंडाधिकाऱ्यांनाही त्याची माहिती असेल, इलेक्ट्रॉनिक पुरावे न्यायालयात मान्य असतील आणि पोलीस अधिकारी न्यायालयाला संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगू शकतील. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार, सीबीआयने डिजिटल अटकेची काही महत्त्वाची प्रकरणे हाती घेतली आहेत, परंतु अशा गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी राज्यांच्या पोलिसांना पुरेसे प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

---

लोकसंसद

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर शिवरायांच्या जयघोषाची मागणी!

महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे नियमित उद्घोषणेसोबत 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणा देण्याची मागणी केल्याची बातमी वाचली. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन, जनकल्याणकारी धोरणे आणि ऐतिहासिक दृष्टीकोन आजही अत्यंत प्रेरणादायी असून त्यामुळे तरुण पिढीला त्यांच्या या गौरवशाली इतिहासाची माहिती होईल, तसेच दररोज लाखो प्रवाशांची ये-जा होणारे महत्त्वाचे केंद्र असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसद्वारे शिवाजी महाराजांचे स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रनिर्मितीचे विचार भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणे शक्य होईल, असे अध्यक्षांच्या मागणी पत्रात म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे आराध्य दैवत आणि अस्मिता आहेत. त्यामुळे ज्या ऐतिहासिक स्थानकाला महाराजांचे नाव दिले आहे, तिथे त्यांच्या नावाचा जयघोष होणे ही गोष्ट प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद ठरेल. राहुल नार्वेकर यांनी केलेली शिवरायांच्या जयघोषाची मागणी ही भारतीय रेल्वेच्या सध्याच्या नियमांपेक्षा आणि कार्यपद्धतीपेक्षा पूर्णपणे वेगळी असून अशा प्रकारची पहिलीच मागणी असल्याने केंद्रीय रेल्वेमंत्री आणि रेल्वे प्रशासन या मागणीला कसा प्रतिसाद देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

दिनविशेष

# ख्यातनाम कुस्तीपटू खाशाबा जाधव

खाशाबा दादासाहेब जाधव हे एक भारतीय फ्रीस्टाईल कुस्तीपटू होते. सन १९५२ साली पार पडलेल्या ऑलम्पिक स्पर्धेत भारताला पहिलं वैयक्तिक कांस्य पदक मिळवून देणारे कुस्तीपटू खाशाबा जाधव. विशेष गोष्ट हि कि भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे पहिलं वैयक्तिक ऑलम्पिक कांस्यपदक त्यांनी आपल्या भारताला मिळवून दिले.

सातारा जिल्ह्यातील एका लहान गावात जन्माला आलेल्या खाशाबांना कुस्तीचं बाळकडू घरातच मिळालं. त्यांचे आजोबा आणि त्यांचे वडील दादासाहेब सुद्धा उत्तम कुस्तीपटू होते.

वयाच्या अवघ्या ५ व्या वर्षापासूनच खाशाबा कुस्तीतील बारकावे शिकू लागले. वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षीच एका प्रसिद्ध पहिलवानाला चितपट करून खाशाबांनी सर्वांना आपली दखल घेण्यास भाग पाडलं.

१९४८ मध्ये त्यांची लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत फ्लायवेट गटासाठी कुस्तीमध्ये निवड झाली. या स्पर्धेत ते जिंकू शकले नाहीत. पण १९५२ सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांनी जोरदार तयारी केली. या स्पर्धेसाठी त्यांची बॉटमवेट गटात म्हणजे ५७ किलो वजन गटात निवड झाली. परंतु, खाशाबा यांच्याकडे ऑलिम्पिक स्पर्धेस जाण्यासाठी पैसे नव्हते. अशावेळी गावातील सर्व लोकांनी आणि आजूबाजूच्या लोकांनी वर्गणी गोळा करून खाशाबा यांना जाण्यासाठी पैसे जमा केले.

करिअर प्राचार्य बॅरिस्टर खर्डेकर सरांनी तर खाशाबाला ऑलम्पिक स्पर्धेला जाता यावं यासाठी स्वतःचं घर गहाण ठेऊन ७००० रुपये उभे केले. खाशाबांचे कोल्हापूरचे प्रशिक्षक गोविंद पुरंदरे यांनी देखील ३००० रुपयांची जमवाजमव केली अन खाशाबा ऑलम्पिक स्पर्धेला जाऊ शकले. त्या स्पर्धेत विविध देशातील २४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. खाशाबांनी मेक्सिको, जर्मनी, कॅनडा येथील स्पर्धकांना नमवून सेमी फायनलपर्यंत मजल मारली. आंतरराष्ट्रीय राजकारण आडवं आलं नसतं तर खाशाबा सुवर्णपदक घेऊनच परतले असते. पण त्यांना कांस्य पदकावर समाधान मानावं लागलं. तरीदेखील ही बाब देखील कमी महत्वाची ठरत नाही. त्यांचा विजय हा भारत देशासाठी खूप अभिमानाची गोष्ट ठरली. कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर ऑलम्पिक स्पर्धेतील हे पहिलं वैयक्तिक पदक ठरलं होतं. खाशाबांच्या नावावर हा रेकॉर्ड जवळपास ४४ वर्ष कायम होता. लियांडर पेस या टेनिस पटूचं नाव दुसऱ्या क्रमांकावर १९९६ साली या यादीत समाविष्ट झालं.

पदक पटकावून ज्यावेळी खाशाबा मायदेशी परतले, त्यावेळी कराड रेल्वेस्थानकावर त्यांचे फार मोठ्या प्रमाणात जंगी स्वागत करण्यात आले होते. शेकडो बैलगाड्या ढोलताशे. लेझीम पथकं आतिषबाजी फटाके यांच्या धामधुमीत खाशाबांच्या गोळेश्वर या गावापर्यंत जंगी मिरवणूक निघाली. खाशाबांच्या या विजयाने त्यांच्या लहानश्या गावाची ओळख संपूर्ण देशभर झाली होती.

सन १९५५मध्ये खाशाबा जाधव हे महाराष्ट्र पोलीस दलात ते सब-इन्स्पेक्टर या हुद्द्यावर भरती झाले. तेथे आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी अनेक कुस्त्या जिंकल्या. त्याचवेळी ते राष्ट्रीय स्तरावर स्पोर्ट्स मार्गदर्शक म्हणून काम करू लागले. हे करत असतानाच त्यांनी पोलीस खात्यात



२७ वर्षे नोकरी केली आणि असिस्टंट पोलीस कमिशनर या हुद्द्यावरून निवृत्त झाले. पेन्शनसाठी त्यांना खूप झगडावे लागले. बरीच वर्षे स्पोर्ट्स फेडरेशनने देखील त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांचे उरलेले जीवन गरिबीत गेले. अशा या महान कुस्तीपटूचे १४ ऑगस्ट १९८४ रोजी निधन झाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१४ ऑगस्ट**

१) श्री. गिरीधर गजानन गुयव आंबेपूर-पेझारी, अलिबाग, १४-८-१९३५
२) श्री. दिनकर सखाराम गिरकर अलिबाग, १४-८-१९४३
३) श्री.जगन्नाथ नारायण महाले मु.किहीम, अलिबाग, १४-८-१९३८
४)श्री.अरविंद वामन पडते मु.गुंजीस, ता.अलिबाग दि.१४-८-२०२६
५)श्री.परशुराम जानू गोंधळी मु.उसर, अलिबाग दि.१४-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. सौ कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजारपेठ अलिबाग**



**कै. श्री. सुधीर श्रीधर गावंड, स्मरणार्थ अलिबाग**



**कै. श्री. रविंद्र विठ्ठल कुंटे, २४ वा स्मृतीदिन, अलिबाग**

## जिजाऊ संस्थेकडून शैक्षणिक साहित्य

**नेरळ :** जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण कोकणात अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. खांडस परिसरात एकूण १२ जिल्हा परिषद शाळा आणि एक माध्यमिक विद्यालय आहेत. या सर्व शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांना संस्थेकडून शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली खांडस गावातील माध्यमिक विद्यालयासह जिल्हा परिषद शाळा काठेवाडी, हंबरपाडा, चाफेवाडी, पादीरवाडी, पेटारवाडी आणि गावंडवाडी येथील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला.

# व्यवहारिक मराठी अनिवार्य!



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या व्यावसायिक प्रवासी वाहनांच्या चालकांना व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांद्वारे ही अट अधिक स्पष्ट करण्यात आली आहे.

१५ ऑगस्टनंतर व्यवहारिक मराठी न येणाऱ्या वाहन चालकांचा तीन महिने वाहन परवाना रद्द करण्यात येणार आहे. तर हा नियम सातत्याने भंग केल्यास परवाना कायमस्वरुपी रद्द केला जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मोटार वाहन सुधारणा नियम २०२६ अंतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. यामध्ये रिक्षा, टॅक्सी तसेच इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या ॲप-आधारित मोटार कॅब आणि त्यांच्या परवाना व अधिकृततेशी संबंधित चालक तसेच परमिटधारकांसाठी व्यवहारिक मराठीच्या ज्ञानाची अट स्पष्ट करण्यात आली आहे. नियम २२ मध्ये ॲप-आधारित इलेक्ट्रॉनिक मीटर असलेल्या मोटार कॅबच्या अधिकृत चालकांसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

संबंधित चालकाकडे मराठीचे आवश्यक ज्ञान नसल्याचे आढळल्यास परवाना प्राधिकरणाला लेखी कारणे नोंदवून कारवाई करता येणार आहे. प्रथम परवाना जास्तीत जास्त तीन महिन्यांसाठी निलंबित करता येईल. त्यानंतरही संबंधित चालकाकडून नियमांचे सातत्याने पालन होत नसल्यास हा परवाना रद्द करण्याचा अधिकार प्राधिकरणाला राहणार आहे. ही अट केवळ चालकांपुरती मर्यादित नसून परमिटधारकांनाही लागू करण्यात आली आहे. सुधारित नियम ७८ नुसार संबंधित परमिटधारकाकडेही मराठीचे व्यवहारिक ज्ञान आवश्यक आहे.

- **अन्यथा तीन महिन्यांपर्यंत परवाना निलंबित होणार**
- **परिवहन मंत्र्यांची माहिती**

> **प्रवाशांशी प्रभावीपणे संवाद साधता यावा, यासाठी स्थानिक भाषेचे व्यवहारिक ज्ञान आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात या नियमांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करणे शक्य होईल.**
> **– प्रताप सरनाईक परिवहन मंत्री**

### परमिट नूतनीकरणासाठीही अट

सुधारित नियमांमधील आणखी एक महत्त्वाची तरतूद नियम ८५मध्ये करण्यात आली आहे. नियम ८५ च्या उपनियम (१) मध्ये करण्यात आलेल्या नव्या तरतुदीनुसार, ॲप आधारित इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या मोटार कॅबच्या परमिटचे नूतनीकरण करताना परमिटधारकाकडे मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असणे आवश्यक राहणार आहे. हे ज्ञान संबंधित प्राधिकरणाच्या समाधानकारक पातळीचे असणे आवश्यक असल्याचे अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्याख्यान




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे बुधवारी (दि.१२) आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या वतीने 'युवाशक्ती परिवर्तनाची दिशा' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.आर. पांडेय यांच्या मार्गदर्शनाखाली हे व्याख्यान आयोजिले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर तसेच माणगाव पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक पूजा वराडे उपस्थित होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय बांगर आणि पूजा वराडे यांनी युवा पिढीने शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारी, शिस्त, कायद्याचे भान आणि सकारात्मक विचारसरणी जोपासण्याची गरज व्यक्त केली. युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशा मिळाल्यास समाज आणि राष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजेंद्र आचार्य यांनी युवक हे देशाचे भविष्य असून, त्यांच्या कल्पकता, ऊर्जा आणि कौशल्यांचा विधायक कार्यासाठी उपयोग होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

## सुतारवाडी परिसरात वाऱ्याचा हाहाकार

● **घरांचे पत्रे उडून नुकसान**

**। सुतारवाडी । प्रतिनिधी।**

सुतारवाडी परिसरात गुरुवारी (दि.१३) सकाळी १०:३० वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या वाऱ्यामुळे हाहाकार उडाला. मंगेश मनोहर महाडेश्वर, यांच्या घराच्या छपरावर आंब्याचे झाड कोसळून घरावरील पत्रे फोडून भिंतींना तडा गेल्याने त्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तसेच, प्रकाश सुंदरराव मोरे यांच्या घराचे ५० पत्रे उडून भिंतींना तडा गेल्या. त्याचप्रमाणे वैशाली कुरळे यांच्या घरावरील अनेक कौल उडून भिंतींना मोठ्या प्रमाणावर तडा गेल्याने त्यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून कौल व पत्रे उडालेल्या घरांमध्ये पावसाचे पाणी फिरत असल्यामुळे घरातील सामानाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. नुकसान झालेल्या घराचे पंचनामे लवकरात लवकर करून भरपाई मिळावी, अशी नुकसानग्रस्तांची मागणी आहे.





## शैलेश पालकर यांना पुरस्कार प्रदान

**। पुणे । प्रतिनिधी ।**

सुरेश सकपाळ यांच्या सुजय फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेली समाजसेवा प्रेरणादायी आहे. सुजय फाउंडेशन आणि मैत्री रक्ताची यांच्या वतीने सुजय सकपाळ यांच्या तेराव्या स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा, मोफत आयुर्वेदिक तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुजय फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ११७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे मान्यवर ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, उद्योजक किसन भोसले, उमाकांत बिराजदार, सागर घोरपडे, विठ्ठल जाधव आणि उषा म्हात्रे यांनादेखील यावेळी 'सेवारत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. संतोष जाधव, डॉ. सुरेश राठोड, हरिभाऊ शिवले, मधुकर चौधरी, उज्वला गौड, किरण सावंत, विजय ठुबे, श्याम झवर यांच्यासह श्री काळभैरवनाथ फाउंडेशन, होय हिंदू आणि आदर्श सेवा मंडळ या संस्थांना 'समाज गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## विद्यालयाला फॅन, ट्यूबलाईट्सचे वितरण

### साई व नाईटिंगल ट्रस्टची सामाजिक बांधिलकी



**। खांब । प्रतिनिधी ।**

सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्राला सातत्याने मदतीचा हात देणाऱ्या साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने विद्यालयास मोफत फॅन व ट्यूबलाईट्सचे वितरण करण्यात आले.

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे काही दिवसांपूर्वी आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे चेअरमन डॉ. असिफ कासकर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत, विद्यालयास आवश्यक असलेले फॅन व ट्यूबलाईट्स उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. दिलेला शब्द पाळत डॉ. कासकर यांनी आज आपल्या वचनाची पूर्तता केली असून विद्यालयात संपन्न करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात त्यांनी हे साहित्य विद्यालयास वितरीत केले आहे. उन्हाळ्यातील उष्णतेमुळे वर्गात निर्माण होणाऱ्या गैरसोयीपासून विद्यार्थ्यांची सुटका होणार आहे. तर प्रकाशाचीही योग्य सुविधा उपलब्ध झाल्याने अध्यापन, अध्ययन प्रक्रिया अधिक आनंददायी व परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

## टीबीच्या जनजागृतीसाठी 'रील स्पर्धा'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मोबाईलच्या पडद्यावरील काही सेकंदांची 'रील' लाखो लोकांपर्यंत अधिक वेगाने व प्रभावीपणे पोहोचत आहे. या बदलत्या माध्यमविश्वाची ताकद ओळखून क्षयरोगमुक्त भारत अभियानांतर्गत राज्यातील परिचारिका आणि परिचर्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय 'रील' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र शाखेच्या संयुक्त पुढाकाराने ही स्पर्धा होत आहे.

या माध्यमातून आरोग्य जनजागृती आणि सोशल मीडिया यांचा संगम घडविणारा हा प्रयोग केवळ स्पर्धा नसून काळानुरूप बदलणाऱ्या आरोग्य संवादाचे नवे पर्व ठरू शकतो. क्षयरोगाची लक्षणे, वेळेवर तपासणी, उपचार पूर्ण करण्याचे महत्त्व, उपचारात खंड न पाडणे, योग्य पोषण आणि टीबी रुग्णांबाबतचा सामाजिक कलंक दूर करणे, अशा विषयांवर रील तयार करता येणार आहेत. रील तयार करणारे केवळ डिजिटल कंटेंट क्रिएटर नसून रुग्णांच्या प्रत्यक्ष संपर्कात येणाऱ्या परिचारिका आणि परिचर्या विद्यार्थी हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे क्षयरोगाची लक्षणे, तपासणी, उपचार, पोषण किंवा उपचारातील सातत्य यासारखे विषय केवळ पुस्तकातील माहिती म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष आरोग्यसेवेतील अनुभवाच्या आधारे मांडले जाण्याची शक्यता आहे. मराठी भाषेतील रीलमध्ये स्थानिक बोली, संवाद, छोट्या नाटिका, ग्रामीण जीवनशैली आणि प्रत्यक्ष अनुभवांचा वापर करता येणार आहे. तयार केलेल्या निवडक रील १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत tnaimahabr@yahoo.co.in या संकेतस्थळावर पाठवाव्यात. तसेच, जास्तीत जास्त विद्यार्थी परिचारिकांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा) डॉ. निलिमा सोनावणे यांनी केले आहे.

## आरोही मांडवकरने शिष्यवृत्ती पटकावली



**माणगाव :** लीड सीबीएसई स्कूल माणगावची विद्यार्थिनी आरोही विपुल मांडवकर हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेत पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (४थी)मध्ये उज्वल यश संपादन केले. रायगड जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत आरोहीने चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्ती पटकावली आहे.

**रंगरंगोटीसह स्वच्छतागृहांचे अद्ययावतीकरण** | **पोस्को कंपनीची सामाजिक बांधिलकी**

# माणगावमधील २३ शाळांचे नूतनीकरण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचायची असेल, तर शाळांची इमारत भक्कम आणि वातावरण आनंददायी असायला हवे. याच भावनेतून पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सीएसआर निधीतून सुरू केलेल्या व्यापक शाळा दुरुस्ती अभियानाचा यशस्वी टप्पा गाठला आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारावा आणि विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा मिळाव्यात, यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने अंतर्गत आत्तापर्यंत माणगाव तालुक्यातील तब्बल २३ शाळांचे नूतनीकरण केले आहे. कंपनीच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




नुकत्याच झालेल्या जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मुसळधार पावसात आणि वादळात खचलेल्या, तसेच दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या विविध शाळांच्या नूतनीकृत इमारतींचे लोकार्पण करण्यात आले.

पावसाळ्यात छतातून होणारी गळती, भिंतींचे उखडलेले प्लास्टर आणि नादुरुस्त स्वच्छतागृहे यांमुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसणेही कठीण झाले होते. या दुरवस्थेचा मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत होता. ही बाब लक्षात घेऊन पोस्को महाराष्ट्र स्टीलने तत्परतेने या शाळांच्या संपूर्ण दुरुस्तीचे काम हाती घेतले आणि अल्पावधीतच शाळांचा चेहरामोहरा बदलून टाकला.

**असा घडला शाळांचा कायापालट**

१. रा. जि. प. शाळा चांदे आदिवासीवाडी (उद्घाटन: ३० जुलै): इमारत दुरुस्ती, संपूर्ण रंगरंगोटी आणि मुला-मुलींच्या स्वच्छतागृहांचे अद्ययावतीकरण करून विद्यार्थ्यांना स्वच्छ वातावरण दिले. २. रा. जि. प. शाळा कडापे (उद्घाटन: ३१ जुलै): छप्पराची संपूर्ण दुरुस्ती करून आकर्षक रंगसंगतीने शाळेला नवे रूप दिले. ३. सुशीलाताई पवार विद्यालय, भाले (उद्घाटन: ३१ जुलै): जुलैतील मुसळधार पाऊस व वादळामुळे या शाळेचे छप्पर उडून गेले होते आणि वर्गखोल्यांतील साहित्याची दाणादाण उडाली होती. पोस्कोने त्वरित पुढाकार घेत संपूर्ण छप्पर दुरुस्ती, नवीन वीज जोडणी (इलेक्ट्रिफिकेशन) व रंगकाम करून शाळा पूर्ववत उभी केली.

> अडचणीच्या काळात पोस्को कंपनीने मदतीचा हात दिल्यामुळे आमच्या मुलांचे शिक्षण थांबले नाही.
> – पालक

४. रा. जि. प. शाळा खरबाची आदिवासीवाडी (उद्घाटन: ११ ऑगस्ट): इमारत दुरुस्ती, बाह्य रंगरंगोटी आणि सुशोभीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले.

## निवडक



### स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**तळा :** राष्ट्रीय सेवा योजना जी.एम. वेदक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तळा यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'पदवी शिक्षण घेत असताना यूपीएससी, एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी?' या विषयावर मोफत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. नागनाथ एस. गव्हाणे, मुख्य व्यवस्थापक (प्रशासन व प्रकाशन), द युनिक अकॅडमी, पुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी यूपीएससी, एमपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांची तयारी, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, योग्य संदर्भ पुस्तके, करिअरच्या विविध संधी आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. डी.एन. जैसवाल, प्राचार्य, जी.एम. वेदक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तळा हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याचे आवाहन केले. या मार्गदर्शन कार्यशाळेस १०३ विद्यार्थी व १६ प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.



### यु.ई.एस. स्कूलमध्ये 'दीपपूजा' उत्साहात

**उरण :** दीप अमावस्येच्या निमित्ताने बुधवारी (दि.१२) यु.ई.एस. स्कूलमध्ये 'दीपपूजा उत्सव' साजरा करण्यात आला. दीपपूजेसाठी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे आणले होते. शाळेच्या व्हरांड्यातील एका टेबलावर समया, लामणदिवे, पणत्या, निरांजने असे अनेक प्रकारचे रंगीबेरंगी दिवे मांडून सजावट करण्यात आली होती. दिव्यांच्या प्रकाशामुळे केलेली सजावट डोळ्यांना अधिकच नयनरम्य भासत होती. याप्रसंगी संगीत शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी समुह गीत सादर केले. यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, खजिनदार ॲड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्वप्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

### नमित वाघावले तालुक्यात पहिला



**उरण :** साई ट्रस्ट ज. ने. पोर्ट विद्यालय शेवा प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमचा विद्यार्थी नमित प्रदीप वाघावले याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. २९८पैकी २४० गुण मिळवून त्याने रायगड जिल्हा राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीत १० वा आणि शाळेतून व उरण तालुक्यातून १ ला येण्याचा बहुमान पटकावला आहे. त्याला वर्ग शिक्षिका वंदना कपूर, सारिका तायडे, योगसाधना पाटील, सचिता वाघावले या शिक्षिकांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच नमित याचे पालक यांनी सुध्दा खूप मेहनत घेतली. नमित वाघावले याने शाळेचे नाव संपूर्ण रायगड जिल्ह्यात उंचावले आहे. तसेच शाळेचे ७ हुशार व मेहनती विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्याच्या या उज्वल यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### चिरनेर शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**चिरनेर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत चिरनेर येथील राजिपच्या शाळेतील इयत्ता चौथीचा विद्यार्थी द्वीप सागर गावंड हा शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे. त्याला ३०० पैकी १७२ गुण प्राप्त होऊन ५७.३३ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. तर निल म्हात्रे यांनी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. त्याला ३०० पैकी १७० गुण मिळाले असून ५६.६७ टक्के गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला आहे. तर स्वरा बरकडे हिनेही प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १४४ गुण मिळवून यश प्राप्त केले. तिला ४८ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द त्याचबरोबर शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे प्रोत्साहन यामुळे विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक बळीराम पाटील माजी जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्यासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे पालक व नागरीकांकडून अभिनंदन केले जात आहे.



### पालकांची सहविचार सभा उत्साहात

**पाली/गोमाशी :** भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे इयत्ता १०वी व १२ वीमधील विद्यार्थ्यांच्या पालकांची सहविचार सभा मंगळवारी (दि.११) उत्साहात पार पडली. यावेळी १०वीच्या वर्गशिक्षिका स्वाती शिंद, ज्येष्ठ शिक्षिका तन्मयी शिंदे, इंग्रजी विषयाच्या शिक्षिका शामल कंबलकर आणि विज्ञान-गणित शिक्षिका विद्या भिसे यांनी बोर्ड परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, आरोग्य, सोशियल मीडियाचा अतिवापर आणि ताणतणाव याविषयावर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी घ्यावयाची काळजी यावर मोलाचे विचार मांडले. पालकवर्गातून संपदा मोहणे आणि शांताराम कोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी शाळेच्या कार्याचे कौतुक करत मुलांच्या उज्वल भविष्यासाठी घर आणि शाळेची साथ महत्वाची असल्याचे सांगितले. प्राचार्य अशोक शिंदे यांनी बोर्ड परीक्षेचे नियोजन, शाळेचे उद्दिष्ट आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर मार्गदर्शन केले. सभेच्या शेवटी पालकांच्या शंका समजून घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# साळाव पुलावर उघडे खड्डे

## रस्ते दुरुस्तीच्या कामात सुरक्षेचा बोजवारा

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा-मुरुड मार्गावरील कुंडलिका खाडीवरील साळाव पुलाच्या सुरुवातीलाच सुरू असलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामात गंभीर निष्काळजीपणा समोर आला आहे. रस्त्याच्या मध्यभागी खोदण्यात आलेले खोल खड्डे कोणतीही पुरेशी सुरक्षा व्यवस्था, मजबूत बॅरिकेड्स किंवा स्पष्ट इशारा फलक न लावता उघडे ठेवण्यात आल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.



पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यातच सध्या पावसाळी वातावरण, रात्रीची कमी दृश्यमानता आणि वाहनांचा वेग लक्षात घेता या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. सुरक्षेची प्राथमिक व्यवस्था न करता रस्त्याचे काम सुरू ठेवणे म्हणजे अपघाताला थेट निमंत्रणच, अशी संतप्त प्रतिक्रिया वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

- **फलकाविना काम सुरू**
- **नागरिकांच्या जीवाशी खेळ**

हा प्रकार मुरुड तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजेश तरे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ साळाव तपासणी नाक्यावरील वाहतूक पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर धोकादायक ठिकाणी तात्पुरते बॅरिकेड्स लावण्याच्या सूचना करण्यात आल्याचे तरे यांनी सांगितले.

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित यंत्रणांनी या प्रकाराची तातडीने दखल घेऊन पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच धोकादायक खड्ड्यांभोवती मजबूत बॅरिकेड्स, परावर्तित इशारा फलक आणि रात्री पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी, तसेच रस्ते कामाच्या दर्जाची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### दुर्घटना झाल्यावरच प्रशासन जागे होणार का?

महत्त्वाच्या मार्गावर अशा प्रकारे सुरक्षा नियमांची पायमल्ली होत असताना संबंधित ठेकेदारावर कारवाई का केली जात नाही? कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा व्यवस्था का करण्यात आली नाही? एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### ठेकेदाराच्या मनमानीवर नागरिकांचा संताप

रस्ते कामाच्या ठिकाणी वाहनचालकांना पुरेसा इशारा मिळावा, यासाठी बॅरिकेड्स, परावर्तित फलक, रात्रीची प्रकाशव्यवस्था यांसारख्या मूलभूत सुरक्षा उपाययोजना करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप होत आहे. कामाचा दर्जा, गती आणि सुरक्षितता या तिन्ही बाबींवर प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# घरत कुटुंबियांनी मानले तहसीलदारांचे आभार

## अपघाती मृत्यूनंतर चार लाखांची मदत

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग-रोहा मार्गावरील मौजे वेलवली-खानाव हद्दीत रस्त्यावर पडलेल्या मोठ्या भगदाडामुळे जुलै महिन्यात वेलवली येथील शेतकरी चांगू कमळू घरत यांचा अपघाती मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पीडित कुटुंबाला मदत मिळावी यासाठी शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील, खानाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच निलेश गायकर तसेच परिसरातील ग्रामस्थांनी पाठपुरावा केला.

या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पराते यांनी मयत चांगू घरत यांच्या कुटुंबीयांना १५ लाख रुपयांची मदत देण्याचे जाहीर केले होते.



त्याचवेळी ॲड. राकेश पाटील यांनी अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांच्याकडे महसूल विभागामार्फत तातडीने मदत देण्याची मागणी केली होती.

तहसीलदार विक्रम पाटील यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव शासनाकडे पाठविला. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर महसूल विभागामार्फत घरत कुटुंबियांना चार लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली. याबद्दल घरत कुटुंबियांनी तहसीलदार विक्रम पाटील यांचे आभार मानले.

> “घटनेच्या दिवशीच तहसीलदार विक्रम पाटील यांच्याकडे मयत चांगू घरत यांच्या कुटुंबाला महसूल विभागामार्फत मदत मिळावी, अशी विनंती केली होती. कागदपत्रांची पूर्तता झाल्यास शासनाकडून निश्चित मदत मिळेल, असे तहसीलदारांनी सांगितले होते. त्यानुसार महसूल विभागामार्फत पीडित कुटुंबाला चार लाख रुपयांची मदत मिळाली. मदत करणाऱ्यांचे आभार मानणे हे आम्ही कर्तव्य समजतो. त्याबद्दल तहसीलदार विक्रम पाटील यांचे मनःपूर्वक आभार.
> – ॲड. राकेश नारायण पाटील”

# घे भरारीचे न्यू पनवेल येथे प्रदर्शन

| पनवेल | प्रतिनिधी |

पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, नाशिक, बंगळुरू, बेळगांव, ठाणे, या ठिकाणी प्रदर्शने सादर करणाऱ्या घे भरारीचे प्रदर्शन श्री कृपा बँकवेट, खांदा कॉलनी, न्यू पनवेल येथे (दि.१३) ऑगस्ट रोजी अभिनेत्री डेलनाझ इराणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पनवेलमधील स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. शोभना पालेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.



१३ ते १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत हे प्रदर्शन असून सकाळी ११ ते रात्री ९ या वेळात नागरिकांनी या प्रदर्शनाला जरूर भेट द्यावी असे आवाहन घे भरारी समूहाचे संस्थापक राहुल कुलकर्णी, नीलम उमराणी एदलाबादकर यांनी केले आहे. यात ९० पेक्षा जास्त छोटे व्यावसायिक व महिलांनी यामध्ये भाग घेतला आहे. श्री कृपा लरपीर्शी हॉलच्या पहिल्या आणि तळमजल्यावर हे प्रदर्शन आहे. यामध्ये अद्वितीय अश्या सजावटीच्या वस्तू, अत्युत्तम दागिने, विविध प्रकारचे कपडे, उत्तम परफुम्स, हटके असणाऱ्या कुर्ती, पर्सेस, हातमागाच्या वस्तू, कालाकुसरीच्या असंख्य वस्तू, हॅन्डमेड सोप्स, हस्तकलेच्या अनेक वस्तू, पिशव्या, खाद्यपदार्थ, असे अनेक स्टॉल येथे बघायला मिळतील. तरुणांमध्ये व्यवसायाची आवड निर्माण व्हावी म्हणुन ग्राहकांनी जरूर भेट द्यावी असे आवाहनही आयोजकांनी केले आहे.

# खारघरमध्ये ज्वेलर्स फोडून दीड कोटींचा ऐवज लंपास

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

खारघर सेक्टर १२ येथील कॅन्डीअर लाईफस्टाईल ज्वेलर्सच्या दुकानाचे शटर हत्याराच्या साहाय्याने उचकटून अज्ञात चोरट्यांनी १ कोटी ६४ लाख ३४ हजार ९७६ रुपयांचा ऐवज १० ऑगस्ट रोजी लंपास केला आहे. या चोरीत हिरे, सोन्याचे आणि प्लॅटिनमचे मोठ्या प्रमाणात दागिने तसेच रोख रक्कम चोरीला गेली आहे. या घटनेमुळे खारघर परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेक्टर १२ मधील सीआयएसएफ रोडवरील उत्सव चौक परिसरात साई कृपा प्रिमायसेस येथे कॅन्डीअर लाईफस्टाईल ज्वेलरी हे दुकान आहे. १० ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास दुकान बंद करण्यात आले होते. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानाचे शटर कोणत्यातरी हत्याराने उचकटून आत प्रवेश केला. दुकानातील दागिन्यांच्या विभागात हात साफ करत चोरट्यांनी ६८ लाख ९१ हजार ७७९ रुपये किमतीचे हिऱ्यांचे १३९ दागिने, १५ लाख ५७ हजार ३७९ रुपये किमतीचे सोन्याचे २७ दागिने तसेच ७९ लाख ५५ हजार ८१७ रुपये किमतीचे प्लॅटिनमचे ४८ दागिने लंपास केले.

# ‘ग्लोबल’च्या सेवाभावी उपक्रमांचा शुभारंभ

## आश्रमशाळेतील ४५० विद्यार्थ्यांना हायजिन किट, नेत्र तपासणी

| अलिबाग | प्रतिनिधी |

इंटरनॅशनल लायन्स क्लब अंतर्गत ग्लोबल सर्व्हिस टीमचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अनिल चिंतामण म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली सन २०२६-२७मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध सेवाभावी उपक्रमांचा शुभारंभ पाली येथील बल्लाळेश्वर मंदिरात गणेश पूजनाने झाला. यावेळी जिल्ह्यातील १५०हून अधिक लायन्स क्लब पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



ग्लोबल सर्व्हिस टीमतर्फे गरजूंसाठी १,००० हायजिन किट, १०१ शिलाई मशीन, १५१ सायकली‘ ८,००० वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे. शुभारंभानिमित्त वावळोली, ता. सुधागड येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील ४५० आदिवासी विद्यार्थ्यांना हायजिन किटचे वाटप करण्यात आले. तसेच ग्लोबल सर्व्हिस टीम व लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबाग यांच्या संयु विद्यमाने विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी व आवश्यक उपचार करण्यात आले. डॉ. रेखा म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

सोनल ग्रुप प्रायव्हेट लिमिटेड व लायन्स क्लब ऑफ पोयनाड यांच्या सहकार्याने कोपर येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला प्रिंटर भेट देण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा प्रांतपाल प्रवीण सरनाईक, विजय गणात्रा, अनिल जाधव, डॉ. नमिता मिश्रा, नयन कवळे, अविनाश गोयल, नितीन अधिकारी, संजय गोडसे, सुधीर सक्सेना, विद्या अधिकारी, प्रकाश नायर, श्रीकांत ओसवाल, गिरीश म्हात्रे, दीपक पाटील, साशी दामोदरन, पंकज मित्तल, अंकिता म्हात्रे, लक्ष्मी शर्मा, प्रियदर्शिनी पाटील, वैशाली कुचेकर यांच्यासह लायन्स क्लब ऑफ पोयनाड, मांडवा, मुरुड, नागाव, श्रीबागचे अध्यक्ष, पदाधिकारी व डायमंड क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# ‘एक राज्य, एक टोल’साठी राष्ट्रवादीचे स्वातंत्र्यदिनी आंदोलन

| पोलादपूर | प्रतिनिधी |

राज्यात वाहनचालकांकडून आकारण्यात येणाऱ्या टोलच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ‘एक राज्य, एक टोल’ अभियान हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट रोजी महाड-पोलादपूर मार्गावरील चांढवे टोल प्लाझा येथे राष्ट्रगीत गायन करून आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत पक्षाचे तालुकाध्यक्ष कृष्णा करंजे यांनी युवा कार्यकर्त्यांसह निवासी नायब तहसीलदार नितीन पाटील यांना निवेदन दिले.



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

राज्यात प्रवास करताना एका वाहनाकडून एका दिवसात केवळ एकच टोल आकारण्यात यावा, तसेच एकदा टोल भरल्यानंतर त्या दिवसात राज्यातील इतर टोल नाक्यांवर पुन्हा शुल्क आकारू नये, अशी मागणी पक्षाने केली आहे.

वाहन खरेदीच्या वेळी वाहनधारकांकडून एकरकमी रस्ता कर घेतला जातो. त्यानंतर इंधन खरेदी करतानाही विविध कर आकारले जातात. असे असताना राज्यभर प्रवास करताना अनेक ठिकाणी टोल भरण्याची सक्ती म्हणजे सर्वसामान्यांच्या उत्पन्नावर अतिरिक्त आर्थिक भार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. राज्यातील अनेक रस्त्यांची दुरवस्था, मोठमोठे खड्डे, वाढते इंधन दर, वाहनांच्या दुरुस्तीचा खर्च आणि वाढती महागाई यामुळे नागरिक आधीच आर्थिक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत शैक्षणिक, कृषी किंवा वैद्यकीय कारणांसाठी मोठ्या शहरांकडे जाताना वारंवार टोल भरावा लागत असल्याने वाहनधारकांमध्ये नाराजी आहे.

- **चांढवे टोल नाक्यावर राष्ट्रगीत गायन**
- **कृष्णा करंजे यांचे प्रशासनाला निवेदन**

‘एका वाहनाला एका दिवसात एकच टोल’ या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस युवक, युवती व विद्यार्थी आघाडीचे कार्यकर्ते १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता चांढवे टोल प्लाझा येथे राष्ट्रीय तिरंगा हातात घेऊन राष्ट्रगीत गायन करणार आहेत, अशी माहिती निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.

## वाईन शॉपचे शटर तोडून चोरी

**रसायनी** : मोहोपाडा येथील डिंपल वाईन शॉप मध्ये अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करत चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी दुकानातील ड्रॉवरचे लॉक तोडून ४५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन असा एकूण ५५ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## महिला बचत गटांची करोडोंची भरारी | महिलांचा लघुउद्योगातून स्वावलंबनाचा प्रवास

# महिलांनी जागवली ‘उमेद’

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ, ममदापूर, शेलू आणि दामत परिसरातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाची नवी वाट निर्माण केली आहे. ‘उमेद’ अभियानांतर्गत सुमारे ३ हजार महिलांना एकत्र आणून ३० महिला ग्रामसंघांच्या माध्यमातून बचत गटांचे जाळे उभे करण्यात आले असून, विविध लघुउद्योगांतून या महिलांनी आर्थिक भरारी घेतली आहे.



ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ‘भरारी महिला प्रभागसंघ नेरळ’ची वार्षिक सर्वसाधारण सभा नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात उत्साहात झाली. जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे आणि कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांच्या हस्ते सभेचे उद्घाटन झाले.

यावेळी तालुका अभियान व्यवस्थापक निशा आवस्कर, सहव्यवस्थापक अविनाश जाधव, पंचायत समिती व्यवस्थापक राम नेमाडे, प्रभागसंघाच्या अध्यक्षा वर्षा बोराडे, उपाध्यक्ष संगीता गवळी, कोषाध्यक्ष अंकिता मोरे, प्रभाग समन्वयक तसेच नेरळ ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले उपस्थित होते.

जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे यांनी महिला साधन व्यक्तींचे प्रश्न जिल्हा परिषदेत मांडण्याचे आश्वासन देत महिला बचत गटांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याची घोषणा केली. माजी सभापती तथा ग्रामसंघाच्या अध्यक्षा आरती भगत यांनी वार्षिक अहवाल सादर केला. रेशमा भवारे यांनी स्वागतगीत, तर तालुका समन्वयक रेखा हिरेमठ यांनी उमेद गीत सादर केले. सूत्रसंचालन आसावरी काळे यांनी केले. सभेला परिसरातील बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. त्यामुळे बापूराव धारप सभागृह महिलांच्या उपस्थितीने गजबजून गेले.

### बचत गटांतून लघुउद्योगांना बळ

महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून कर्ज घेऊन विविध व्यवसाय उभारले असून, त्यातून रोजगारनिर्मितीला चालना मिळाली आहे. वार्षिक सभेत वर्षभरातील कामांचा आढावा, आर्थिक ताळेबंद, महिला सक्षमीकरणाच्या योजना आणि आगामी उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. नेरळ प्रभागसंघात शेलू येथील प्रगती, संस्कृती, उन्नती महिला ग्रामसंघांसह नेरळमधील कृष्णाई, श्री साई श्रद्धा, सई, भीमाई, रमाबाई, दुर्गामाता, अन्नपूर्णा, रंगिणी, जय मल्हार, विघ्नहर्ता, श्री कृपा, रिद्धी तसेच भडवळ येथील श्री जीवदानी, श्री शक्ती, रोशनी, निर्विकार आणि शेलू येथील क्रांती महिला ग्रामसंघांचा समावेश आहे.

## निवडक



# नाईक महाविद्यालयात एड्स जनजागृती

कोर्लई : कोकण उन्नती मित्रमंडळ संचलित मुरुडच्या वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समन्वयक डॉ. बागुल, प्रा. म्हात्रे, प्रा. प्रणव बागवे, प्रा. चिंतन पोतदार, प्रा. सायमा अनवारे आणि लॅब असिस्टंट समीर धांडोरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि एनएसएसचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख वक्त्या पूजा तोंडले पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स या आजाराविषयी शास्त्रीय माहिती देऊन जनजागृती केली तर अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.के. कांबळे यांनी उपस्थितांना आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी जीवनात संयम बाळगून एड्ससारख्या विषयांवर योग्य माहिती घेण्याचे व ती समाजात पसरवण्याचे आवाहन केले. यावेळी मुरुड शहरात भव्य एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. एड्स टाळा, जीवन वाचवा अशा विविध घोषणा देत विद्यार्थ्यांनी मुरुड शहर परिसरात प्रबोधन केले. या उपक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीच्या सर्व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रवेश पाटील यांनी केले.



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

# मॉर्निंग स्टार स्कूलमध्ये क्रांती दिन साजरा

**आगरदांडा** : जंजिरा विद्या मंडळ संचलित मॉर्निंग स्टार प्री-प्रायमरी अँड प्रायमरी स्कूल मुरूडमध्ये क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिभा जोशी, संस्थेचे सचिव चंद्रकांत अपराध, श्रुती तांबे, संस्थेचे संचालक उदय दांडेकर, पांडुरंग आरेकर, अभय दिवेकर, सुशीला म्हात्रे, मुख्याध्यापिका आदिश्री जोशी, अक्षय पाटील, वैशाली भायदे, महेश भोईर, शिल्पा मसाल, वैशाली म्हात्रे, ज्योती पाटील, नीता चौहान, निकिता रणदिवे आदींसह शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमांच्या सुरुवातीला प्रतिभा जोशी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. तर संस्थेचे सचिव चंद्रकांत अपराध यांच्या हस्ते वीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शाळेतील ८४ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. क्रांती दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध क्रांतिकारकांच्या वेशभूषा साकारून त्यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे केली. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या क्रांतिकारकांच्या भूमिका व देशभक्तीपर भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.

# मोबाईल टॉवरवरून बॅटऱ्या लंपास

**रसायनी** : लाडीवली आणि सारसई येथील इंडस मोबाईल टॉवरवरून अज्ञात चोरट्यांनी एक्साईड कंपनीच्या एकूण ४८ बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. याबाबत सविस्तर हकीकत अशी की, पुणे येथील बिफोरएस सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडया कंपनीच्या देखरेखीखाली पनवेल तालुक्यात इंडस मोबाईल टॉवर कंपनीचे टॉवर कार्यरत आहेत. अज्ञात चोरट्यांनी लाडीवली येथील लोना कंपनीच्या बाजूला असलेल्या टॉवर क्रमांक १०५३७८१ मधून आणि सारसई येथील टोकाची वाडी येथील टॉवर क्रमांक १०५३९४४ मधून एक्साईड कंपनीचे एकूण ४८ बॅटरी सेल्स चोरून नेले. या चोरीला गेलेल्या सर्व बॅटऱ्यांची एकूण किंमत १४ हजार ४०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. या चोरीच्या घटनेप्रकरणी कंपनीचे अधिकारी रोशन मुरलीधर मांडे (रा. रोहा) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून रसायनी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार एच. पी. म्हात्रे करत असून, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा अधिक गतिमान करण्यात आली आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

● जन्नावर हॉस्पिटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९

● ऑफिस स्टाफ आवश्यक Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.

● गाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

● डिलेव्हरीसाठी माणसे पाहिजेत. फक्त अलिबाग परिसरातील गरजुनी १)पोयनाड, वडखळ, पेण, २) रेवदंडा मुरुड, श्रीवर्धन, ३) बाईक आमची लायसन्स पाहिजे. ४) कॉम्प्युटर ऑपरेटर सकाळी ९-०० ते १.०० व दुपारी ३.०० ते ७.०० ५) पार्ट/फुल टाईम चालेल. मो.नं.८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय, अलिबाग-रायगड

**वार्षिक अहवाल २०२५-२०२६**

**वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा**

(फक्त सभासदांसाठी)

स.न.वि.वि.

सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय, अलिबाग-रायगड या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता डोंगरे हॉल, अलिबाग येथे भरविण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे.
२. सन २०२५-२०२६ चे हिशेब तपासणीसांकडून आलेले हिशेब ताळेबंद मंजूर करणे,
३. कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या सन २०२५-२०२६ च्या अहवालास मंजुरी देणे..
४. संस्थेच्या सन २०२६-२०२७ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५. सन २०२६-२०२७ या सालाकरिता संस्थेच्या हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे.
६. मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

अलिबाग — आपला
दिनांक : १४/०९/२०२५ — **ॲड. गौतम प्रमोद पाटील**
अध्यक्ष
सार्वजनिक वाचनालय, अलिबाग

**विशेष सूचना :-**
१) संस्थेच्या हितास अधिन राहून अहवाल काळातील आवश्यक ती कागदपत्रे सभेपूर्वी तीन दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६.०० ते ७.०० या कालावधीत लेखी मागणी केल्यास पहावयास मिळतील.
२) सदर सभा कोरम अभावी तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत व बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ५३ | जिरायत ०-२६-५०<br>बागायत ०-०७-३०<br>एकुण ०-३२-८० | ३.८० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक १) अवधुत श्रीधर नाख्ये, २) योगेश श्रीधर नाख्ये यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग — **ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
दिनांक- १३/०८/२०२६ — ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
मोबा. नं. ९९२२७०७०१२ — गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| कुरूळ ता.अलिबाग, | ३७/१/ब | ०-०६-९०<br>पो.ख.०-००-३०<br>एकुण क्षेत्र ०-०७-२० | ०.१२ | विष्णू महादेव मगर |

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १४/०८/२०२६ — **ॲड. किशोर म.हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

**वार्षिक अहवाल २०२५-२६**

## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि., पनवेल.

**६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

**सभेची नोटीस**

सन्माननिय सभासद,

आपणास कळविण्यात येते कि, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँकेची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०१/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता बँकेचे मुख्य कार्यालय, पनवेल -रायगड येथे आयोजित केली आहे. सभेपुढील कामकाजाचे विषय खालीलप्रमाणे आहेत. तरी कृपया सभासदांनी अगत्यपूर्वक उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

१. दिनांक ११/०९/२०२५ रोजी झालेल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे : २. दिनांक ३१ मार्च २०२६ वर्ष अखेरचा लेखा परिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल यांस मान्यता देणे.
३. बँकेच्या सन २०२५-२६ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षकाचा हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२६ सालच्या नफा विभागणी प्रस्तावास व लाभांश वाटपास मंजुरी देणे.
५. सन २०२६-२७ वर्षाच्या आर्थिक अंदाज पत्रकास मान्यता देणे.
६. सन २०२६-२७ करिता रिझर्व बँकेद्वारे वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्तीस मान्यता देणे.
७. या वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमावित करणे.
८. अनुत्पादीत मालमत्तेतील वसुली होऊ न शकणारी खाती निर्लेखीत करणेबाबत :
९. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : पनवेल — **संचालक मंडळाच्या आदेशावरुन**
दिनांक : १४/०८/२०२६ — **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सूचना :** १) वरील वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आवश्यक ती गणपूर्ती (कोरम) न झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना वार्षिक जमाखर्च/ ताळेबंद पत्रकासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी तसे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बँकेच्या पत्त्यावर दिनांक २५/०८/२०२६ पर्यंत लेखी कळवावे किंवा पत्र बँकेच्या केंद्र कार्यालयात आणून द्यावे, जेणेकरुन आवश्यक माहिती उपलब्ध करुन देता येईल.
३) ज्या सभासदांनी/ठेवीदारांनी के.वाय.सी (KYC) ची पुर्तता केलेली नाही त्यांनी सदर पुर्तता करुन सहकार्य करावे. त्याकरीता फोटो, पॅनकार्ड व आधारकार्ड इ. बँकेस सादर करावे.
४) नवीन सभासदांनी त्यांची शेअर्स सर्टीफिकेटस मिळालेली नसतील त्यांनी ती कृपया मुख्य कार्यालयात घेऊन जावे व बँकेस सहकार्य करावे.
५) मयत सभासदांची नांवे त्यांच्या नातेवाईकांनी बँकेस कळवावे म्हणजे बँकेतील सभासदांचे रेकॉर्ड अद्यावत करता येईल.
६) सभासदांनी आपले पत्ते बदलले असल्यास बदललेला पत्ता बँकेस पुराव्यासह कळवावा.
७) सभासदांनी आपले शेअर्स करीता वारस नोंद करणे गरजेचे आहे ज्या सभासदांनी वारस नोंद केली नसेल त्यांनी आपल्या वारसाची नोंद करावी

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यांसदंर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकती आमचे अशिलांनी विकत देणेचे ठरविले आहे. तसेच सदर मिळकतीला तारेचे कुंपण घालून चतुः सिमा निश्चित केलेली आहे.

**मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सतिश रमेश पिंपरे | १० | १ | ०-०८-१०<br>पो.ख.०-००-५०<br>०-०८-६० | ०.०९ |
| २ | शालिनी रमेश पिंपरे<br>सतिश रमेश पिंपरे | १० | २/अ | ०-६०-५०<br>पो.ख. ०-०८-१०<br>०-६८-६० | ०.४७ |
| ३ | शालिनी रमेश पिंपरे<br>सतिश रमेश पिंपरे | ९ | १/अ | ०-४०-००<br>पो.ख. ०-०७-१०<br>०-४७-०० | २.६१ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लिजचार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १४/०८/२०२६ — सही/-
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संजिवनी संजय घुमरे**
मो.नं. ९७६३३९९१३४

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिल श्री. निलेश लक्ष्मण दभडे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. किशोर गजानन बामणे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ११७/१/अ/६ | १.४६.०० | २.९२ |

वरील वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतींतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत — सही /-
ता. १४/०८/२०२६. — **ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा,
निर्माण नगरी, नेरळ (पू) ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८०८७४३०४४७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे तुडाळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर २/१, एकूण क्षेत्र ०-८७-८० हे.आर., आकार १०.९० रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०२-५० हे. आर., आकार ०.३१ रू. पैसे ही भातशेती मिळकत तसेच सदर मिळकतीतील गट ग्रामपंचायत थळ हद्दीतील मौजे तुडाळ, मालमत्ता क्र. ५१४, क्षेत्र ७४.८१ चौ. मीटर ही घर मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रताप वसंत अधिकारी रा. २०१, विनस रेसीडेन्सी, बी कॅबिन, शिवाजी नगर, ठाणे ४००६०२ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १३/०८/२०२६ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक (खालीन नमुद केल्याप्रमाणे) यांच्या सामाईक मालकी हक्कातील, ताबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे माकटी (५५४६१३), तालुका माणगाव, जिल्हा रायगड, येथील शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे माकटी (५५४६१३), ता. माणगाव, जि. रायगड**

| जमिन मालकांचे नाव | भुधारणा पध्दती | भूमापन/ उपविभाग/ | एकूण क्षेत्रफळ (हे.आर.प्रति) सर्व्हे/हिस्सा क्रमांक | आकार |
|---|---|---|---|---|
| (१) श्री. कैलास शंकर गोरेगावकर<br>(२) श्री. जनार्दन शंकर गोरेगावकर<br>(३) श्री. विलास शंकर गोरेगावकर<br>(४) श्रीमती. अंकिता अनिल तळकर<br>(७) श्रीमती. शुभांगी सचिन वेलोस्कर<br>(६) श्रीमती. सुनंदा सुदाम महाडिक<br>(७) श्रीमती मंदा यशवंत रहाटाडकर | भोगवटादार वर्ग१ | ४५/० | ०-५७-०० | ०.३३ |
| | भोगटवटादार वर्ग २ | ८४/० | ०-६२-०० | ०.३६ |
| श्री. लक्ष्मण सहादेव गोरेगावकर | भोगवटादार वर्ग १ | ८५/० | ०-५७-०० | ०.२५ |
| | | एकुण | १-७६-० | |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौता ज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापूर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाण घेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/ सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही व आमचे अशिल सदर जमिन मिळकती संदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: ११६/११७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
फोन नं. ०२२- ४००२६१४२ / ९८२०५२३०७७
E-Mail ID - ajeet_advocate@yahoo.co.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २८, क्षेत्र ०-२७-०० हे.आर.पो.ख. ०-०८-०० हे.आर. एकूण क्षेत्र ०-३५-०० हे.आर; आकार ०.५० रू.पैसे या मिळकतीपैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-०३-०० हे.आर. ही मिळकत व तसेच ग्रामपंचायत झिराड हद्दीतील, मौजे झिराड, मालमत्ता क्र. १८६५, क्षेत्र ३ चौरस २५ चौ. फूट ही घर मिळकत. या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक सखाराम म्हात्रे रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १३/०८/२०२६ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कोचरे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग १) भूमापन नं. १५४/३ ब, एकूण क्षेत्र ९-४१-०० हे.आर., आकार ३.८२ रूपये २) भूमापन नं. ११५/१ ब, एकूण क्षेत्र ०-६४-२० हे.आर. आकार २.६२ रूपये या जमीन मिळकती या मिळकतीचे विद्यमान मालक उमा काशिनाथ सावंत, पंढरीनाथ बाळकृष्ण रेगे, स्वाती अनिल पालेकर व रविंद्र बाळकृष्ण रेगे यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १३/०८/२०२६ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## उरण नगरपरिषद, उरण

**जि. रायगड**

**निविदा सूचना**

शासनाचे स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेअंतर्गत उरण नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी (एकूण १३ कामांसाठी) सार्व. शौचालयाचे बांधकाम व नुतनीकरण करणे कामी नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदाराकडून गुणवत्ता निकषाद्वारे निविदा मागविणेत येत आहे. सदर कामांसंबंधी सविस्तर तपशिल दिनांक १३-८-२०२६ पासून दिनांक २५-८-२०२६ पर्यंत उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागाकडे उपलब्ध आहे. इच्छुक ठेकेदारांनी कृपया बांधकाम विभागाशी संपर्क साधावा.

सही/-
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.दामोदर किशोरदास गुजर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३९/२०, यांचे एकुण क्षेत्र ०.१८.०० गुंठे मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १३/०८/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

**या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-धानसर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील गट क्रमांक-१०१, गट क्रमांकाचा उपविभाग ०, क्षेत्र सुमारे ०-१०-१० हे. आर. पी. क्षेत्राची जमीन श्री गजानन हाशा पोरजी, यांच्या मालकीची असून, सदर जमीन मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.**

**सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पुराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता-४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक-८७, सेक्टर क्रमांक-१५, सी.बी.डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमीन मिळकतीबाबतचा खरेदी-विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.**

**दिनांक : १४ ऑगस्ट २०२६** — **सही/-**
**श्री. सुनिल जे. गर्ग**
**वकील**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी खालील कामासाठी ई-खुल्या निविदा आमंत्रित करीत आहेत.

**क्र.: 1. कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत कलंबणी टीएसएस येथे ॲल्युमिनियम फीडरऐवजी कॉपर फीडर बसविणे. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/16ए/2026, दिनांक: 14.08.2026. अंदाजित किंमत**: रु 23,74,758/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु 47,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). **निविदा ऑनलाइन जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 24.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र.: 2. कामाचे नाव**: केआरसीएलच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत खेड (140 मीटर) आणि कणकवली (160 मीटर) प्लॅटफॉर्मवर प्रस्तावित कव्हर शेडसाठी प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देणे. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/24/2026, दिनांक: 14.08.2026. अंदाजित किंमत**: रु 19,12,445/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु 38,200/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). **निविदा ऑनलाइन जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 24.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा किंवा रेल्वेच्या संकेतस्थळावर (**www.ireps.gov.in**) पाहावे.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**

**फॉर्म झेड**

**(नियम १०७ चा उपनियम ११(डी ११)**

**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा धरमतरचे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०९.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्यानंतर दिनांक २९.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. प्रविण चिंतामण पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रूपये २,४६,३०९/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रुप ग्रामपंचायत माणकुळे ता.अलिबाग हद्दीतील श्री प्रविण चिंतामण पाटील व पुनम प्रवीण पाटील यांच्या नावे असलेली मालमत्ता क्र.७० क २ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यास आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रूपये २,४६,३०९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**कर्जदार :- श्री प्रविण चिंतामण पाटील**

मौजे ग्रुप ग्रामपंचायत माणकुळे ता.अलिबाग हद्दीतील श्री. प्रविण चिंतामण पाटील व पुनम प्रविण पाटील यांच्या नावे असलेली मालमत्ता क्र. ७० क २ क्षेत्र ३५.२ चौ मी हे घर

स्थळ : अलिबाग — सही/-
दिनांक : ११.०८.२०२६ — **श्री.के.के.राऊत**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. दिनेश भालचंद्र थळे आणि श्री. विवेक विठ्ठल थळी यांची सामाईक शेतमिळकत कायम खरेदीखताद्वारे विकत देण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत वरील शेतकरी लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**शेत मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चाणजे, ता. उरण, जि. रायगड**

| गाव | भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रू/पैसे |
|---|---|---|---|---|
| चाणजे, ता.उरण. | ३७१ | १ | ०-४०-३०<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकुण ०-४३-८०<br>पैकी ०-४०-० गुंठे इतक्या शेतमिळकतीची विक्री करणेबाबत. | ५.०९ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यांस त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकणः धुतूम-उरण — सही/
ता. १३/०८/२०२६ — **ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
कार्यालयः ऑफीस क्र.२ जय भवानी संकुल,
जय भवानी पेट्रोल पंप जवळ, जे.एन.पी.टी
- कळंबोळी रोड, पौंडखार गाव, पो.जासई
(व्हाया पनवेल - ४१०२०६) ता.उरण, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक कुणाल मोहन पाटील व साधु मुरलीधर दुटे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विकसना संदर्भात (Development) करण्याकरीता करीता बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपुर ता.अलिबाग | ५८/१/२८ | ३-६५-००<br>(३६५ चौ.मी) | ३५.०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग — **ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
दिनांक:०७/०८/२०२६ — रा.बुरुमखाण, वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### मुरुडमध्ये रात्रीपासून जोरदार पाऊस

**कोर्लई :** मुरुड तालुक्यात रात्रीपासून वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावल्याने अनेक भागांत पाणी साचले आहे. काही ठिकाणी घरांमध्ये, तर रस्त्यांवरही पाणी शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. सकाळपर्यंत ६८ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, यंदाच्या हंगामात आतापर्यंत २०१५ मि.मी. पाऊस झाला आहे. रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे काशीद, बारशिव, बोर्ली आणि मांडला परिसरातील सखल भागांमध्ये पाणी साचले. परिणामी वाहतुकीसह दैनंदिन जनजीवनावर परिणाम झाला.दरम्यान, मध्य प्रदेशातील कमी दाबाचे क्षेत्र आणि कोकण किनारपट्टीवर सक्रिय असलेल्या मान्सून ट्रफचा परिणाम राज्याच्या हवामानावर होत आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असून, घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १७ ऑगस्टपर्यंत राज्यात पावसाची शक्यता असून, कोकणात या काळात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे मुरुड तालुक्यातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### कर्जाचे आमिष दाखवून फसवणूक

**रोहा :** २० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून विविध कारणांसाठी ४६ हजार ४०० रुपये उकळून फसवणूक केल्याचा प्रकार रोहा तालुक्यातील सुडकोली येथे समोर आला आहे. आरोपीने कर्जाच्या प्रक्रियेसाठी शेअर्स, स्टॅम्प पेपर व विमा काढण्याच्या नावाखाली पैसे घेतले. त्यानंतर कर्ज मंजूर झाल्याचे सांगून बनावट कागदपत्रे व अस्तित्वात नसलेल्या पतसंस्थेच्या नावाने शेअर्स दिले. मात्र, कर्जाची रक्कम खात्यात जमा केली नाही. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून सपोनि श्री. खाडे तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत महिला गंभीर

**पेण :** मुंबई-गोवा महामार्गावरील देवळी बसथांब्यासमोर भरधाव दुचाकीने रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला धडक दिल्याची घटना १२ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. महाडहून मुंबईकडे जाणाऱ्या दुचाकीस्वाराने वाहन हयगयीने व अतिवेगाने चालवून महिलेला धडक दिली. अपघातात महिलेचा डावा हात फ्रॅक्चर झाला असून डोके व हनुवटीला गंभीर दुखापत झाली आहे. दुचाकीस्वारालाही किरकोळ दुखापत झाली. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला सहायक फौजदार कांबळे तपास करीत आहेत.

### वनिता घरत यांचे निधन

**चौल :** अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावचे अध्यक्ष रवींद्र घरत यांच्या मातोश्री वनिता मधुकर घरत यांचे रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी पहाटे सहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या. मागील वर्षभरापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. कै. वनिता घरत यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली, नातवंडे, पतवंडे असा



मोठा परिवार आहे. रवींद्र घरत रायगड डाक विभागाच्या मुख्य शाखेत कार्यरत असल्याने डाक विभागातील उच्च पदस्थ अधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहात वनिता घरत यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पार्थिवावर चौलमळा गावच्या अमरधाम स्मशानभूमीत दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कै. वनिता घरत यांचा दशक्रिया विधी मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता होणार असल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

### दीपावलीचा कंदील आठ महिन्यांनंतरही निघेना!

**खांदा कॉलनी :** शहरातील जय भारत नाका परिसरात मागील वर्षी २०२५ मध्ये दीपावलीनिमित्त लावण्यात आलेला आकर्षक कंदील तब्बल आठ महिने उलटून गेल्यानंतरही हटविण्यात आलेला नाही. नवीन वर्ष सुरू होऊन आठ महिने झाले, तरीही हा कंदील 'जैसे थे' अवस्थेत असल्याने महापालिकेच्या कारभारावर नागरिकांकडून



प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दीपावलीच्या काळात नागरिकांना शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आलेला हा कंदील आता जीर्ण व अस्वच्छ अवस्थेत दिसत आहे. विशेष म्हणजे, शहर 'सुंदर आणि स्वच्छ पनवेल' करण्याच्या घोषणा केल्या जात असताना प्रमुख चौकातच महिनोनमहिने जुनी सजावट तशीच ठेवण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जय भारत नाका हा शहरातील वर्दळीचा आणि प्रमुख परिसर असून, या ठिकाणी कंदील रस्त्याच्या मध्यभागी लावण्यात आला आहे. त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीनेही त्याची योग्य व्यवस्था करण्याची गरज आहे. उत्सव संपल्यानंतर सजावटीचे साहित्य तातडीने हटविणे अपेक्षित असताना, आठ महिन्यांनंतरही संबंधित विभागाचे त्याकडे लक्ष गेले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. 'सुंदर आणि स्वच्छ पनवेल'चा संदेश देणाऱ्या प्रमुख चौकाचीच अशी अवस्था असेल, तर शहर स्वच्छ ठेवण्याच्या मोहिमेचे काय?' असा सवाल नागरिकांकडून केला जात असून, महापालिका प्रशासनाने तातडीने हा कंदील हटवून परिसराची स्वच्छता करावी, अशी मागणी होत आहे.

# भटक्या श्वानांची दहशत

## प्रशासकीय उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**।श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरात गेल्या काही महिन्यांपासून भटक्या श्वानांचा उपद्रव अत्यंत चिंताजनक झाला आहे. शहरात लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना आता रस्त्यावरून चालणेही धोक्याचे वाटत आहे. काही दिवसांपूर्वीच एका महिलेवर श्वानांच्या टोळक्याने हल्ला करून चावा घेतल्याची घटना ताजी असताना, एका लहान बालकाला श्वानाने चावा घेतल्याची घटना घडल्याने शहरात भीतीचे सावट पसरले आहे.



शहरातील प्रत्येक पाखाडी आणि मुख्य चौकात भटक्या श्वानांच्या टोळ्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्याने जाणाऱ्या एकट्या-दुकट्या व्यक्तीवर किंवा शाळकरी मुलांवर हे श्वान अचानक धावून जातात. हातातील वस्तू हिसकावणे, अंगावर उडी मारणे आणि चावा घेणे अशा प्रकारांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. सन २०२५ -२०२६ या काळात तब्बल १९ हून अधिक नागरिकांना श्वानदंशाचा त्रास सहन करावा लागला असून, हा आकडा केवळ नोंद झालेला आहे; प्रत्यक्षात ही संख्या अधिक असण्याची शक्यता आहे.

श्वानांची झपाट्याने होणारी पैदास रोखण्यासाठी श्रीवर्धन नगर परिषदेकडून आवश्यक असणारी निर्बीजीकरण मोहीम गेली अनेक वर्षे रखडलेली आहे. नगर परिषदेने यासंदर्भात वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध केली होती; परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही प्राणी मित्र संघटनेने अथवा ॲनिमल वेल्फअर एजन्सीने यामध्ये स्वारस्य दाखवले नाही.

> मोकाट श्वानांना पकडण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी तैनात करणे, त्यांचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण आणि निर्बीजीकरण करणे या प्रक्रियेसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. लसीकरण व तपासणी खोली आणि शस्त्रक्रिया खोलीचे बांधकाम लवकरच पूर्णत्वास येईल.
> – अनंत गुरव, उपनगराध्यक्ष

प्रशासनाचे अपयश आणि संस्थांची अनास्था याच्या कचाट्यात मात्र सर्वसामान्य नागरिक भीतीच्या छायेत वावरत आहेत. नगर परिषदेने आता प्रत्यक्ष कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## रायगडात दुर्मिळ नारंगी 'वॅक्सकॅप' बुरशीचे दर्शन

**। आंबेत । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागातील म्हसळा तालुक्यातील चिंचोंडे गाव परिसरात दुर्मिळ आणि आकर्षक नारंगी रंगाची 'वॅक्सकॅप' बुरशी आढळून आली आहे. वनविभागाचे अधिकारी अतुल अहिरे जंगल परिसरात फेरफटका मारत असताना त्यांना ही अनोखी बुरशी आढळली.

हायग्रोसायबी मिनियाटा (Hygrocybe) या शास्त्रीय नावाने ओळखली जाणारी ही बुरशी 'व्हर्मिलियन वॅक्सकॅप' म्हणूनही परिचित आहे.

महाराष्ट्रात कोकण प्रदेश तसेच मुंबईजवळील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये तिची नोंद झाली आहे. पावसाळ्यात आणि पावसाळ्यानंतरच्या काळात ओलसर माती, शेवाळ, पालापाचोळा तसेच कुजणाऱ्या सेंद्रिय पदार्थांमध्ये ही बुरशी आढळते.



ही बुरशी गडद लाल किंवा नारंगी रंगाची असून तिचे रूप अत्यंत आकर्षक असते. तिची टोपी साधारण एक ते तीन सेंटीमीटर रुंद असते, तर तिचे कल्ले जाड, मेणासारखे आणि एकमेकांपासून दूर असतात.

म्हसळ्यातील चिंचोंडे परिसरात या दुर्मिळ बुरशीचे दर्शन झाल्याने स्थानिक जैवविविधतेचे वैशिष्ट्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## दोन पिढ्यांतील संवादाचा सेतू ठरणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आजच्या जेन झी पिढीला दोष देण्याऐवजी समजून घेणे, संवाद साधणे आणि पालक-मुलांमधील दरी कमी करण्याचा सकारात्मक संदेश देणाऱ्या डॉ. गोरखनाथ पोळ लिखित 'मी जेन एक्स... एका जेन झेडचा बाबा' या पुस्तकाचे प्रकाशन सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, कामोठे येथे उत्साहात झाले.



जेन एक्स आणि जेन झी या दोन पिढ्यांमधील विचार, तंत्रज्ञान, शिक्षण, करिअर, नातेसंबंध आणि संस्कारांतील बदलांचा वेध या पुस्तकातून घेण्यात आला आहे. 'जेन झीला बदलण्याआधी त्यांना समजून घेऊया; उपदेशापेक्षा संवाद आणि अपेक्षांपेक्षा विश्वासाला महत्त्व देऊया,' हा पुस्तकाचा मुख्य संदेश आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सुषमा पाटील दिलीप पाटील, विकास घरत, डॉ. भगत, डॉ. पवन अग्रवाल, डॉ. मंदार पनवेलकर, डॉ. अनंत धरणेकर, श्रावण घरत, चंद्रकांत जाधव, बाळासाहेब फडतरे, स्मिता पनवेलकर, भाई पाटील, विलास पाटील (आर.एस.पी.), राहुल राणे, प्रकाश वाळुंज, संजय किसवे, संचालक अर्जुन गोवारी, दिलीप गुप्ता, दिनेश गुप्ता, विजय सावंत, गोरख जेधे, मुख्याध्यापक फडतरे, सुरेश खरात यांच्यासह शिक्षण, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी पुस्तकाच्या विषयाचे कौतुक करत पालक, शिक्षक आणि तरुण पिढीमध्ये परस्पर समज वाढविण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, अशी भावना व्यक्त केली. मानसी पोळ, संचालक एस नॅपकिन बुके'ज सत्कार हाऊस यांनी आभार मानले.

## नेरळमध्ये मध्यरात्री स्वातंत्र्यदिनाचा जल्लोष

### अग्निवीर सिद्धी क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील नेरळ माथेरान नाका येथील हुतात्मा चौकात यंदाही मध्यरात्री स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात येणार आहे. हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने २००५ पासून हा अनोखा ध्वजारोहण सोहळा आयोजित केला जात आहे. यंदा अग्निवीर सिद्धी क्षीरसागर यांच्या हस्ते मध्यरात्री १२ वाजून १ मिनिटांनी तिरंगा फडकविण्यात येणार आहे.

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त हुतात्मा चौक ते नेरळ गाव अशी मशाल फेरीही काढण्यात येणार आहे. ध्वजारोहणानंतर फटाक्यांची आतषबाजी करून स्वातंत्र्यदिनाचा उत्सव साजरा केला जाणार आहे.

दरवर्षी हुतात्मा स्मारक समितीतर्फे नेरळ परिसरातील माध्यमिक शाळांमध्ये दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. यंदा एलएईएस शाळेची विद्यार्थिनी सायली मुंढे हिने ९७ टक्के गुण मिळवून नेरळ परिसरात प्रथम क्रमांक पटकावल्याने तिचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास तरुण मंडळी व लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे.

## आठ लाख ३९ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** गॅस बिल अपडेट करायचे आहे असे सांगून गॅसची बनावट फाईल डाऊनलोड करण्यास लिंक पाठवली आणि मोबाईलचा ॲक्सेस मिळवून आठ लाख ३९ हजार रुपयांचे ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात दहा ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील सतीश पिल्लाई हे खुटुक बंधन गाव सेक्टर ३५, खारघर येथे राहत असून दोन ऑगस्ट ते ८ ऑगस्ट दरम्यान महानगर गॅस कार्यालयातून बोलत असून तुमच्या गॅस बिल अपडेट करण्याचे सागून खात्यातून आठ लाख ३९ हजार रुपये रक्कम काढून त्यांची फसवणूक केली.

## काजी मोहल्ल्यात घरफोडी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जिते गावातील काजी मोहल्ला येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा सुमारे ४८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. २ ते १२ ऑगस्टदरम्यान ही चोरी झाली. बाथरूमच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून काच काढत चोरट्याने घरात प्रवेश केला. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक पोलीस हवालदार मोहिते तपास करीत आहेत.

## अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्या पाच डंपरवर कारवाई

### सहा जणांवर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील सिडको अधिसूचित क्षेत्रात बेकायदेशीरपणे व लोकांच्या आरोग्यास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने डेब्रिज टाकणाऱ्यांविरुद्ध सिडकोच्या भरारी पथक आणि उरण पोलिसांनी धडक कारवाई केली आहे.

याप्रकरणी ११ ऑगस्ट रोजी उरण पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण ५ डंपर जप्त करण्यात आले आहेत. ११ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे तीन वाजताच्या सुमारास, गव्हाण फाटा-चिरनेर रोडवरील दिघोडा जांभुळपाडा (डीएनए मरीन सर्व्हिसेसजवळ) मुख्य रस्त्याच्या बाजूला लोकांच्या आरोग्यास धोकादायक ठरेल अशा प्रकारे बेकायदेशीरपणे डेब्रिज खाली करताना दोन डंपर रंगेहाथ पकडले गेले आहेत.

याप्रकरणी सिडको द्रोणागिरी नोडल कार्यालयाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता उमेश प्रकाश देशमुख (३६) यांच्या तक्रारीवरून अज्ञात डंपर चालक व मालकांविरुद्ध उरण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक सुरेश कुऱ्हाडे पुढील तपास करत आहेत. वाहतूक पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सिडको पथकाने जांभुळपाडा ज्ञानेश्वर यार्ड परिसरात छापा टाकला. तेथे सिडकोच्या जागेत अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्या चालक मुकेश कुमार तिवारी (३७, रा. गोपाळगंज, बिहार), चालक गिरीजा शंकर यादव (५१, रा. जौनपूर, उत्तर प्रदेश) आणि चालक शिवलाल दाशो तुरी (२८, रा. बोकारो, झारखंड) या तिघांना ताब्यात घेण्यात आले.

या चालकांनी सिडको क्षेत्राचे विद्रुपीकरण करून नागरिकांच्या आरोग्यास व जीवितास हानी पोहोचेल अशा बेजबाबदार पद्धतीने डेब्रिज टाकल्याने सिडकोचे सहाय्यक कार्यकारी अभियंता दर्शन दिनानाथ कोळी (३८) यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तिन्ही डंपर जासई पोलीस चौकीत जमा केले असून, पोलीस उपनिरीक्षक रोशन काथारा या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## श्रीवर्धनचा कोपरी रस्ता उखडला

### देखभाल-दुरुस्तीची नागरिकांची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

शहरातील पेशवे आळी ते बाजारपेठ या मार्गावरील कोपरीचा पायरस्ता ठिकठिकाणी उखडला असून, खडी बाहेर येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सुमारे पाच-सहा वर्षांपूर्वी नगरपरिषदेने हा मार्ग पक्का व बारमाही सिमेंटच्या पायरस्त्याच्या स्वरूपात विकसित केला होता.

पूर्वी पावसाळ्यात या मार्गावरून ओहोळ वाहत असे, तर उन्हाळ्यात पायवाट तयार होत असल्याने नागरिक याच मार्गाने भाजी मार्केटमध्ये ये-जा करीत होते. तत्कालीन नगरसेवक पत्रकार आनंद जोशी यांनी माजी मंत्री रविंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हा मार्ग बारमाही करण्यासाठी ठराव व प्रयत्न केले होते. त्यानंतर नगरपरिषदेने या मार्गाचे काम पूर्ण केले. मात्र, सध्या रस्त्यावरील खडी ठिकठिकाणी बाहेर आली असून, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी बसविलेल्या लोखंडी जाळ्यांभोवतीचे सिमेंटही निघू लागले आहे. त्यामुळे जाळ्या खडखडत असून रस्ता धोकादायक बनत आहे.

पायरस्ता केवळ पादचाऱ्यांसाठी असतानाही त्यावरून दुचाकी, रिक्षा तसेच कधीकधी चारचाकी वाहनेही जात असल्याने रस्त्याची अधिकच दुरवस्था होत आहे. बाजारपेठेच्या ठिकाणी नव्याने रिक्षा स्थानक झाल्याने या मार्गावर वर्दळ वाढून वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत आहे. कोपरी पायरस्त्याची तातडीने दुरुस्ती व देखभाल करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे.

## वाडगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाडगाव येथे बापदेव सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थी गुणगौरव सोहळा पार पडला. रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी झालेल्या या कार्यक्रमाला ॲड. प्रसाद पाटील आणि ॲड. प्रविण ठाकूर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय 'आदिशक्ती' प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल वाडगाव ग्रामपंचायतीचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



सुगंधा पाटील आणि डॉ. वैभव भगत यांनी शाळेस दूरचित्रवाणी संच भेट दिल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास सारिका पवार, सरिता भगत, सीताराम भगत, ऋषिकांत भगत, निलम थळे, संतोष बोले, शुभांगी भगत यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक, आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची तासांना दांडी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महाविद्यालयाच्या सकाळी साडेसात ते दुपारी साडेबारा या वेळेतील काही तासांना दांडी मारून इयत्ता अकरावी तसेच बारावीचे विद्यार्थी समुद्रकिनाऱ्यावरील बंधाऱ्यावर आलेल्या टेंटखाली अश्लील चाळे करताना आढळत आहेत. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एकीकडे हाती भ्रमणध्वनी घेत आणि दुसरीकडे अश्लील चाळे करणे, असे प्रकार या ठिकाणी उघडपणे सुरू असतात. या वयात अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून एखादा अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या गंभीर बाबीची माहिती प्रत्यक्षदर्शींनी महाविद्यालयाच्या अध्यक्षांना देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे सांगितले जात आहे.

> **दामिनी पथकाची गस्त ठेवावी**
> सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या महाविद्यालयीन वेळेत श्रीवर्धन पोलीस ठाण्याने समुद्रकिनाऱ्यावर दामिनी पथकाची नियमित गस्त ठेवावी, जेणेकरून अशा प्रकारांना आळा बसेल, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### पोलिसांकडून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे | खोपोलीच्या कार्मेल कॉन्व्हेंटमध्ये जनजागृती कार्यक्रम

# ऑनलाइन जगात 'स्मार्ट' नव्हे तर 'सेफ' व्हा!

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्यातून निर्माण होणारे सायबर धोके लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल जबाबदारी आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्मेल कॉन्व्हेंट शाळेत ३ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पाच दिवसीय सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.



(छायाचित्र : संतोषी म्हात्रे)

जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या पुढाकारातून, खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल आणि खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शंकर धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना 'डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदारीपूर्ण वापर' या विषयावर प्रबोधन केले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी कार्मेल कॉन्व्हेंटच्या स्थानिक व्यवस्थापक ज्युली मारिया, मुख्याध्यापिका निर्मल मारिया, सरूपिया तसेच दर्शना टीचर, दिनू टीचर आणि दिपाली टीचर यांनी मार्गदर्शन केले.

सायबर गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, सोशल मीडिया आणि मोबाईल ॲप्लिकेशनचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव, डिजिटल गोपनीयता, पासवर्ड सुरक्षा तसेच वाढता स्क्रीन टाइम याबाबत विद्यार्थ्यांना विविध माध्यमांतून माहिती देण्यात आली. डिजिटल जगतातील धोके केवळ तांत्रिक नसून त्यांचा परिणाम वैयक्तिक सुरक्षितता, मानसिक स्वास्थ्य आणि सामाजिक जीवनावरही होऊ शकतो, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

या जनजागृती उपक्रमांतर्गत इयत्ता नववीतील ३० विद्यार्थ्यांच्या समितीने पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयावरील कृतीयुक्त गाणी, कविता, भाषण, गटचर्चा, पोस्टर, घोषवाक्य, व्यंगचित्र आणि अम्ब्रेला पेंटिंग यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच विविध वर्गांमध्ये दृकश्राव्य सादरीकरणाच्या माध्यमातून सायबर सुरक्षेविषयी माहिती देण्यात आली.

७ ऑगस्ट रोजी झालेल्या समारोप कार्यक्रमात खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शंकर धुमाळ, संतोष रुपनवर तसेच डिजिटल धोक्यांपासून व्यक्ती व संस्थांचे संरक्षण करण्याच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्टेफी मॅथ्यू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## श्रीवर्धन पोलिसांकडून प्रतिबंधित गुटखा जप्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

राज्यात प्रतिबंधित असलेला तंबाखूजन्य गुटखा विक्रीसाठी बाळगणाऱ्या दोघांवर श्रीवर्धन पोलिसांनी कारवाई करत १ लाख ६० हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी मेहेरबानो समीर टोळकर (रा. रोहिदास आळी, श्रीवर्धन) आणि सचिन सहादेव रसाळ (रा. मेटकर्णी) यांना अटक करण्यात आली आहे.

दि. ९ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास श्रीवर्धन एसटी स्थानक परिसरातील रिक्षा स्थानकासमोरील राधिका स्नॅक्स सोडा शॉपसमोर ही कारवाई करण्यात आली. मेहेरबानो टोळकर हिच्याकडे विक्रीच्या उद्देशाने प्रतिबंधित गुटखा बाळगलेला आढळून आला. तर सचिन रसाळ याने तिच्याकडून गुटखा खरेदी केल्याचे पोलीस तपासात समोर आले.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्री व साठ्यावर बंदी असतानाही संबंधित माल बाळगल्याप्रकरणी दोन्ही आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. ज्ञानेश्वरी बामणेकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.




## राशीभविष्य

- **मेष** : सरकारी कामं मनासारखी होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळवतो येईल.
- **वृषभ** : एखादी चिंता उद्भवेल. कला-गुणांना चांगल्या संधी लाभतील. योजलेली कामं यशस्वी होतील.
- **मिथुन** : आर्थिक कामं मनासारखी होतील. कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कर्क** : कार्यात प्रगती होईल. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच राहील. वादाचे प्रसंग कसोशीनं टाळायला हवे.
- **सिंह** :सरकारी कामांसाठी पाठपुरावा करावा. सुखस्वास्थ्य लाभेल. हौसमौजेसाठी अधिक खर्च केला जाईल.
- **कन्या** : नोकरीत अनुकूल घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील.
- **तूळ** : आर्थिक प्राप्ती समाधानकारक राहील. योजलेली कामं वेळेत पूर्ण करावी. अडचणीतून मार्ग निघेल.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रातील निर्णय अचूक ठरतील. सुख-स्वास्थ्य लाभणार आहे. मनासारखी प्रगती होईल.
- **धनु** : चिकाटीने प्रगती होईल. महत्त्वाच्या कामात अधिक लक्ष द्यावं. सामाजिक कार्यात संधी लाभतील.
- **मकर** : व्यवसायातील चिंता कमी होतील. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. गुंतवणूक विचारांन करावी.
- **कुंभ** : भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्यानं रहावं. अडचणी कमी होत जातील. अपेक्षित संधी लाभतील.
- **मीन** : यांत्रिक, तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. नव्या योजना मार्गी लागतील. अडचणी कमी होतील.

## दिन विशेष
### १४ ऑगस्ट

**२०१३** : शक्तिशाली स्फोटांमुळे आयएनएस सिंधूरक्षक पाणबुडीला जलसमाधी.
**२०१५** : ले. कर्नल नेक्टर संजेनबम, नायब सुभेदार राजेशकुमार (मरणोत्तर) हे कीर्ती चक्राचे मानकरी ठरले.
**२०१७** : भारताने श्रीलंकेविरुद्धचा सामना एक डाव १७१ धावांनी जिंकला.
**२०१८** : कॉसमॉस बँकेच्या मुख्यालयात 'एटीएम स्विच'हॅक करुन हॅकर्सनी तब्बल ९४ कोटी ४२ लाख रुपयांची रक्कम रोख व ऑनलाईन स्वरुपात काढली.

## आरोग्यमंत्र
### खुपऱ्या कसा होतो?



खुपऱ्या हा डोळ्यांचा एक रोग आहे. नेत्र आवरण व नेत्र पटल या दोहोंना क्लॅमिडीया ट्रॅकोमॅटीस नावाच्या जंतूंचा संसर्ग झाल्यास हा रोग होतो. या जंतूखेरीज इतर काही जंतूही संसर्ग करू शकतात. जगात सुमारे १५ कोटी लोकांना हा रोग आहे. हा रोग झाल्यानंतर सुरुवातीला डोळ्यात वाळूचे कण गेल्याप्रमाणे वाटत राहते. त्यामुळे रुग्ण डोळे चोळतो. प्रत्यक्षात मात्र डोळ्यात काहीच गेलेले नसते. पापण्या उलटून पाहिल्यास पांढरट ठिपके दिसतात. कालांतराने पापण्यांच्या कडा डोळ्यांच्या दिशेने वळतात व पापण्यांचे केसही डोळ्यात शिरू लागतात. वेळीच उपचार न केल्यास पापण्या आखडतात, बुबुळावर फूल पडते व दृष्टी जाते. भारतातील एकूण अंधत्वापैकी ०.२% अंधत्व खुपऱ्यांमुळे आलेले असते. यात बोटांद्वारे, हातरुमालाद्वारे, टॉवेलद्वारे वा काजळामार्फत रोग एकापासून दुसऱ्याला होतो. प्रखर सूर्यप्रकाश, धूळ, धूर व काजळ किंवा सुरमा यांसारख्या डोळ्यात जळजळ निर्माण करणाऱ्या पदार्थामुळे ट्रॅकोमा वा खुपया हा रोग होण्यास सहाय्य होते.ङ्गङ्गहा रोग बरा होतो. टेट्रासायक्लीन वा एरिथ्रोमायसीन यांचे डोळ्यासाठीचे मलम दररोज एकदा असे लागोपाठ साठ दिवस डोळ्यात टाकल्यास रोग बरा होतो. या ऐवजी दररोज एकदा असे प्रत्येक महिन्याच्या दहा दिवस औषध देता येते. हे मात्र सहा महिने सातत्याने घ्यावे लागते. वैयक्तिक स्वच्छता राखल्यास व डोळे कायम स्वच्छ ठेवल्यास खुपया या रोगाचा प्रतिबंध करता येतो.

## सफर देशांची
### भौगोलिक वैविध्य जपणारा देश

मॉंटेनेग्रो हा दक्षिणपूर्व युरोपातला देश आहे. मॉंटेनेग्रो म्हणजे 'काळा पर्वत'. अल्बानिया, क्रोएशिया, सर्बिया, बोस्निया हे मॉंटेनेग्रोचे शेजारी देश आहेत. विसाव्या शतकापर्यंत मॉंटेनेग्रो हा युगोस्लाव्हियाचा भाग होता. १९९२ ते २००३ दरम्यान हा देश युगोस्लाव्हियाचे संघीय प्रजासत्ताक ह्या नावाने ओळखला जात असे. जून २००६ मध्ये सर्बिया आणि मॉंटेनेग्रो देशाचे शांततापूर्वक विघटन झाले आणि त्यातून सर्बिया आणि मॉंटेनेग्रो ह्या दोन स्वतंत्र देशांची निर्मिती झाली. मॉंटेनेग्रो हा खूपच सुंदर देश आहे. इथे भौगोलिक वैविध्य पहायला मिळतं. उंचच उंच पर्वतरांगा, सोनेरी वाळूने नटलेले समुद्रकिनारे आणि इथली टुमदार शहरं पर्यटकांना आकर्षित करतात. २००६ मध्ये मॉंटेनेग्रो स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. यानंतर या देशाने आर्थिक प्रगतीसाठी बरेच प्रयत्न केले.

(क्रमशः)

## स्टाईल स्टेटमेंट
### ट्रेंडी जीन्स

बाजारात विविध प्रकारच्या जीन्स उपलब्ध आहेत. तुमच्या वॉर्डरॉबमध्येही यापैकी काही जीन्स असायला हव्यात. अशाच काही ट्रेंडी जीन्सवर एक नजर टाकू या.

✻ कम्फर्ट आणि स्टाईल या दोहोचं मिश्रण फ्लेअर अँकल स्कीनी जीन्समध्ये आढळतं. या जीन्सवर लॉंग शर्ट किंवा टॉप घालता येईल. ✻ फ्लेअर लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. यावर शॉर्ट शर्ट किंवा टॉप घाला. या जीन्ससोबत बूट किंवा मोजडी घालता येतील. ✻ कूल लूकसाठी स्ट्रेट लेग जीन्स ट्राय करता येईल. त्यावर ऑफ शोल्डर किंवा क्रॉप टॉप घाला. ✻ स्लीम वाईड लेग्ड जीन्स हा प्रकार सदाबहार आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचा टॉप, शर्ट किंवा कुर्ता चांगला दिसेल. ✻ स्कीनी जीन्सवर टी शर्ट किंवा क्रॉप टॉप घालता येईल. ✻ क्लासी लूकसाठी बूटकट जीन्स ट्राय करा. ✻ पलाझो स्टाईल वाईड लेग जीन्स हा प्रकार फारसा प्रचलित नाही. पण ही जीन्स तुम्हाला हटके लूक देऊन जाईल. ✻ पेपर बॅग वेस्ट पँटवर ट्यूब टॉप ट्राय करता येईल.

## पंचांग

**शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, श्रावण शु. २ (**पतेती**), चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : परिघ, सूर्योदय ६.२२, सूर्यास्त ७.०५

## फॉरवर्ड्स

**प्यास अग़र हमारीं बुझा दें..तों हम जानें...**

**तू समंदर हैं तों होग़ा.. हमारें किस क़ाम क़ा...!**

## वेगळ्या वाटा

सध्या तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनीही अर्ज करायला हवेत. सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. **(क्रमशः)**

## करिअरवाटा
### टिप्स स्पर्धा परीक्षेच्या

अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. मात्र या परीक्षेचा अभ्यासक्रम व्यापक असल्याने अभ्यास कुठून सुरू करायचा आणि कुठे संपवायचा हेच काहींना समजत नाही. तुम्हालाही ही समस्या भेडसावत असेल तर काही बाबी लक्षात घ्या.

✻ स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी येणारा प्रत्येक क्षण मोलाचा असतो हे लक्षात ठेवावं. म्हणूनच स्पर्धा परीक्षेची तयारी शाळा-महाविद्यालयात शिकतानाच व्हायला हवी. त्यामुळे एमपीएसी, युपीएससी आणि बॅंकिंग तसंच विविध क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा देताना अडचण येत नाही.



✻ अभ्यासाबरोबरच ग्रहणशक्ती वाढवणं, शॉर्टकट न वापरता मनापासून अभ्यास करणं आणि देश-विदेशातील महत्त्वाच्या घटना-घडामोडींकडे लक्ष देणं या बाबीही महत्त्वाच्या ठरतात.

✻ स्पर्धा परीक्षांची तयारी करताना प्रत्येक विषयाची मूलभूत माहिती घ्यायला हवी. यासाठी आठवी ते बारावीपर्यंतची पुस्तकं कामी येतात. विषयाचे मुलभूत ज्ञान पक्के असेल तर पुढच्या पातळ्या सुकर ठरतात.

## खेचाखेची
### मॉर्निंग वॉक

तुम्ही रोज सकाळी मॉर्निंग वॉक करून आल्यावर कारले, पालक आणि दुधीचा ज्यूस प्यायलात, तर तुमचं वजन नक्कीच कमी होईल...
पण तुमची जगण्याची इच्छाच मरून जाईल.
पण जर तुम्ही येताना वडापाव, मिसळ आणि ४/५ जिलब्या खाऊन आलात तर...
वजनाचं काय ते बघू नंतर,
पण जगण्याची आणि उद्या पुन्हा मॉर्निंग वॉक ला जाण्याची इच्छा मात्र प्रचंड वाढेल...!!!

## वेगळं काही

'अर्बेज' नावाचं एक हॉटेल फ्रान्स आणि स्वीत्झर्लंड या दोन देशांच्या सीमेवरच्या 'ला क्योर' परिसरात वसलं आहे. या हॉटेलचा काही भाग फ्रान्स तर काही भाग स्वीत्झर्लंडमध्ये आहे. त्यामुळे या हॉटेलचे दोन पत्ते आहेत. गंमत म्हणजे फ्रान्स आणि स्वीत्झर्लंड या दोन देशांची सीमारेषा या हॉटेलच्या मधून जाते. या हॉटेलमध्ये फिरतानाच आपण एका देशातून दुसऱ्या देशात जातो. या हॉटेलमधल्या खोल्यांची विभागणी दोन भागांमध्ये करण्यात आली आहे. इथल्या डबलबेडचा एक भाग फ्रान्स तर दुसरा भाग स्वीत्झर्लंडमध्ये आहे. इतकंच नाही तर इथल्या दोनपैकी एका उशीवर फ्रान्सच्या झेंड्याचं तर दुसऱ्या उशीवर स्वीत्झर्लंडच्या झेंड्याचं चित्र असतं.

## फॅशन पॅशन
### तुम्हाला काय खुलून दिसेल?



फॅशनविश्वात नवनवीन ट्रेंड्स येत असले तरी आजही खास समारंभांसाठी अनेकींकडून साडीलाच पसंती मिळते. साडीमध्ये स्त्रीचा बांधा उठावदार दिसतो. असं असताना काळजीपूर्वक नेसलेल्या साडीला खुलून दिसणारा ब्लाऊज असेल तर बातच न्यारी! सध्या फॅशनच्या जगात ब्लाऊजशी संबंधित नवनवीन प्रयोग होत आहेत. यात काहीतरी हटके करण्याचा मोह प्रत्येकीलाच होत आहे. सध्या कोल्ड शोल्डर स्लीव्हजचे ब्लाऊज अनेकींच्या पसंतीस उतरत आहेत. पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम असणारे व्ही नेकचे ब्लाऊजही पसंत केले जात आहेत. तेव्हा तुम्हीही हा ट्रेंड अनुसरु शकता.

✻ नेहमी वापरण्यायोग्य प्रावरणांमध्ये चेक्सचा पॅटर्न खुलून दिसतो. आता फॉर्मल शर्टससोबतच ब्लेझर, टॉपवर देखील चेक्स पॅटर्नची जादू दिसून येत आहे. टन चेक्स हा प्रकार सर्व वयोगटातल्या महिलांना शोभून दिसतो. गिनगहम चेक्स पॅटर्नही सुयोग्य ठरतो. या पॅटर्नमध्ये दोन रंगांचं कॉम्बिनेशन असतं. विंडोपॅन चेक्स प्रकारात चोळी किंवा टॉप्स खुलून दिसतात. तेव्हा आवडता पॅटर्न निवडा आणि ट्रेंडी लूक मिळवा.

## सुडोकू १३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | | | | | ५ | ६ |
| ७ | ६ | | | ८ | | १ | | ९ |
| | | | १ | | ५ | ३ | ७ | ८ |
| | ४ | | | | ६ | | | ५ |
| | | | ५ | ३ | २ | | | |
| ५ | | | ९ | | | | ३ | |
| १ | ८ | ६ | ३ | | ७ | | | |
| ३ | | ४ | | २ | १ | | ६ | ७ |
| २ | ७ | | | | | | | ३ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | ५ | ९ | ३ | ८ | ४ | १ | ६ |
| ३ | १ | ४ | ६ | ५ | २ | ९ | ८ | ७ |
| ८ | ९ | ६ | ७ | १ | ४ | २ | ३ | ५ |
| २ | ८ | ७ | ५ | ६ | ३ | १ | ४ | ९ |
| ५ | ४ | ३ | २ | ९ | १ | ६ | ७ | ८ |
| ९ | ६ | १ | ८ | ४ | ७ | ३ | ५ | २ |
| १ | ७ | २ | ३ | ८ | ६ | ५ | ९ | ४ |
| ४ | ५ | ८ | ७ | २ | ९ | ७ | ६ | ३ |
| ६ | ३ | ९ | ४ | ७ | ५ | ८ | २ | १ |

# शब्दकोडे क्रमांक १३८

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ | ■ | ७ | | ८ | | ९ | १० |
| ■ | ११ | | | १२ | | ■ | १३ | १४ | | ■ | | ■ | १५ | |
| १६ | | ■ | १७ | | | १८ | ■ | | ■ | १९ | | २० | | ■ |
| | ■ | २१ | | ■ | २२ | | २३ | | ■ | २४ | | | ■ | २५ |
| २६ | २७ | | ■ | २८ | ■ | २९ | | ■ | ३० | | ■ | ३१ | ३२ | |
| ■ | | ■ | ३३ | | ३४ | ■ | ३५ | ३६ | | ■ | ३७ | ■ | ३८ | |
| ३९ | | | | | | ४० | ■ | | ■ | ४१ | | | | ■ |
| ४२ | | ■ | | ■ | ४३ | | ४४ | | | | | ■ | ४५ | ४६ |
| | ■ | ■ | | | ■ | ४८ | | | ■ | | ■ | ४९ | | |
| ५० | ५१ | ■ | | ■ | ५२ | ■ | | ■ | ५३ | | ५४ | | ■ | |
| ■ | ५५ | | | | | ५६ | ■ | ५७ | ■ | ५८ | | ■ | ५९ | |
| ६० | | ■ | | ■ | ६१ | | | | ६२ | ■ | | ६४ | | ■ |
| | ■ | ६५ | | ६६ | ■ | | ■ | ६७ | | ६८ | ■ | | ■ | ६९ |
| ७० | | | ■ | ७१ | | | ७२ | | ■ | ७३ | ७४ | | ७५ | |
| | ■ | ७६ | | | ■ | ७७ | | ■ | ७८ | | | ■ | ७९ | |

**आडवे शब्द :-**
१) पाच दिवे तबकात ठेऊन ओवाळणे
५) कारस्थानी, दुष्ट
७) मालाचे येणे व जाणे
११) कवने रचणारा
१३) वसन
१५) धपाटा, चापट
१६) लवण
१७) वलुकामय जमीन
१९) सामान्य
२१) पंख
२२) बळकट
२४) संगीतातील एक राग
२६) चांदणी
२९) वेदना, खटका
३०) संगीतातील लकेर
३१) नासलेला
३३) घर, वस्ती
३५) शोभणारा
३८) अंत:करण
३९) धर्मराजाने युद्धक्षेत्रावर उच्चारेलेले द्विअर्थी वचन
४१) फेफरे
४२) संताप
४३) निवडणुकीनंतरचा लोकमताचा घेतलेला अंदाज ओपिनियन पोल(म)
४५) सारखा
४७) चष्मा
४८) वितरण
४९) भुतांचा राजा
५०) अभिप्राय
५३) पूर्णपणे (खोटे) , स्पष्टपणे
५५) इच्छा पूर्ण होण्याकरता देवाशी केलेले नवसादि प्रकार
५८) श्वसनेंद्रिय
५९) उथळ, मोठी वाटी
६०) मान्यतेचा एक शब्द
६१) निवड न करता, एकंदरीने सर्व
६३) वक्र
६५) कीव, दया
६७) केस कापणे
७०) ललाट
७१) शुष्कता
७३) घरधनीण यजमानाची पत्नी
७६) खाटीक
७७) पोपट
७८) चिंतन
७९) एक बारीक धान्य

**उभे शब्द :-**
२) नोकर
३) आवाज
४) तीन आठवडे
५) काळी मैना- एक बोरफळ
६) प्रतिकूल मत, समीक्षा
७) विहीर
८) कप्तान
९) बिना मसाल्याची आमटी
१०) रिकामटेकड्यांची गप्पा मारण्याची जागा
१२) मृत्यू, वेळ
१४) धोबी
१६) धुणे
१७) वाळूची जमीन
१८) कडक
१९) वस्तू
२०) पाठविलेला
२१) टपाल
२३) मोठी कळशी
२५) घर
२७) राजयक्ष्मा-एक आजार
२८) ध्वनी
३०) तारका
३२) तल्लीनता, एकरुपता
३३) कमी व जास्त होणे
३४) कमळ
३६) जपजाप्य
३७) डोळ्यावरील त्वचा
३९) नीच, दुष्ट माणूस
४०) चणचण
४१) वस्तुसंग्रहालय
४४) जुगाराचा एक प्रकार
४६) मळलेला
४९) गावाची हद्द
५१) पुत्र, मुलगा
५२) प्रयत्न
५४) अर्धांगवायू
५६) सरदाराचा हुद्दा किंवा मान
५७) एकट्याने, एकत्र
५९) एकटा, फुलांचा खच
६०) पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे आडनाव
६२) गाडीचे छत
६४) कुराणातील वचने
६५) बांबू
६६) उपवासाचे तांदूळ
६८) नेत्र
६९) करुणा
७२) चानी
७४) लोक
७५) झोप

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गु | रु | जी | ■ | द | ■ | ह | ■ | अ | व | स | र | ■ | का | पा |
| ■ | पा | व | ■ | र | ■ | व | न्हा | ड | ■ | र | क्षा | मं | त्री | ■ |
| छा | या | ■ | आ | वा | ह | न | ■ | ला | ड | का | ■ | द | ■ | ह |
| न | ■ | अ | व | जा | र | ■ | ही | ना | ■ | र | वि | वा | स | र |
| दा | ■ | ट | क | ■ | ह | ल्ली | ■ | रा | ग | ■ | ■ | स | ड | क |
| र | क्ष | क | ■ | भ | र | ■ | ज | य | ज | य | का | र | ■ | त |
| ■ | मा | ळ | क | री | ■ | थो | ■ | ण | ■ | म | न | ■ | मा | ■ |
| मा | या | ■ | रा | स | ग | र | बा | ■ | मा | न | ■ | स | मा | न |
| ■ | च | रा | ■ | घा | र | ■ | व | र्त | न | ■ | का | म | ■ | र |
| भा | क | ■ | क | ल | म | दा | न | ■ | व | प | न | ■ | दा | म |
| स्क | ■ | क | ल | णे | ■ | स | क | स | ■ | र | स | वा | न | ■ |
| र | या | ■ | क | ■ | स | ■ | स | म | जू | त | ■ | रं | व | थ |
| ■ | क | म | ला | क | र | ■ | ■ | ज | न | ■ | आ | वा | ■ | ट्टा |
| मा | ■ | वा | ट | ■ | ग | द | ग | दा | ■ | अ | न | र | सा | ■ |
| सा | य | ली | ■ | अ | म | र | ■ | र | म | जा | न | ■ | ल | ज्ञा |

# श्रीनगरमध्ये रंगणार इराणी कपचा थरार

■ जम्मू-काश्मीरमध्ये क्रिकेटचा जल्लोष!
■ ऑक्टोबरमध्ये इराणी कप आयोजन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

जम्मू आणि काश्मीर गेल्या चार दशकांतील सर्वात मोठ्या क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्याच्या तयारीत आहे. श्रीनगरमधील शेर-ए-काश्मीर स्टेडियमवर यावर्षी ऑक्टोबरमध्ये इराणी कप सामना आयोजित केला जाईल. हा १९८० च्या दशकानंतर जम्मू आणि काश्मीरमधील सर्वात मोठा क्रिकेट सामना ठरेल. हा सामना २०२५-२६ रणजी ट्रॉफी विजेते जम्मू आणि काश्मीर विरुद्ध उर्वरित भारत यांच्यात १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान खेळला जाईल.

९ सप्टेंबर १९८६ रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या एकदिवसीय सामन्यानंतर काश्मीरमध्ये होणारा हा सर्वात मोठा क्रिकेट सामना असेल. या स्टेडियममध्ये यापूर्वी दोन एकदिवसीय सामने खेळले गेले आहेत. पहिल्या सामन्यात, १३ ऑक्टोबर १९८३ रोजी भारताचा सामना वेस्ट इंडिजशी झाला होता, ज्यात खराब हवामानामुळे डकवर्थ-लुईस प्रणालीनुसार वेस्ट इंडिजला विजेता घोषित करण्यात आले होते. दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा तीन विकेट्सने पराभव केला होता.

गेल्या वर्षी, १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान, शेर-ए-काश्मीर स्टेडियमवर मुंबई आणि जम्मू-काश्मीर यांच्यात एक महत्त्वपूर्ण रणजी ट्रॉफी सामना आयोजित करण्यात आला होता. डावखुरा फिरकी गोलंदाज अष्टपैलू शम्स मुलानीने पहिल्या डावात ९१ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात ४६ धावांत सात विकेट्स घेतले. या चमकदार कामगिरीमुळे त्याला सामनावीर पुरस्कार मिळाला.

इराणी चषक, ज्याला इराणी करंडक म्हणूनही ओळखले जाते, हा भारतात दरवर्षी खेळला जाणारा वार्षिक प्रथम-श्रेणी सामना आहे, जो त्या मोसरातील रणजी करंडक चॅम्पियन संघाचा सामना रेस्ट ऑफ इंडिया संघाविरुद्ध होतो. रेस्ट ऑफ इंडिया संघात रणजी करंडक चॅम्पियन संघाव्यतिरिक्त भारतातील विविध राज्यांतील सर्वोत्तम खेळाडूंची निवड केली जाते. ही निवड बीसीसीआयकडून केली जाते. बीसीसीआयने इराणी चषकाचे नाव दीर्घकाळ कार्यरत असलेले अध्यक्ष आणि खजिनदार झेट आर. इराणी यांचे नाव दिले. १९२८ मध्ये बीसीसीआयच्या स्थापनेपासून ते १९७० मध्ये मृत्यूपर्यंत इराणी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



जम्मू-काश्मीरचे मुख्य प्रशिक्षक अजय शर्मा यांच्या म्हणण्यानुसार, श्रीनगरमधील शेर-ए-काश्मीर स्टेडियमवर १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान इराणी कप सामना आयोजित केला जाईल. एका सूत्राने सांगितले की, स्टेडियम या मोठ्या सामन्यासाठी तयारी करत आहे. सामन्याचे थेट प्रक्षेपण होणार असल्याने, स्टेडियममध्ये मोठ्या सुधारणांची आवश्यकता असेल.

या मोठ्या सामन्याच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या गरजांविषयी जम्मू-काश्मीर क्रिकेट असोसिएशनला माहिती देण्यासाठी बीसीसीआयने दोनदा श्रीनगरला एक पथक पाठवले आहे. त्यांना कॉमेंटेटर रुम, योग्य प्रक्षेपण व्यवस्था, मीडिया बॉक्स आणि तात्पुरत्या व कायम स्वरूपी अतिरिक्त प्रेक्षक गॅलरींची आवश्यकता असेल.

सध्या, स्टेडियममध्ये ५,००० प्रेक्षकांची बसण्याची क्षमता आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इराणी कप २०२६ च्या स्थळाची अद्याप अधिकृतपणे पुष्टी केलेली नाही. ४१ वर्षीय फलंदाज पारस डोग्राच्या नेतृत्वाखाली, जम्मू आणि काश्मीर संघ निश्चितपणे स्विंग गोलंदाज आकिब नबी दारवर अवलंबून असेल, ज्याची नुकतीच भारताच्या श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

बारामुल्लाच्या या २९ वर्षीय वेगवान गोलंदाजाने २०२५-२६ च्या रणजी ट्रॉफीमध्ये १२.५६ च्या सरासरीने ६० बळी घेत सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होण्याचा मान मिळवला.

रेस्ट ऑफ इंडियाने आतापर्यंत ३० इराणी कप विजेतेपदे पटकावली असून, त्यापाठोपाठ मुंबईचा क्रमांक लागतो, ज्याने १५ विजेतेपदे जिंकली आहेत.

इराणी कपचा सामना खेळल्यानंतर, जम्मू आणि काश्मीर ११ ऑक्टोबर रोजी मध्य प्रदेशविरुद्ध आपल्या रणजी ट्रॉफी विजेतेपदाच्या डिफेन्ड करण्यासाठी मैदानात उतरेल. गतविजेत्यांना २०२६-२७ रणजी ट्रॉफीसाठी एलिट गट अ मध्ये स्थान देण्यात आले आहे, ज्यामध्ये मध्य प्रदेश, विदर्भ, बडोदा, पुदुचेरी, बिहार, उत्तर प्रदेश आणि गोवा यांचाही समावेश आहे.



## रोह्यात बुद्धिबळाचा डाव रंगला

# २४० खेळाडूंचा सहभाग

■ प्रमोद म्हसकर पुरस्कृत स्पर्धेत चुरशीच्या लढती
■ रोह्यात राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेची केली घोषणा

। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यात बुद्धिबळ खेळाला चालना देण्याच्या उद्देशाने प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान, रोहा यांच्या वतीने पुरस्कृत आणि रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेतर्फे आयोजित अंडर १६ आणि ओपन आरटीसीए रॅपीड चेस स्पर्धा २०२६ उत्साहात पार पडली. या स्पर्धेला तब्बल २४० खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे ४० रोटेर्ड स्पर्धक सहभागी झाल्याने स्पर्धेतील सामने चुरशीचे आणि दर्जेदार ठरले.

सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तसेच रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष प्रमोद म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सकाळी ०९/३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष अमर सलागरे यांनी केले.

स्पर्धेत खुला आणि अंडर -१६ अशा दोन गटांमध्ये सामने झाले. खुल्या गटात ३०, तर अंडर -१६ गटात १० रोटेर्ड स्पर्धक सहभागी झाले होते. खुल्या गटात स्नेहल भोसले यांनी ६ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. राहुल वर्मा यांनी ६ गुणांसह द्वितीय, तर विश्वदीप जाधव यांनी ६ गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

अंडर-१६ गटात विदेहा मेटकर हिने ६ गुणांसह प्रथम, गौतम सुरेश पवार याने ६ गुणांसह द्वितीय, तर आर्या बाळाराम जाधव हिने ६ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी होऊनही बैठक व्यवस्था, पंच व्यवस्था, नोंदणी आणि सामन्यांचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभ प्रमोद म्हसकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे, रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेचे पदाधिकारी आणि प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.प्रसंगी प्रमोद म्हसकर यांनी रोहा येथे आगामी काळात मोठी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्याची घोषणा केली. या घोषणेमुळे स्थानिक बुद्धिबळपटू आणि क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संकेत खोत, अमर सलागरे, विक्रांत जाना, महेश बामुगडे, विवेक कांबळे, योगेश भगत, सुधीर जंगम यांच्यासह आयोजकांनी विशेष मेहनत घेतली. २४० खेळाडू, ४० रोटेर्ड स्पर्धक आणि रंगलेल्या चुरशीच्या लढतींमुळे ही स्पर्धा रोह्यातील बुद्धिबळ क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

## निवडक

### पॅडेल लीग चौथ्या पर्वाचा वरळीत थरार

**मुंबई :** वर्ल्ड पॅडेल लीगचा चौथा हंगाम अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला असून, पुढील पाच दिवस मुंबईत रंगणाऱ्या या अत्यंत



चुरशीच्या स्पर्धेकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. डोम इनडोअर स्टेडियम, वरळी येथे होणाऱ्या या स्पर्धेत या खेळातील काही अव्वल खेळाडूंचा समावेश असलेले ६ संघ सहभागी होत आहेत. या चौथ्या हंगामात प्रीमियर पॅडेल चॅम्पियन्स जगातील अव्वल २० क्रमांकातील अनेक खेळाडू आणि माजी जागतिक क्रमवारीतील प्रथम क्रमांकाचे खेळाडू ६ संघांमधून मैदानात उतरतील. वेदांता लेपड्र्स, खान टायगर्स, व्हीबी रियल्टी चित्ताज, ऑसी मॅव्हेरिक्स जॅग्वार्स, हबटाऊन पॅनोरमा पँथर्स आणि गेम चेंजर्स लायन्स असे सहा संघ स्पर्धेत सहभागी होतील.महेश भूपती यांच्या मते, या हंगामातील खेळाडूंची ताकद ही या खेळाचा झालेला विस्तार, भारतातील पॅडेलचा वाढता प्रसार आणि डब्ल्यूपीएलच्या या उल्लेखनीय पर्वाची पावती आहे. भूपती म्हणाले, या हंगामातील स्पर्धेची पातळी भारतातील पॅडेल खेळाच्या विकासाचे प्रतीक आहे. जगातील सर्वोत्तम खेळाडू भारतात खेळायला येणे हा या खेळासाठी एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे आणि यामुळे या खेळाबद्दलची उत्सुकता आणखी वेगाने वाढेल. या उत्कृष्ट खेळाडूंच्या उपस्थितीमुळे प्रेक्षकांना हाय-व्होल्टेज सामने पाहायला मिळतील, जिथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिग्गज खेळाडू भारतातील क्रीडाप्रेमींना पॅडेल खेळाची खरी थरारक अनुभूती देतील.

### चाहत्यांचा होऊ शकतो हिरमोड!

**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानविरुद्ध द्विपक्षीय मालिका



खेळत नाही. त्यामुळे, आयसीसी आणि एसीसी या दोन्ही स्पर्धांमध्ये दोन्ही संघांचे जास्तीत जास्त सामने व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातात. आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान तीन वेळा एकमेकांसमोर येतात. आता सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारत आणि पाकिस्तान एकमेकांसमोर येण्याची शक्यता आहे. तथापि, प्राथमिक सामन्यांमध्ये हे दोन्ही संघ एकमेकांसमोर येणार नाहीत. हा सामना केवळ पदकाच्या सामन्यांमध्येच होण्याची शक्यता आहे. जपानमधील नागोया येथे होणाऱ्या या स्पर्धेच्या ड्रॉ नंतर हे स्पष्ट झाले आहे की, भारत आणि पाकिस्तान प्राथमिक टप्प्यात एकमेकांविरुद्ध खेळणार नाहीत. जर भारत आणि पाकिस्तान एकमेकांसमोर आलेच, तर ते केवळ सुवर्णपदक किंवा कांस्यपदकाच्या सामन्यातच शक्य होईल. पुरुष क्रिकेट स्पर्धेत भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका यांनी थेट उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. अफगाणिस्तानसह इतर सहा संघांना गट टप्प्यात खेळल्यानंतर बाद फेरीसाठी पुढे जावे लागेल. भारताला दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान देण्यात आले आहे, तर पाकिस्तान पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत खेळेल. हे दोन्ही संघ २८ सप्टेंबर रोजी खेळतील.

### टेबल टेनिस फेडरेशनची मान्यता रद्द

**मुंबई :** क्रीडा मंत्रालयाने भारतीय टेबल टेनिसच्या प्रशासनासंदर्भात एक मोठे पाऊल उचलले आहे. मंत्रालयाने भारतीय टेबल टेनिस महासंघाची मान्यता निलंबित केली आहे. या निर्णयामागे महासंघातील प्रशासकीय त्रुटी हे मुख्य कारण असल्याचे म्हटले जात आहे. मंत्रालयाच्या आदेशानुसार, टीटीएफआयचे वेळेवर निवडणुका न घेणे हे देखील मान्यता निलंबित करण्यामागील एक कारण आहे. यापूर्वी, मंत्रालयाने महासंघाला कारणे दाखवा नोटीस बजावली होती, परंतु त्यांचे उत्तर असमाधानकारक आढळले होते. मान्यता निलंबित करण्यासोबतच, क्रीडा मंत्रालयाने भारतीय ऑलिम्पिक संघटनेला टेबल टेनिसच्या प्रशासनाची जबाबदारी सांभाळण्यासाठी एक अॅडहॉक समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाच्या आदेशात म्हटले आहे की,आयओए, आंतरराष्ट्रीय संस्थांशी सल्लामसलत करून, एका अॅडहॉक समितीच्या स्थापना केली जाईल. सध्या टीटीएफआयच्या अध्यक्षपदी मेघना अहलावत आहेत. ज्या संस्थेच्या पहिल्या महिला अध्यक्ष आहेत. अहलावत यांनी डिसेंबर २०२२ मध्ये हे पद स्वीकारले. वेळेवर निवडणुका न घेणे ही एक मोठी समस्या ठरली. मंत्रालयाच्या कारवाईमधील सर्वात महत्त्वाच्या मुद्द्यांपैकी एक म्हणजे टीटीएफआयच्या निवडणुका वेळेवर घेण्यात आलेले अपयश. कारणे दाखवा नोटीसला दिलेल्या उत्तराने मंत्रालय समाधानी नव्हते आणि त्यामुळे मान्यता निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# भारताविरुद्ध श्रीलंकेचा संघ जाहीर

## ३ वर्षांनी स्टार खेळाडूंचे कमबॅक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटीसाठी श्रीलंकेचा संघ जाहीर करण्यात आला आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने या सामन्यासाठी १६ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे.

धनंजय डीसिल्वाकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. यष्टीरक्षक-फलंदाज निरोशन डिकवेला जवळपास तीन वर्षांनंतर श्रीलंकेच्या कसोटी संघात परतला आहे. ३३ वर्षीय डिकवेला शेवटचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना २०२३ मध्ये खेळला होता. पहिली कसोटी १५ ऑगस्टपासून गॉल येथे खेळवली जाईल. दुसरी कसोटी २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे खेळवली जाईल.



डिकवेलाच्या पुनरागमनाचे सर्वात मोठे कारण म्हणजे कुशल मेंडिसची अनुपस्थिती. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे मेंडिस निवडीसाठी उपलब्ध नाही. पथुम निसांका देखील मनगटाच्या शस्त्रक्रियेतून सावरत आहे. यामुळे, कुसल मेंडिस आणि पथुम निसांका पहिल्या कसोटीतून बाहेर झाले आहेत. या दोघांच्या अनुपस्थितीमुळे श्रीलंकेच्या फलंदाजीच्या फळीत एक पोकळी निर्माण झाली आहे. याच कारणामुळे वयाच्या ३३ व्या वर्षी डिकवेलाचा पुन्हा कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अद्याप एकही सामना न खेळलेल्या केसरा नुवान्था आणि अव्वल फळीतील फलंदाज पसिंदू सुरियाबंदर यांचाही श्रीलंकेच्या संघात समावेश करण्यात आला आहे. आतापर्यंत केवळ एक कसोटी सामना खेळलेला डावखुरा वेगवान गोलंदाज दिलशान मदुशंका याचेही संघात पुनरागमन झाले आहे. पथुम निसांका संघाबाहेर असल्याने, पसिंदू सुरियाबंदरलाही संघात आपले स्थान टिकवून ठेवण्याची संधी मिळाली आहे. मात्र, श्रीलंकेकडून निशन मदुष्का आणि लाहिरू उदारा डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. श्रीलंकेच्या मागील कसोटीत दोघांनीही डावाची सुरुवात केली होती. मदुष्काने भारताविरुद्धच्या सराव सामन्यात डावाची सुरुवात करून एक शानदार अर्धशतक झळकावले होते. मधल्या फळीत दिनेश चांदीमल, कामिंदू मेंडिस आणि कर्णधार धनंजय डी सिल्वा हे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर खेळण्याची शक्यता आहे.

# बांगलादेशने ऑस्ट्रेलियाची उडवली दाणादाण

## कांगारुंचा पहिला डाव १९८ धावांवर आटोपला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बांगलादेशचा संघ कायम ऑस्ट्रेलियासाठी डोकेदुखी ठरला आहे. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या १९८ धावांवर आटोपला. तसेच बांगलादेशने पहिल्या दिवसअखेर एक गडी गमवून ९६ धावांची खेळी केली आहे. अजूनही बांग्लादेश १०२ धावांनी पिछाडीवर आहे.

ट्रॅव्हिस हेड आणि जेक वेदरॉल्ड यांनी ऑस्ट्रेलियाची सुरूवात केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४५ धावा जोडल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलिया योग्य ट्रॅकवर आहे असं वाटलं होतं. पण



त्यानंतर घसरगुंडी सुरू झाली ती थेट १९८ धावांवर थांबली. जेक वेदरॉल्ड २३ धावा करून बाद झाला. त्यानंतर लगेचच ट्रेव्हिस हेडची विकेट पडली. हेड २२ धावा करून तंबूत परतला.

त्यानंतर मार्नस लाबुशेनही काही करू शकला नाही आणि १ धाव करून खेळ आटोपला. पण एका बाजूने धडाधड विकेट पडत असताना अनुभव स्टीव्ह स्मिथने डाव सावरला. त्याने ७१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

शादमन इस्लाम आणि तन्झिद हसन तमीम यांनी पहिल्या विकेटसाठी ३६ धावांची भागीदारी केली. शादमन इस्लाम २० धावा करून बाद झाला. त्यानंतर तन्झिद आणि मोमिनुल हक यांची जोडी जमली. या जोडीने ६० धावांची भागीदारी केली.

# भारताची अफगाणिस्तानविरुद्ध मालिका



। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।

बांगलादेशमध्ये मर्यादित षटकांची मालिका खेळण्याच्या बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या आशा मावळल्या आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने श्रेयसच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ १३ ते १७ सप्टेंबरदरम्यान दिल्लीत अफगाणिस्तानविरुद्ध तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळेल, अशी घोषणा केली आहे.

बीसीसीआय आणि अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड यांनी बुधवारी संयुक्त निवेदनाद्वारे या मालिकेची अधिकृत घोषणा केली. गेल्या वर्षी बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे भारत-बांगलादेश द्विपक्षीय मालिका स्थगित करण्यात आली होती. अफगाणिस्तानविरुद्धची ही मालिका एसीबीच्या फ्युचर टूर प्रोग्रामचा भाग असून, ती अफगाणिस्तानची घरची मालिका मानली जाणार आहे. अफगाणिस्तानने भारताला आपले होम ग्राउंड बनवले आहे.

## 'एकदिवसीय क्रिकेटविना पर्याय नाही'

। मुंबई । प्रतिनिधी ।

एकदिवसीय मालिकांची संख्या कमी होऊ शकते, मात्र ५० षटकांच्या प्रारूपाशिवाय क्रिकेटचा विचार करणे कठीण आहे, असे मत जॉंटी ऱ्होड्स यांनी व्यक्त केले. फ्रँचायझी टी-२० स्पर्धांच्या वाढत्या प्रभावामुळे येणाऱ्या काळात खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून लवकर निवृत्ती घेण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते, असा इशाराही ऱ्होड्सने दिला.युरोपियन टी-२० प्रीमियर लीगमधील रोटरडॅम डॉकर्स या संघाच्या जर्सी अनावरणप्रसंगी ऱ्होड्सने संवाद साधला.

# अजिंक्य रहाणेचे कसोटी समालोचनात पदार्पण



। मुंबई । प्रतिनिधी ।

नुकताच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती पत्करलेला भारताचा माजी फलंदाज अजिंक्य रहाणे आगामी भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांच्या मालिकेतून कसोटी समालोचक म्हणून पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे.

१५ ऑगस्टपासून गॉल येथे सुरू होणाऱ्या या मालिकेसाठी रहाणे आता सोनी स्पोर्ट्स नेटवर्कच्या समालोचकांच्या पॅनेलमध्ये सामील होणार आहे. प्रथम श्रेणी पदार्पणानंतर तब्बल १८ वर्षांच्या कारकीर्दीला पूर्णविराम देणारा रहाणे आता मायक्रोफोनमागे नवी भूमिका बजावणार आहे. आपल्या आंतरराष्ट्रीय लाल चेंडूच्या क्रिकेटचा अनुभव तो या प्रसारणाच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचवणार आहे.

# महाराष्ट्राने गमावले राष्ट्रकुल खो-खो अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद

। मुंबई । प्रतिनिधी ।

खो-खो खेळाच्या आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात असतानाच आता नवी माहिती समोर येत आहे. खो-खोच्या पहिल्या राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धेच्या यजमानपदाचा मान महाराष्ट्राला मिळणार होता. मात्र खो-खो खेळाचे आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर गेल्या काही महिन्यांत सर्व काही बिघडल्याने आता ही संधी हरयाणाला दिली जाणार आहे.

एकीकडे २०२५च्या विश्वचषक विजेत्या भारतीय



खो-खो संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूंना अद्याप राज्य शासनाकडून २.२५ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक न मिळाल्याचा मुद्दा ऐरणीवर आहेच. दुसरीकडे जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवर सातत्याने आयोजित केल्या जाणाऱ्या खो-खो स्पर्धांचे प्रमाण आंतरराष्ट्रीय स्तरावर मात्र फारच कमी आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

साधारणपणे दरवर्षी डिसेंबरच्या अखेरीस किंवा जानेवारीच्या सुरुवातीला वरिष्ठ गटाची राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा रंगते. जर डिसेंबरमध्ये राष्ट्रकुल खो-खो स्पर्धेचे आयोजन पक्के झाले, तर यामुळे राष्ट्रीय स्पर्धा पुढे ढकलली जाऊ शकते.

विश्वचषक विजेत्या संघातील महाराष्ट्राच्या चार खो-खोपटूंनी मंगळवारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या निर्णयानुसार विश्वचषक स्पर्धेतील विजेत्या वरिष्ठ सांघिक क्रीडाप्रकारातील खेळाडूंना २.२५ कोटींचे रोख पारितोषिक देण्याची तरतूद आहे.

## क्रिकेटचा सामना थांबवावा लागला | एमआय लंडनने सामना जिंकला

# अंधार पसरला अन् फॅन्सला दिसले सूर्यग्रहण

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

क्रिकेट सामन्यादरम्यान सूर्यग्रहण सुरू झाले असं कधी ऐकलं आहे का? पण असेच पाहायला मिळाले. असेच काहीसे बुधवारी रात्री उशिरा, भारतीय प्रमाण वेळेनुसार घडले.

या दिवशी सूर्यग्रहण झाले. जरी ते भारतात दिसले नसले तरी, जगभरातील अनेक भागांतील लोकांनी ते पाहिले. स्काय स्पोर्ट्सने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्या व्हिडिओची आता जोरदार चर्चा सुरु आहे.



बुधवारी, बर्मिंगहॅम फिनिक्स आणि एमआय लंडन यांच्यात सामना खेळला जात होता. या १०० चेंडूंच्या सामन्यात, पहिल्या डावात ६० चेंडू खेळले जात असताना, आकाशात अचानक एक अनोखे दृश्य दिसले. काही क्षणांपूर्वी सूर्य पूर्ण तेजस्वी होता, पण त्याचा आकार हळूहळू कमी झाला. थोड्या वेळाने, तो अर्धवट फुटलेल्या चंद्रासारखा दिसू लागला. सूर्यग्रहण सुरू होताच, सामना काही काळासाठी थांबवण्यात आला आणि स्टेडियममधील प्रत्येकाने ते पाहण्यासाठी चष्मे घातले. सामना फार काळ थांबला नाही; तो सुरूच राहिला. यानंतरही, सूर्यग्रहण संपेपर्यंत लोक पाहतच राहिले. त्यांचे लक्ष सामन्यावर नव्हते.

या सामन्याबद्दल बोलायचे झाल्यास, प्रथम फलंदाजी करताना एमआय लंडनने १५७ धावा केल्या. जेव्हा बर्मिंगहॅम फिनिक्सने फलंदाजीला सुरुवात केली, तेव्हा तो संघ ७ गडी गमावून केवळ १५५ धावाच करू शकला. अशाप्रकारे, एमआय लंडनने दोन धावांनी सामना जिंकला. सामना स्वतःच एक महत्त्वाचा होता, परंतु सामन्यादरम्यान सर्वाधिक चर्चेचा विषय सूर्यग्रहण हा होता. या वर्षातील शेवटचे सूर्यग्रहण संपले आहे. हे सूर्यग्रहण कर्क राशीतील अश्लेषा नक्षत्रात झाले. भारतीय प्रमाण वेळेनुसार, हे सूर्यग्रहण रात्री ९:०४ ते पहाटे १:२७ पर्यंत होते. हे एक खग्रास सूर्यग्रहण होते, ज्यामध्ये सूर्याचा सुमारे ९० टक्के भाग चंद्रामागे झाकला गेला होता. मात्र, हे सूर्यग्रहण भारतातून दिसले नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)